Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५२] आकोला--सोमवार तारीख ७ माहे जानेवारी सन १९१८ ई० [अंक १

## मशिनरींचा लिलाव

दिवाणी मुकदमा नंबर ९८ सन १९१७ ने. तारीख १५।१।१९१८

विद्यमान सबजज्ज साहेब कोर्ट दर्यापूर

**वादी**

सदाशिव कृष्ण पर्वते व विठ्ठल गोविंद रा. दर्यापूर

**प्रतिवादी**

देविदास विठ्ठल ब्राह्मण रा. बाभळी

सर्व लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं वरील मुकदम्यांत कोर्टाचे हुकुमावरून वानोसा (तालूके दर्यापूर) येथें आठवडा बजारा समोर असलेली वादी-प्रतिवादी यांची फ्याक्टरी—ऑईल एन्जिन चौदा हॉर्स पावरचें ॲकन मेकरचें, दळण्याची चक्की, तेल काढण्याचा घाणा, कडबा कापण्याचें यंत्र, पाण्याच्या टाक्या, पाईप कनेक्शन सुद्धां, पुली वगैरे सर्व सामान व फ्याक्टरीचा इमला विटेबंदी टीनचे रूफ सुद्धां. येणेंप्रमाणें माशिनरी व इमला ता. १०-१-१९१८ गुरुवारीं दिवसा १२ वाजल्या नंतर हराश होणार आहे. तरी ज्यांना हरासास घेणें असेल त्यांनीं सदहू तारखेस सदहू फ्याक्टरीचे जागीं हजर राहावें. हरासाची सालीम रकम हरासाचे वेळेस एकदम द्यावी लागेल. चार हजार रुपयापेक्षा कमी किंमतीला सदहू माशिनरी विकण्याचा कोर्टाचा हुकूम नाहीं. कळावें.

सही

दर्यापूर २८-१२-१७ } एम्. बी. देशपांडे रिसीव्हर

नो० नं० १

## नोटीस.

नोटिस देणार गणपत नासाजी ठकरे कुणबी रा. दर्यापूर

नोटिस पुतळी मर्द गणपत

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं अंदाजा ७ महिने झाले. माहेरपणा करितां ह्मणून तुझे माहेरी कोठासे ता. बाळापूर येथें आपले भावाचे येथें गेलीस. तुझे भावानें १ महिन्याचे बोलानें तुला नेले व तूं ही एक महिन्यावेवर न रहण्याचें कबूल केलें; असें असतां तूं कबूल केल्या प्रमाणें आली नाहींस, ह्मणून एक महिन्या नंतर व त्या नंतर तुला आणण्यास बोलावणें पाठविले असतां प्रत्येक वेळीं तुझे भावानें आली पाठवीत नाहीं, ह्मणून आमचे माणसास सांगितलें. तरी भावाचे सांगण्याप्रमाणें न चालतां तूं ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत यावें. तुझे येण्याचे खर्चाकरितां उद्या ४ रुपयाची मनिऑर्डर पाठवीत्या त्याचा गाडी किराया वगैरेची तजवीज आहे. नोटिशीप्रमाणें तूं आली नाहींस तर मला कायद्याचा अवलंब करावा लागेल. ही गोष्ट उभयपक्षी ठीक नाहीं हें ध्यानांत आणून वरीं यावेस कळावें.

तारीख १-१-१९१८.

सही

गणपत वा नरसाजी दस्तुर खुद्द

नो० नं० २

## नोटीस.

नोटीस बेरामी नारायण वा सुपडाजी फुलमाळी रा० जळगांव ता० मजकूर

यांसः—

आह्मा खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं कजबे पिंपळगांव काळ्याचे येथील सेत सर्वे नंबर ३०१-४०२ या दोन्ही सेतांतील निमे हिस्से तुकाबाई मर्द मानाजी रा० अपलगांव ही माझी आत्या होती, तीस माझा बाप नामे मारुती यानें हीन हयातीपर्यंत वडिलोपार्जित असलेले वहून खाण्याकरितां दिले होते. विकूं नये तुझ मरणानंतर माझे दोन्ही मुले खालीं सही करणार हे मालक आहेत ते वाहून खातील असें शर्तीवर दिले होते. त्यानंतर आमचा बाप मरण पावला असून नंतर तुकाबाई ही ४ चार महिने झाले असतील मरण पावली. वरील नंबरांतील हिस्से हक्क अन्यासंबंधानें ताब्यांत घेतले असून तुह्मी तंटा करून सेती ताब्यांत घेऊं असे समजले कारितां कळविण्यांत येते येते कीं, वरील हिसे हक्क या नात्यानें ताब्यांत घेतले. तुह्मी तंटा न करितां कोर्ट मार्फत दावा आणू करितां मुद्दाम या नोटिशीनें कळविले आहे.

सही

१ धमु वा मारुती फुलमाळी रा० पिंपळगांव काळ्याचे हातची नि० असे

१ किसन वा मारुती हाताची नि. असे

नो० नं० ३

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार जळगांव व पिंपळगांव काळ्याचे

यांसः—

आह्मी खालीं सह्या करणार यांजकडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं वरील नंबर ३०१-४०२ यांतील हिस्से माझे बापानें वाहून खाण्याकरितां वडिलोपार्जित असलेले तुकाबाईस दिले होते ती मरण पावली. ते हिस्से आमचे आह्मी ताब्यांत घेतले, सबब नारायण वा सुपडाजी याजपासून गहाण, खरीदी व अन्य रीतीनें त्याशीं व्यवहार करूं नये. केल्यास बातल असे, व वरील हिश्यावर कर्ज ही देऊं नये. करितां मुद्दाम कळविले आहे कळावें.

सही

१ धमु वा मारुती फुलमाळी रा. पिंपळगांव काळ्याचे हातची नि० असे

१ किसन वा मारुती हातची निशाणी असे

नो० नं० ४

## जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार याजकडून—सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे भिमराव वा करतबराव देशमुख रा. चांदूर बिस्वा ता. मलकापूर व इतर सेट सावकार लोक यांस जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं वरील नांवाचा माझा मुलगा हा योग्य चालीचा नसून वाटले तसें वागण्यास प्रवृत्त झाला आहे. व वाटेल ती चैन करीत आहे. आतां त्याला पैशाची मदत नसून तो अशा तऱ्हेचा असल्यानें तो आमचेकडून वेगळा राहात आहे त्यास सहा महिने झाले व तो लोकांचे कर्ज काढीत आहे तरी सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं वरील माझे मुलास कोणी कर्ज वगैरे देऊं नये व त्याजपासून कोणत्याही प्रकारें इस्टेटी संबंधानें व्यवहार करूं नये. त्याज बद्दल मी अगर माझी इस्टेट जबाबदार राहाणार नाहीं. कळावें ता. १३-१२-१७ दस्तूर रामराव टिकाराम

सही

करतबराव दर्याजी रा. चांदूर बिस्वा ता. मलकापूर

नो. नं. ५

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेट सावकार रोहोण व ता० खामगांव

यांसः—

मी खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते की जानराव वा सखाराम देशमुख रा. रोहोण यांस आह्मी कोर्टाचे कामास मुखत्यार या नात्यानें नोकर ठेऊन ५ पांच रुपयाचे स्टॉपावर ता. २०-८-१९०१ इ. रोजीं रजिष्टर करून दिले होते. करतां तुह्मास आह्मी नोकरीवरून सोडून तुमचा हिशेब चुकता करून देऊन कोणतेच प्रकारें देवघेव राहिली नाहीं. आमचे वती कोणाशी व्यवहार कोणतेच करतां तुमचे मुकत्यार पत्र ता. ८-१-१७ इ. पासून रद्द केले आहे कळा

ता० २५-१२-१७

सही

देव किसन सदासूक मारवाडी रा रोहण मारवाडींत सही असे

नो. नं. ६

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटिशीनें उत्तमराव क सीराव देशमुख रा० गोर्धा ता० आको जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इनकडून कळवि ण्यांत येते कीं तुह्मी अंदाज आठ न वर्षें झालीं तेव्हांपासून माझे कुलमुखत्या होते. तरी वरील सालांपासून आजपावेतो हिशोब मुळींच दाखविला नाहीं व पां वर्षें झालीं मला निम्मे शेत मिळाले त्याचे उत्पन्न हि आजपर्यंत दाखविलें नाहीं. अशा तुमची चालचलणूक पाहून तुमचें मुख त्यारपत्र रद्द केले आहे. आजपासून तुह्मी माझे शेतासंबंधीं व इतर देवघेव व दि वाणी मुकदम्यासंबंधीं माझे तर्फे कोणत्या प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास य नोटिशीनें रद्द असे. याशिवाय माझे तुम चेजवळ जे कागदपत्र व हिशोबवगै आहे तो ही नोटीस पावतांच माझे स्वाधी करवें तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजवी केली जाईल. कळावें तारिख ३० मा दिसेंबर सन १९१७ दस्तुर गोविंद शि वराम रा० रौंदळ ता० आकोट

सही

मनी जवजे उत्तमराव रा० रौंद ता० आकोट निशानी खुद्द हा तची आंगठा असे

नो नं. ७

## जाहिरात

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें कळवितो कीं माझा मुलगा नामे हरी वा मारुती माळी वाटे राह णार निमगांव यांस कोणीच कर्ज वगैरे देऊ नये कारण तो दुर्व्यसनी लोकांबरोबर रहातो. त्याला कोणी कर्ज दिल्यास त्याज बद्दल माझेवर अगर माझे असलेल्या इस्टे टीवर कांहींच बोजा वगैरे राहणार नाह तारीख १-१-१८ इ. द. नारायण मारुती

सही

मारुती वेडूजी माळी वाटे कसे निमगांव ता. मलकापूर जि बुल्ढाणे द. खु

नो. नं ८

## नोटीस.

विद्यमान सब जज साहेब कोर्ट खामगांव सक्सेसन मु. नंबर १४ सन १९१७

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आग्याराम नवलमल मारवाडी हा मौजे काकनवाडा तालुके जळगांव येथें मरण पावला. तो मौजे पातुर्डा तालुके जळगांव येथील राहणारा होता. त्यास वारस त्याची बायको तुळसाबाई ही असून उदेराम नवलमल हा त्याचा भाऊ आहे. व छगनीराम हजारीमळ हा पुतण्या अहे, व लुणकी ही मुलगी आहे. मैताचे जिनगीबद्दल वारसाचें सर्टीफिकीट मिळावे ह्मणून तुळसाबाई जवजे आग्याराम मारवाडी राहणार पातुर्डा तालुके जळगांव हिनें अर्ज केला आहे. त्याचें चौकशीची तारीख २६।१।१९१८ इसवी चीं नेमली आहे; करितां अर्जदारीन हिजला सर्टीफिकीट देण्यासंबंधनीं कोणाची हरकत असल्यास त्यानें वरील तारखेस सकाळीं १० वाजतां आमचे समोर हजर व्हावे.

आज तारीख २ माहे जानेवारी सन १९१८ इसवी रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्या निशीं दिली.

सही

R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

N. N. 9

## नोटीस

विद्यमान सबजज्य साहेब कोर्ट खामगांव सक्शेशन मु. नं. १३ सन १९१७

सर्वत्र लोकांस कळविण्यात येते कीं मौजे कठोर ता० जळगांव जिल्हा बुलडाणा येथें चतुरभुज डोंगशिंग मारवाडी हा ता. ८-३-१७ इ. रोजीं मरण पावला. त्यास वारस त्याची चुलत भावजई नामें फुली मर्द लछीराम मारवाडी राहणार बावनबीर तालुके जळगांव ही असून हिनें वारसाचें सरटिफिकिट मिळावे ह्मणून अर्ज केला आहे. त्याचे चौकशीची तारीख ९-२-१८ इ. ची नेमली आहे. करितां अर्जदारीण हिजला वारसाचे सरटिफिकिट कां दिले जाऊ नये यानें कारण दाखविणें असल्यास त्यांनीं वरील तारखेस आमचे समोर सकाळीं १० वाजतां हाजर व्हावे. आज तारीख २ माहे जानेवारी सन १९१८ इ रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

R. M. Wathodker
Sub Judge
Khamgaon

N. N. 10

॥ श्री ॥

## श्री समर्थ मुद्गलश्वर खटेश्वर महादेव संस्थान राहित साहित ता. आकोला (वऱ्हाड)

श्री संस्थान राहित येथें अनाथ लंगडे पांगळे खुळे यांचे जीवनार्थ श्री बाबांचे आशिर्वादानें एक अन्नसत्र सुरू केलें आहे. चालविणार श्री समर्थ आहेत. तरी या सत्कार्यास पुण्यप्रीत्यर्थ अवश्य शक्त्यनुसार मदत करावी. या कार्यास राहित येथील कांहीं धर्म परायण मंडळींनीं बरीच मदत केली आहे. त्यांत विशेषतः रा. अवचितराव बापू, पांडोबा, माधवराव, दौलतराव, गोपाळराव, वगैरे मंडळींची मदत ३।४ हजार रुपयापर्यंत पोचली आहे. वरील सत्कृत्यास इतरांनीं हा हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

श्रीचा नम्रदास
गणेश्वर बाबा साधु
रा. संस्थान राहित
ता. आकोला (प्रांत वऱ्हाड)

नो. नं. ११

---

## शेतकी परिषद्.

### (राजश्री स्टांडन यांचें सिंहावलोकन)

ता. २४-१२-१७ च्या अंकावरून समाप्त.

तालुका निहाय संघ याच प्रकारच्या कामाकरितां अस्तित्वांत असतात. मे. डेप्युटी डायरेक्टर साहेबानीं आपल्या रिपोर्टांत असें नमूद केलें आहे कीं सर्व तालूका असोशियेशनच्या (संघांच्या) सभासदांनीं या वर्षांत शेतकीच्या कामीं जास्त कळकळ दाखविली, हें पाहून मला आनंद वाटतो. परंतु मध्यवर्ति ब्यांकेच्या डायरेक्टरांमध्यें आपल्या संस्थांचा प्रसार करण्याविषयीं जी उच्छुकता दिसून येते तीच उच्छुकता या संघांच्या सभासदांतही दिसून आली पाहिजे. ही गोष्ट खरी आहे कीं त्यांनाही सरकारी आधिकाऱ्याच्या मदतीचा फायदा मिळालाच आहे. परंतु माझा अनुभव असा आहे कीं ते स्वतःच्या उच्छुकतेनें व बळानेंच तालूका संघाच्या सभासदापेक्षा जास्त काम करून दाखवितात. तालूका निहाय संघानीं शेतकऱ्यांत आपलें वजन वाढविण्याचे योग्य ते सर्व उपाय केले पाहिजेत. खामगांव आणि अकोट तालूका संघांनीं ज्या पद्धतीचा अवलंब केला अहे तशा पद्धतीनेंच फार उत्तम सुरवात करितां येते. ह्मणजे शेती सुधारण्यास शेतकऱ्यांना जीं आउतें, बियाणें व खतें लागतात तीं त्यांना मिळवून देण्याची व्यवस्था करणें ही ती पद्धत होय. जेव्हां शेतकऱ्यांना असें दिसून येईल कीं या संघापासून त्यांना कांहीं तरी उपयुक्त जिनसा मिळतात तेव्हांच ते त्या संघांच्या उद्देशाकडेस सहजच जास्त लक्ष्य देतील. उदाहरणार्थ सुधारलेलीं आउतें विकण्याचा प्रयत्न केल्यानें तालूका संघांच्या सभासदांचा शेतकऱ्यांशीं जास्त निकट संबंध येतो आणि हा संबंध योग्य रीतीनें वाढविल्यास सर्व तालूकाभर एक संस्था स्थापन करण्याचा पाया घालता येतो. आपण ऐकलेंच कीं राव बहादूर देशमुखांच्या सूचनेवरून शेतकी सभेनें असा ठराव केला आहे कीं तालुका संघ हे हिशेबाच्या भांडवलाच्या तत्वावर स्थापन झालेल्या पतपेढ्यांप्रमाणेंच रजिष्टर केले जावे. शेतकी सुधारणेच्या संस्थासंबंधानें ही अतिशय महत्वाची पायरी आहे. पतपेढी कायद्यान्वयें रजिष्टर केलेल्या शेतकी संघांसंबंधीचे पोट नियम चालू सालीं नियम फारच महत्वाचा व लक्ष्य देण्या जोगा आहे. कारण या नियमान्वयें सदरहू संघाच्या उपयुक्ततेची वाढ करितां येते. पोटसंघ सदरहू पोट नियम बरोबर रीतीनें पाळतात किंवा नाहीं आणि विशेषतः १४ व्या नियमांत ज्याचा उल्लेख केला आहे तो बचत फंड राखून ठेऊन त्याचा उपयोग करितात किंवा नाहीं याकडेस तालूका संघांनीं लक्ष्य दिलें पाहिजे. याच संबंधानें रायसाहेब भयालाल दुबे यांच्या सूचनेवरून कॉन्फरन्सनें पास केलेल्या दुसऱ्या एका ठरावाकडेस आपण लक्ष द्यावें असें मी सुचवितों, तो ठराव असा आहे कीं आपल्या पैकीं प्रत्येक सभासदानें आपली जमीन सुधारण्यास कोणता उपाय अमलांत आणावा याकडेस विशेष पद्धतशीर लक्ष्य दिलें आहे कीं नाहीं हें शेतकी संघाच्या सभासदांनीं पहावें. असें केल्यानें शेतीची सुधारणा होऊन शिवाय सहकारी तत्वाचा हा प्रसार होईल.

३ आपणांस हें माहित आहे कीं हिंदुस्थानात लांबधाग्याच्या कापसाखालीं असलेल्या जमिनीचें क्षेत्रफळ वाढविण्याच्या शक्यते संबंधानें चौकशी करण्याकरितां एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. सदर्हू कमेटीस वऱ्हाडांत अशी माहिती मिळाली आहे कीं इतर जातीच्या कोणत्याही कापसापेक्षां रोझियम कपसापासून शेतकऱ्यास जास्त फायदा मिळतो; आणि रोझियम कापसाच्या बरोबरीनें किंवा जास्त फायदा लांबधाग्याच्या कापसापासून होईल असें आढळून आल्यावांचून शेतकरी लांबधाग्याच्या कापसाची लागवड प्रचारांत आणण्याचा प्रयत्न करणार नाहीं. सर्व जातीच्या जमिनींत पेरला असतां तुह्माला रोझियमपेक्षां जास्त फायदा देणारा असा लांबधाग्याचा कोणता ही कापूस हल्लींच्या काळीं या खात्यास माहीत नाहीं. परंतु बूरी जातीचा लांबधाग्याचा कापूस मात्र कांहीं विवक्षित वस्तुस्थितींत तुह्माला रोझियमपेक्षां जास्त फायदेशीर होईल. अकोल्याच्या फार्ममध्यें आपण या कापसाची लागवड पाहिली आहे व कदाचित इतरत्रही तुह्मी ती पाहिली असेल. दिसण्यांत तो रोझियमपेक्षां बुगली सारखा जास्त गोंडस दिसतो. त्याचा लांबधागा असून त्यापासून आणखी असा एक फायदा आहे कीं त्यावर उधई पडत नाहीं. त्यांत एक मात्र अवगुण आहे तो हा कीं खताशिवाय त्याची लागवड फायदेशीर होऊं शकत नाहीं. अकोट तालुक्या सारख्या जमिनींत ह्मणजे जेथें उधई फार जास्त लागते अशा भागांतील खतवलेल्या उत्तम जमिनींत रोझियमपेक्षां बूरी कापूसच जास्त चांगला होतो. ह्मणून उधईनें गादलेल्या उत्तम वर्गाच्या जमिनी आपणांपैकीं कोणाजवळ असून त्यांत खत घालण्याची ऐपत असल्यास रोझियमपेक्षां बूरी कपाशीची लागवडच आपणास जास्त फायदेशीर होईल. मात्र येवढें लक्षांत ठेवावें कीं तुमची जमीन उधईनें गादलेली, उत्तम वर्गाची आणि खतवलेली असली पाहिजे. यंदाच्या सालीं सारखें आहे. तरी पण आपल्या पैकीं एखाद्या गृहस्थास वाटल्यास व त्याचे जवळ वर नमूद केलेल्या प्रकारची जमीन असल्यास त्यानें अकोला फार्मवर बियाची मागणी करावी व शक्य असल्यास त्यास तें बी मिळेल.

४ सरते शेवटीं शेतकरी वर्गानें वॉरलोन (युद्ध कर्ज) देण्यांत जी लक्षांत ठेवण्यासारखी सढळ हातानें मदत केली त्या मदतीबद्दल आपण त्यांचे प्रतिनिधी या नात्यानें मी आभार मानितों. वर्तमानपत्रांतून वॉरलोनच्या वर्गण्यांचे हिंदुस्थानांतील पुष्कळ जिल्ह्यांतील प्रसिद्ध झालेले आकडे मी पाहिले आहेत आणि ह्यावरून कराची, आमदाबाद वगैरे सारखीं फारच मोठीं शहरें ज्यां काहीं थोड्या जिल्ह्यांतून आहेत ते जिल्हे खेरीज करून इतर कोणत्याही चार जिल्ह्यांनीं वऱ्हाडांतील चार जिल्ह्यांइतकी वर्गणी दिलेली नाहीं हें माझें ह्मणणें बरोबर आहे असें मला वाटतें. आपण आणि आपल्या शेतकरी बांधवांनीच या वर्गणीचा बराच मोठा भाग दिलेला आहे ही गोष्ट आपणास अभिमान बाळगण्यासारखी आहे. ज्यांनीं ज्यांनीं वॉरलोनला वर्गणी दिली आहे त्या प्रत्येकानें आपली थोडीशी गैरसोय झाली तरी शक्य असल्यास सदरहू रकम सरकाराकडेस राहूं द्यावी. हें त्याचें कर्तव्य आहे हें मी आपणास कळकळीनें सांगतों. कांहीं भागांतून मोठमोठ्या रकमा पोस्टांतून काढल्या गेल्या आहेत. मी स्वतः चौकशी केल्यावरून व इतर माहितीवरून मला असें आढळून आलें आहे कीं ज्यांनीं पैसा काढून घेतला त्यापैकीं बऱ्याच लोकांना त्याची वास्तविक जरूरी नव्हती. कांहीं गप्पा पसरल्यामुळें अथवा सरकारला मदत करण्याच्या कर्तव्याची पुरी जाणीव त्यांना न झाल्यामुळें त्यांनीं हा पैसा काढून घेतला. यंदा कपाशीचें पीक अगदीं कमी आहे हें मी विसरलों नाहीं, परंतु कपाशीचा भाव फार उत्तम असल्यामुळें वीस वर्षांपूर्वी ह्मणजे बंदोबस्ताच्या वेळीं सोळा आणे पीक आलें असतां जी रकम वरांत येत असे तितकीच रकम हल्लीं हा ह्मणजे चार आणे पिकास देखील येत आहे. जवारीचें पीक चांगलें आहे व भाव ही तेजीचा आहे. ह्मणून सदर्हू वॉर लोनचा पैसा पोस्टांतून काढून घेण्याची चळवळ बंद करण्याकरितां आपण आपलें वजन खर्च करावें असें मी आपणास सांगतों. आपला पैसा सरकारजवळ पूर्णपणें सुरक्षित आहे व जे लोक तो सरकारजवळ राहूं देतील त्यांना भरपूर व्याज ही मिळेल. मागितल्यास पैसा ही परत मिळेल. परंतु आपण स्वतः हें पूर्ण समजून घ्यावें व इतरांच्या मनावर हें पूर्णपणें ठसवून द्यावें कीं शक्य असल्यास पैशाची मागणी करूं नये. आतां पुढील वर्षी आपणास भरपूर पीक मिळेल आणि भाव ही तेजीचे राहतील आणि त्यामुळें शेतकी सुधारणेचें पाऊल पुढें पडण्यास अतीशय योग्य अशी परिस्थिति उत्पन्न होईल अशी आशा दर्शवून मी आपली रजा घेतों.

वऱ्हाडसमाचार

मार्गशीर्ष वद्य १० पिंगल संवत्सर १८३९

## मराठा शिक्षण परिषद

गेल्या २७-२८ व २९ या तारखांना या परिषदेच्या बैठका खामगांव येथें इतक्या सुंदर यशस्वी व कल्याणकारी झाल्या कीं आम्ही वऱ्हाडच्या मराठा मंडळींचें व विशेषतः खामगांवच्या मंडळीचें या उत्तम सुयशाबद्दल अभिनंदन करितों. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षपणानें परिषदेच्या कार्याला विलक्षण महत्व आलें; आणि सर्व मराठे बांधव मोठ्या धैर्यानें विद्याप्रसाराचें कार्य मोठ्या विस्तृत प्रमाणावर सिद्धीस नेण्याच्या खटपटीला लागले आहेत. मराठशाहीचा हा ईश्वरभाव व विद्याभक्ती पाहून आम्हास अत्यानंद वाटतो. आमच्या हिंदु वर्गांतला हा मराठा समाज विद्यादानाच्या पवित्र कार्यांत एवढा पुरस्कार घेत आहे हें आमचें सद्भाग्य होय. मराठ्यांचा हा दृढनिश्चय हिंदू वर्गांतल्या इतर समाजांना चांगली जागृती आणील, विद्येचे संस्कार आबाल वृद्धांस पावन करूं लागतील, आणि हिंदराष्ट्राची स्वराज्याची महत्वाकांक्षा आपल्या अमृत फलांनीं ब्रिटिश साम्राज्याला अधिक वैभवशाली करील असा दृढभाव या परिषदेंत झालेल्या बहुविध कार्यक्रमाकडे पाहतां उत्पन्न होतो आणि नव्या नव्या आशा मनामध्यें उत्पन्न होऊन आम्हास आमच्या मराठा समाजाविषयीं थोर अभिमान वाटतो.

खामगांव येथील स्वागत अध्यक्षांच्या राजधानीला देखील शोभणारें असें स्वागत हीं थाटावर झालें. स्वागत कमेटीचे अध्यक्ष रावबहादुर केशवराव जानराव देशमुख यांनीं आपल्या स्वागतपर भाषणांत परिषदेच्या क्षितीजाचें मार्मिकपणानें व मुत्सद्दी दृष्टीनें दर्शन घेतलें आहे. त्यांच्या समग्र भाषणांत परिषदेचा कार्यमहिमा त्यांच्या अंतःकरणांतील जोरदार विचार रत्नांना बाहेर काढीत आहेत असाच क्षणभर भास होतो. त्यांच्या भाषणांत कोठें ही फाटाफूट किंवा दुही उत्पन्न करण्याचा प्रयत्न नाहीं; इतकेंच नव्हेतर त्यांच्या नेहमींच्या एकीकरणाच्या वृत्तीप्रमाणें हिंदू समाजाचा गौरव अधिकाधिक होत जाईल असेच जोराचे विचार मराठा मंडळींना पुढें पुढें नेत आहेत. त्यांनीं वर्णिलेली ही “मराठ्यांची मर्दुमकी” कोणाला उत्साहानें प्रेरित करणार नाहीं बरें!

### मराठ्यांची मर्दुमकी

“या लढाईत हिंदुस्थानानें व त्यांत मराठ्यांनीं केलेली कामगिरी अलोट आहे ही गोष्ट हिंदुस्थान सरकार, विलायत सरकार, व मित्र राष्ट्रें यांनीं मराठ्यांचे जे पोवाडे गायले आहेत त्यावरून व्यक्त होईल. मराठ्यांच्या शौर्याबद्दल संशय कधीं होता? चवदाव्या शतकाच्या आरंभापर्यंत तर मराठ्यांचा अंमल दक्षिणेकडे अप्रतिहत होता व पुढें दोन शतकेंपर्यंत मुसलमानी अंमलाची छाया जरी नर्मदेच्या दक्षिणेकडे पडली तरी ती नुसती छायाच होती. आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही वगैरे सर्व शाह्यांचे आधारस्तंभ व नेते मराठेच होते. मुसलमानी अंमलांत मराठ्यांचें सत्व कधीं ही नाहींसें झालें नव्हतें. मोरे, शिरके, घाटगे, घोरपडे, गुजर, माने, डफळे वगैरे मराठी कुलें आदिलशाही, कुतुबशाही सावरीत होते तर जाधवराव, भोंसले हीं घराणीं निजामशाहीस हात देत होतीं. जाधवांचे वंशाचा व या जिल्ह्याचा फार निकट संबंध आहे. या वंशानें प्रत्येक कालांत आपला प्रमुखपणा प्रामुख्यानें राखिलेला दिसतो. पुराणकालचा मथुरेचा व द्वारकेचा यदुवंश पहा, किंवा मुसलमानी स्वाऱ्यापूर्वी श्रीनगर, द्वारसमुद्र, दौलताबाद येथील राज्य करणारे यादव पहा; किंवा मुसलमानी अमलांत प्रथम निजामशाहीस व पुढें मोंगल बादशहांस आधारस्तंभ झालेले आमचे जिल्ह्यांतील शिंदखेड येथील लखुजी राजे जाधव घ्या, जाधवांचा मोठेपणा सर्व कालांत दिसून येतो. लखुजींच्याच वंशांत मातुश्री जीजाबाईनें जन्म घेऊन आपला मुलगा श्री शिवाजी महाराज यांस उपदेश करून व उत्तेजन देऊन मराठे बादशाहीची स्थापना करविली व आपल्या मराठ्यांची यशोदुंदुभी त्रिखंड ऐकविली. या श्री शिवाजी महाराजांचे मातुल वंशांतील सध्यांचे पुरुष राजे श्री जगदेवराव साहेब आमच्या स्वागत कमेटींत प्रमुख असून आपल्या परिषदेस हजर आहेत तेव्हां अशा इतिहासप्रसिद्ध मराठे वीरांनीं सध्या ब्रिटिश सार्वभौम सत्ता राखण्याकरितां युरोपांत व आशियांत आपली तलवार गाजविली यांत मराठ्यांनीं आपलें श्रीदात्यानें कर्तव्य तेंच केलें.”

श्रीमंत शाहू छत्रपती यांनीं आपल्या अध्यक्षनत्याच्या संभाषणांत स्वराज्याचें गाणें गाइलें आहे. पण त्याच्या संभाषणाचा लेख आम्हांस अद्याप न मिळाल्यामुळें अधिक कांहीं लिहितां येत नाहीं. तरी त्यांच्या स्वराज्याच्या कल्पनेंत लॉर्ड सिडनहॅम हे जेथें तेथें घोटाळे आहेत. आणि लॉर्ड सिडनहॅम हे इंडियाच कट्टे द्वेष्टे असल्याबद्दल त्यांच्या विलायतच्या वाक्विलासांनीं सर्वांची खात्री केली आहे. जातींच्या निर्बंधांचें वेडे स्वराज्याच्या मार्गांत श्रीमंत छत्रपतींनीं आडवें उभें केलें आहे; पण हींच संकटें श्री शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करतांना कधींच डोंगरप्राय वाटलीं नाहींत. आतांचा काल महिमाच व सिडनहॅमचा ससेमिरा इतका बलवत्तर आहे कीं, त्याच श्री शिवाजीच्या गादीच्या एका शाखेचे अधिकारी आपल्या स्वराज्याचा सुरांत देखील असें बेसूर काढतात!

पहिले दिवशींच्या समारंभाला आमचे कमिशनर साहेब राजश्री स्लॅडन हे हजर होते. ही गोष्ट त्यांच्या मनाची थोरवी सांगते. त्याशिवाय त्यांनीं शिक्षणाच्या फंडाला आपली वर्गणी ही दिली आहे असें ऐकतों. श्रीमंत खासेराव जाधव साहेब यांनीं वऱ्हाडांत मराठा हायस्कूल काढण्याचा प्रश्न लोकांपुढें मांडला, तेव्हां ईर्षेनें त्याच बैठकीला १ लाख रुपयांचे आकडे पडले ही मोठी हर्षाची गोष्ट होय.

## हस्तांदोलन.

### ( मॉंटेग मानपत्रें )

राजश्री मॉंटेग हे देवमूर्ती सारखे बसतात, ह्मणूनच त्यांच्यापुढें मानपत्रें ह्मणजे प्रार्थनास्तोत्रें फक्त वाचण्यांत आलीं. जे थोर थोर गृहस्थ त्यांच्या दर्शनास गेले त्यांना हस्तांदोलनचा लाभ झाला अशी टीका सामन्यदृष्टीनें बाहेर येत चालली आहे. अर्थांत ज्या कांहीं विशिष्ट गृहस्थाबरोबर त्यांचे सुखसंवाद झाले, त्यांना त्यांच्या बुद्धिमत्तेचा व मतवैचित्र्याचा लाभ मिळाला असला पाहिजे. पण हे सुखसंवाद गुप्त ठेवावयाचे असतात, तेव्हां त्या संबंधांत राष्ट्रीय पृच्छा शांत होण्याला अवसरच नाहीं. बाकी जे डेप्युटेशनवर गेले ते निराशेच्या वाणीनें असे ही बोलले कीं एवढा जाण्यायेण्याचा खटाटोप व खर्च करण्यापेक्षां पोस्ट ऑफिसाच्या द्वारानें ही गोष्ट किती तरी सुखकर व सोयीची अशी झाली असती. आह्माला हा निराशेचा वाद मान्य नाहीं. हस्तस्पर्श ही एक मोहनी विद्येंतली प्रक्रिया आहे आणि ज्या दोन व्यक्ती परस्पर हस्तांचें आंदोलन करितात ते आपले प्रेमसंदेश कळवितांना त्यांच्या बरोबर परस्पर उदात्त विचार, थोर थोर महत्वाकांक्षा व भावी कार्यांच्या प्रेरणा यांची अदलाबदल करीत असतात असा अनुभव आहे. तेव्हां राजश्री मॉंटेग हे जव्हां आपल्या विचार गुंगेंत जाऊन बसतील व त्याच्यापुढें या मानपत्राच्या द्वारानें राष्ट्रीय अंतःकरणें त्यांच्याशीं बोलूं लागतील तेव्हां ते आपला भावी कल्याणमय मंत्र श्रीमंत चक्रवर्ती बादशहास सांगण्याला उद्युक्त होतील. या नव्या मंत्रांतच त्यांच्या मंत्रीपणाचें ब्रीद जगास दिसून येणार आहे. आह्मी उमेद करतों कीं त्यांची ही इंडियाची सफर इंडियाचे मनोरथ परिपूर्ण करील.

## प्रिव्ही कौंसिल.

मध्यप्रांततर्फे दाखल झालेल्या मानपत्रांमध्यें प्रिव्ही कौंसिलची संस्था विलायतेंत असण्यापेक्षां हिंदुस्थानांतच स्थापित होईल तर न्यायाचा कारभार सुलभ, सत्वर व कमी खर्चाचा होऊन आतां प्रमाणेंच लोकांची दाणादाण होणार नाहीं.

## वऱ्हाडचीं मानपत्रें.

वऱ्हाड तर्फे दोन मानपत्रें मुंबई मुक्कामीं अर्पण करण्यांत आलीं. एक वऱ्हाडच्या प्रांतिक कांग्रेस कमिटीच्या मार्फतीनें दाखल करण्यांत आलें आणि दुसरें लोकांच्या वतीनें दाखल करण्यांत आलें. दोहोंचा ही मजकूर कमी अधिक विस्तृत असून तात्पर्य एकच आहे. रावबहादुर मुधोळकर यांनीं हीं दोन्ही मानपत्रें फार प्रसंसनीय रितीनें तयार केलीं आहेत आणि या प्रयत्नाचें श्रेय मुख्यतः त्यांच्याचकडे आहे.

या दोन्ही मानपत्रांत सर्व हिंदुस्थानच्या मागणीचा पुनच्चार असून वऱ्हाडाची राजकीय रचना निराळ्या स्वतंत्र ब्रिटिश मुलखाप्रमाणें असावी, आणि हा प्रांत एक कोटी प्रांतिक वसुलाचा असून चीफ कमिशनरच्या अमलाखालील मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून २॥ कोट रुपये वसूल बाकीचा प्रांत आहे. वऱ्हाडचे ६५ लक्ष रुपये सालिना बादशाही खाजिन्याकडे जातात आणि सुमारें ३०।३५ लक्ष रुपये मध्यप्रांताच्या खर्चाकडे जातात. अशा या संपन्न प्रांताला निराळें कायदेकौंसिल असावें व एक्झिक्युटिव्ह कौंसिलमध्यें वऱ्हाडचे दोन सभासद पाहिजेत. वऱ्हाडच्या उत्पन्नांतून सरासरी शेंकडा ३० या प्रमाणानें उत्पन्न मध्यप्रांताच्या उपयोगा करितां खर्च होत असतें ही गोष्ट बंद झाली पाहिजे इ. इ. महत्वाच्या गोष्टींचा चांगला स्पष्ट उल्लेख करण्यात आला. सारांश, वऱ्हाड हें नवें स्वतंत्र संस्थान समजून त्याला प्रांतिक स्वातंत्र्य असावें अशी मागणी आहे.

## अभिनंदन.

### ( निजाम सरकारचा धन्यवाद )

इंग्रजी नव्या सालाच्या पाडव्यानिमित्त या सन्मानाच्या पदव्या व तोफांच्या सलामी व पदकें देण्याविषयींचा सरकारी जाहिरनामा फार मोठा आहे. त्यामध्यें कर्नल हिजहायनेस आसफजाह मुजाफर-उल-मुल्क वल्मालिक-निजामउल्मुल्क निजाम उद्दौला नवाब मीर, सर, **उस्मान अली खान** बहादुर फत्तेजंग जी. सी. एस. आय. जी. बी इ. हैद्राबादचे निजाम सरकार यांनीं केलेल्या युद्धाच्या मदती बद्दल **‘हिज एक्झॉल्टेड हायनेस’** असा वंशपरंपरेचा किताब देण्यात आला आहे. त्या शिवाय त्यांना **‘ऑनररी लेफ्टनंट जनरल’** हा ही लष्करी सन्मानाचा हुद्दा देण्यांत आला आहे. या बहुमानानें श्रीमंत चक्रवर्ती साहेबांनीं निजाम सरकारच्या दौलतीला जें अग्रस्थान दिलेलें आहे त्या बद्दल आह्मा वऱ्हाड प्रांताच्या मंडळींना मोठा अभिमान वाटतो.

## लोकमान्य पदव्या.

### ( राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची मंजुरात )

ज्यांनी आपली कामगिरी मोलाला लावली आहे त्या चाकरांचा गौरव पदव्यांनीं जेव्हां सरकार करते तेव्हां बहुतेक प्रकार आपली आपणच पाठ थोपटण्यासारखा होतो. पदव्या दिल्या ह्मणून पगारांची बढती ही कांहीं बंद होत नाहीं. सरकारी चाकरांना हा पदव्या देण्याचा क्रम बंद होईल तितका बरा. सरकारी चाकरांना पदव्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांच्या मंजुरातीनें देण्याचा निराळा क्रम सरकारनें सुरू केला ह्मणजे ही चाकर मंडळी आपले धनी ह्मणजे जो लोकसमूह त्याच्या कार्याला अधिक तत्पर राहातील, आणि हल्लींप्रमाणें बादशहाच्या नांवावाली सर्व पदव्यांचे मान मरातब आपआपसांत वाटून घेणार नाहींत.

## नामाभिधान

### ( स्लॅडन कीं दामले )

अकोला जिल्हाबोर्डानें श्री तुकाराम मंगलकार्यात १३

[illegible]

सुखानें जाते. या रस्त्याचें नांव 'स्टँडन रोड' असे नामदार चीफ कमिशनर यांच्या हातून ठेवण्यांत येण्याचा समारंभ लौकरच होणार आहे. आह्माला हा अनौचित्याचा प्रकार वाटतो. एखाद्या रस्त्याला चिरकाल चालावे एवढा राजश्री स्टँडन यांचा दीर्घकालीन परिचय ही नाहीं किंवा त्यांचा मोठासा उपकार ही आह्माला माहीत नाहीं. कोणाचाही गौरव करावयाचा असेल तर तो पगारी मंडळीपेक्षां बिनपगारी मंडळीच्या वाट्यास प्रथम आला पाहिजे. रावबहादुर भागवत किंवा रावबहादुर दामले यांनीं या जिल्हा बोर्डांत पुष्कळ वर्षे उत्कृष्ट लोकसेवा केलेली आहे; तेव्हां त्यांच्याच नांवानें या नव्या रस्त्याचा नामनिर्देश व्हावा असें सत्यदृष्टी राजश्री स्टँडन ही कबूल करितील व ते आमच्या कटुवाक्योपदर्शीतील अमृत लोकांपुढें जरूर आणतील असा आह्मांस भरंवसा आहे.

## व्यापारी घडामोड.

### (लढाईचीं शुभचिन्हें.)

गेल्या ३ वर्षाच्या लढाईमुळें हिंदुस्थानच्या व्यापारामध्यें जी मोठी क्रांती झाली आहे तिला पूर्वीच्या इतिहासांत दुसरा दाखला क्वचितच मिळेल. हिंदुस्थानच्या मालाला भाव चांगला येऊन तो देशांतरावर पूर्ववत् पुन्हा जाऊ लागला आहे ही गोष्टच ब्रिटिश सरकारच्या स्थैर्यासंबंधीं जो लोकांचा मोठा विश्वास आहे त्याची साक्ष देते. सुमारें २ अब्ज ४० कोट ८८ लक्ष रुपये किंमतीचा माल बाहेर पाठविण्यांत आला, आणि १ अब्ज ४९ कोट ६२ लक्ष रुपये किंमतीचा माल यां देशांत परत आला ह्मणजे जवळ जवळ ९१ कोटीच्या मालाचा निर्गत आयातपेक्षां अधिक आहे. देशी निर्यात मालसंबंधाचा जो हा मोठा विस्तार झाला त्यावरून लढाईचा औद्योगिक धक्का आपोआप कमी होत चाललेला आहे. आणि ८ अब्ज ९ कोटी १९ लक्ष रुपयांची या व्यापारमुळें अदलाबदल झाली आहे. गेल्या ७ वर्षांत एवढी मोठी देवघेव कधींच झाली नव्हती. १९१० च्या आंकड्यापेक्षां हा आकडा जवळ जवळ दुप्पट एवढा मोठा आहे. सोन्याची नाणीं बहुतेक या व्यापारांत नाहींतच ह्मटलें तरी चालेल. सर्व देवघेवी रुपयांच्या नाण्यांत झालेल्या आहेत. विलायती माल बाह्यराष्ट्राकडून फारसा येत नसल्यामुळें व जो येतो त्याच्या किंमती भलत्याच वाढल्यामुळें लोकांच्या हातांत जो पैसा गेला तो त्यांनीं विलायती माल विकत घेण्याकडे खर्च केला नाहीं आणि लढाईच्या पूर्वकाळाप्रमाणें तितका खेळता राहिला नाहीं ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सरकरा ...हरा बहुतेक बाजारांत दृष्टीसच पडत नाहींत. तथापि मुंबईच्या मोत्याच्या व्यापाऱ्यांना सोन्याच्या नाण्याची फार जरूरी लागल्यामुळें व मेसोपोटेमियांतील लढाईमुळें ... यांच्या गिनीला १६/- एवढी ... होती. परकारी नोटा ... णें

पुष्कळांनीं प्रथमतः बांधलें होतें तें साफ चुकलें आहे. सन १९०० सालीं जेथें २२ कोट १० लक्ष रुपयांच्या सरकारी नोटा व्यापारांत चालू होत्या तेथें १९१६---१९१७ सालीं याच सरकारी नोटा ६७ कोट रुपयावर उपयोगांत आल्या आहेत. सरकारची इभ्रत फार मोठी आहे, लोकांचा विश्वास दांडगा आणि लढाईचा शेवट ही कल्याणकारक होईल असा पूर्ण विश्वास आहे, या तिन्ही गोष्टींमुळें सरकारी करन्सी नोटांचें इतकें महत्व वाढलें आहे हें शुभचिन्हच होय.

## मिठाची महर्घता.

हिंदुस्थानच्या कित्येक भागांतून गेल्या दोन तीन महिन्यांत मीठ इतकें महाग झालें आहे कीं पूर्वी रुपयास २० शेर (वजनी) मीठ मिळत होतें तेथें आतां ८ शेर मिळतें या महागाईच्या कारणाचा शोध करतां असें कळतें कीं व्यापारी लोक सगळें मीठ खरेदी करून संग्रहास ठेवित आहेत, अर्थात सरकारी डिपोंतला साठा संपला ह्मणजे वाटेल त्या भावानें पढें त्यांना तें विकण्यास सांपडेल. हिंदुस्थान-सरकारच्या ध्यानांत हा त्यांचा डावपेंच येऊन त्यानीं यापुढें कांहीं दिवस खाजगी व्यापाऱ्यांना मीठ विकणें बंद केलें आहे, व स्थानिक सरकार व म्युनिसिपालिट्या यांनीं स्वस्त दरानें मीठ विकणारीं दुकानें उघडण्याविषयीं उपदेश केला आहे. त्याप्रमाणें पंजाबांत एक दोन ठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांनीं अशीं दुकानें उघडण्यास सुरुवात ही केली असल्याचें वर्तमान आलें आहे. असेंच व्यापारी द्रव्याच्या लोभानें गरीबांना मिठासारखा देहरक्षणार्थ अवश्य लागणारा पदार्थ योग्य किंमतीला न मिळूं देता त्याच्या किंमती चढवून आपल्या देशबांधवांना कसे नाडूं पाहतात याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अशा लोकांना तळव्यावर आणण्यासारखी समाजशक्ति आमच्यामध्यें असती तर समाजानें या निर्दय व्यापाऱ्यांवर बहिष्कार घालून त्यांचे डोळे उघडले असते. पण सध्याचा काळ स्वातंत्र्याचा आहे, त्याचा फायदा दुष्टबुद्धि व्यापारी असा अन्यायानें घेत आहेत.

## जो 'हुकुमी' मत.

मुझफरनगरच्या जमीनदारांच्या असोसिएशननें मि. मांटेग्यु यांस दिलेल्या मानपत्रांत एक फार उत्तम आणि विचार करण्यासारखी सूचना केली आहे आणि हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत सुधारणा करण्याबद्दलचा विचार नक्की ठरवितांना त्या सूचनेकडे अधिकाऱ्यांचें लक्ष जाईल असें आह्मी इच्छितों. असोसिएशनची सूचना अशी आहे कीं नव्या सुधारलेल्या कायदेकौंसिलांत मत देण्याचा अधिकार फक्त बिनसरकारी कौंसिलरांनाच असावा. सरकारी सभासदांनीं व सेक्रेटरींनीं कौंसिलांत बसावें, ...

जें कांहीं सांगावयाचें असेल तें सांगावें, पण अखेर मतें मोजण्याच्या वेळीं त्यांनी अनुकूल किंवा प्रतिकूल असें कांहींच मत देऊं नये. असें कांहीं झाल्याशिवाय सर्व सरकारी आफिसरांनीं सरकारच्याच बाजूनें मत देण्याची हल्लींची एक प्रकारची सक्तीची व निंद्य पद्धति नष्ट व्हावयाची नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. हल्लींच्या या पद्धतीबद्दल पुष्कळ मोठमोठ्या जाणत्या अधिकाऱ्यांनीं खाजगी संभाषणांतून आपली प्रतिकूलता प्रदर्शित केली आहे. सरकारी अधिकारी नोकर असले तरी त्यांनीं आपला सारासार विवेक सरकारला विकला पाहिजे असें या पद्धतीवरून दिसतें. १९०९ सालीं मोर्ले मिंटो सुधारणाबद्दल पार्लमेंटांत चर्चा झाली तेव्हां या पद्धतीला अनेक पार्लमेंटच्या मेंबरांनीं नांवें ठेविलीं होतीं. आतां तरी ही पद्धति मोडली पाहिजे. आतांपर्यंत झाला तेवढा फार्स पुरे झाला. हिंदीयुरोपियन लोकांच्या संयुक्त सुधारणा योजनेंत ही सरकारी नोकरांना कौंसिलांत मत देण्याचा अधिकार नसावा अशीच मागणी करण्यांत आली आहे. स्वतःचें मत बाजूला ठेवून सरकारच्या हुकुमाप्रमाणें मत देण्याची ही पद्धत सरकारी नोकरांच्या स्वाभिमानाला, व स्वातंत्र्याला विघातक असल्यामुळें नव्या सुधारलेल्या कौंसिलांत तिला स्थान मिळूं नये अशी तजवीज अवश्य झाली पाहिजे.

# वऱ्हाडवृत्त.

रा. ब. एफ. जी. स्लाय, कमिशनर मध्यप्रांत यांस 'स्टार ऑफ इंडियाचा नाइट कमँडर' हा किताब मिळाला. हे वऱ्हाडच्या लोकांना परिचित आहेत. तेव्हां त्यांचें अभिनंदन करतांना लोकांनीं यांना एवढा किताब दिला असतां कीं नाहीं ही पृच्छा आपल्या मनाशींच करण्यास शिकावें.

रा. रा. पुरुषोत्तम लक्ष्मण दामले वकील बुलडाणा यांस 'रावबहादुर' आणि रा. रा. रुक्माजी माणकोजी धात्रक तहशिलदार उमरावती व रामचंद्र कृष्ण केळकर स्टेशन मास्तर आकोला यांस 'रावसाहेब' अशा पदव्या देण्यांत आल्या ही आनंदाची गोष्ट होय

**मॉँटेग पर्वः**— रावबहादुर तात्या साहेब मुधोळकर हे परवा शनिवारीं वकीलांच्या कामानिमित्त येथें आले होते. तेव्हां त्यांनीं आपल्या मित्रमंडळीस मॉँटेग पर्वाची माहिती दिली. तेव्हां रावबहादुरांचा चेहरा प्रसन्न व आशा मुद्रांनीं विरोचित असा दिसला. वऱ्हाडच्या प्रश्नाचा निकाल समाधानकारक होण्याचीं चिन्हें या संवादांत विशेष झळकत होतीं.

**दर्शन लाभः**— लोकमान्य टिळक साहेब हे चालू वर्षे भराचे कांग्रेसचे अध्यक्ष कालरोजीं नागपुरास येणार होते. ते वऱ्हाडांत आकोला मार्गानें आकोट व तेल्हारा येथें लोकांच्या आग्रहाच्या विनंतीस्तव जाणार असून खामगांवास ही एक दिवसाचा मुक्काम व्हावयाचा आहे. आकोट तालुक्यातून निदान ७-८ हजार रुपये स्वराज्य फंडाकडे त्यांच्या स्वाधीन करण्यांत येतील असा सुयोग दिसतो. त्यांच्या दर्शनाविषयीं उत्सुक लोक इतके आहेत कीं त्यांचा मुक्काम केव्हां व कोठें होईल याचें सूचीपत्र त्यांनाच ठरवितां येत नसलें पाहिजे. १९ तारखेपर्यंत पुण्यास जाण्याचा इरादा आहे. कां कीं त्यांना त्यापुढें विलायतच्या मोहिमेची तयारी करावयाची आहे.

**ग्राम पंचायतः**— राजश्री बापूसाहेब जठार यांच्या अध्यक्षतेखालीं भरणाऱ्या या चौकशी कमिशनपुढें ग्रामसंस्था पाहिल्या प्रतीची सुरू करण्यांत यावी ह्मणून ठिकठिकाणचे विचारी लोक चर्चा करू लागले आहेत. ही लोकजागृती ह्मणजे स्वदेशी कमिशनर असल्याचा पहिला लाभ होय.

रा. रा. सयद अब्दुल रहिमान हे आफिशिएटिंग डेपुटि कमिशनर झाल्यानंतर रा० रा. दाराबजी एदलजी संजाना तहशिलदार अकोला हे सबडिव्हीजनल मॅजिस्ट्रट होऊन आकोटचे नायब तहशिलदार रा. रा. शेख उमर हे येथें तहशिलदार होणार आहेत.

**हंगाम**—चालू कपाशीचा किंवा ज्वारीचा हंगाम संपत आला आहे. यंदा पीकें रुपयांतलीं चार आणेही नसून लागवड मसाल्याचा खर्च मात्र अतोनात आलेला आहे. कुळें पाहून साऱ्याची तहकूबी अंशतः देण्याचे हुकूम न सुटतील तर खरे खरे शेतकरी पुष्कळसे मजुरांच्या वर्गांत लोटले जातील अशी भीति आहे.

**पोलीस मेडल**—रा. रा. महमद अक्रमखां पोलीस डेप्युटी सुपरिंटेंडेंट यांस सागरकडील डाकेखोरांस पकडण्यांत मर्दुमकी केल्या बद्दल हें पदक देण्यांत आलें आहे.

**महात्मा गांधी**—हे गेल्या बुधवारीं मेलनें वऱ्हाडांतून मुंबईकडे रवाना झाले; पण त्यांच्या आगमनाची माहिती नसल्यामुळें वऱ्हाडच्या लोकसमूहास दर्शनानें देखील ऋणी होतां आलें नाहीं!

**अनादर**—मराठा शिक्षण परिषदेंत श्रीमंत शाहू छत्रपती व इतर कांहीं वक्ते यांनीं इंग्रजी भाषेंत संभाषण केलें. हा मातृभाषेचा अनादर असून श्रोतृसमाजाच्या कालाचाही अपव्यय होय. मातृभाषेंत सर्व कारभार प्रांतिक कौन्सिलांतून सुद्धां चालावा अशी जेथें विचारक्रांती चालू आहे तेथें इंग्रजी विद्वानांनीं आपलें खरें लोककार्य लौकर समजून घेतलें पाहिजे.

**स्फुर्ती**— यंदाच्या कॉंग्रेसमुळें लोकसमूहांत विलक्षण स्फूर्ती उत्पन्न झालेली आहे आणि वर्षभर हें लोककार्य चालूं ठेवण्यासाठीं मंडळें आतां पासूनच कंबर बांधून सज्ज आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. येत्या संक्रांतीपासून सुरूं होणाऱ्या 'रिणमोचन'च्या यात्रेचा फायदा घेऊन राजकीय जागृती प्रसृत करण्यास ही उत्तम संधि आहे.

# सैन्य भरतीचा पोंवाडा.

(अमोल काया जाइल वाया या चालीवर.)

उठा मर्द हो कसा कंबरा बसा न ऐसे स्वस्थ जरा ।
धरा करामधिं समशेरीला चला शत्रुवर करा त्वरा ॥ धृ० ॥

रावण सम हा जर्मन नृपवर मला मातला धरेवरी ॥
तो दशमुख हा एक मुख परी सकल जगाला त्रस्त करी ॥
झुरे अंतरीं बघुनी वैभवा आंग्ल नृपाच्या परोपरी ॥
धरी मनामधिं कुबुद्धि दुर्जन होतील इंग्रज कधीं अरी ॥
सहजाचि आला योग घडुनिया कसा सांगतों श्रवण करा ॥धरा० १॥

फार्डिनंड राजपुत्र होता आस्त्रीयाचा युवराज ॥
पत्नीसह तो ठार मारिला सरोजिवोला बिनकाज ॥
सार्व्हियनांचें कर्म समजुनी उतराया त्यांचा माज ॥
वृद्ध नृप म्हणे क्रुद्ध होऊनी तयार सेना व्हा आज ॥
खलिता लिहिला अपमानास्पद सार्व्हियाच्या भूपवरा ॥धरा० २॥

सर्व्हीयास्तव रशिया धांवे आस्त्रीयास्तव जर्मन तो ॥
रशियासाठीं फ्रान्स धांवला मधेंच बेल्जम हा मरतो ॥
हे पाहुनिया इंग्रज धांवे जगीं न कोणा जो डरतो ॥
दीन रक्षणा साठीं संतत सशस्त्र कर बरती करतो ॥
असा पेटला जग संहारक चोंहिकडे वन्ही सारा ॥धरा० ॥३॥

बल्गेरीयन तुर्क मिळाले शत्रुकडे झाले चार ॥
जपान, इटली, अमेरिकादिक स्वपक्षी झाले स्वार ॥
सर्व मिळोनी विचार केला करूंच जर्मन बेजार ॥
परी पाहिजे द्रव्यबल तसें मनुष्य बल ही तें फार ॥
यवन आर्य जन तरी शिराहो सैन्यामध्यें भराभरा ॥ धरा०॥ ४ ॥

जर्मन हा सामान्य शत्रुसा नव्हे नव्हे ऐसें जाणा ॥
सशस्त्र सारी प्रजा तयाचा शौर्य हाच ज्यांचा बाणा ॥
कला कुशलता सर्वहि अवगत कपट पटुंचा तो राणा ॥
न्याय सत्य हें मान्य न त्याला म्हणुनि न तो मोतीदाणा ॥
धरा सत्पथा वरा कीर्तिला शूरविर असें नांव करा ॥धरा०॥५॥

उडे आकाशीं बुडे सागरीं दडी देउनी भली बसे ॥
घुसे धरातळि लढे तेथुनी कोणाहि न पाहतां दिसे ॥
नसे शौर्य हें खरें तयाचें मैदानीं तो जरां न बसे ॥
हसें होतसे जगामधीं हें अशी जर्मना म्हणूं ससे ॥
सिंह शार्दुला परा तुह्मी व्हा झेंप घालुनी त्यास धरा ॥धरा०॥ ॥६॥

तुह्मी मराठे जवान सारे सर्द कसे ऐसे बसलां ॥
देखत देखत भ्रांति रसाचा पिऊनि प्याला हा फसलां ॥
शूर शिवाजी अद्भुत गाजी भट जो बाजी ज्यात तुला ॥
तसा गोखला, तात्या, दादा शत्रु जया बघतां सुकला ॥
पवार, शिंदे होळकरांच्या पराक्रमाला नच विसरा ॥धरा० ॥७॥

यवन बंधुहो तैमूर, बाबर, अकबर, नादिर विसरुनिया ॥
कसे बैसलां असें घरामधिं होउनि केवळ आज स्त्रिया ॥
शिरा रणांगणिं परावरि चला चकित करा सारी दुनिया ॥
मिळोनि दोघे कापुनि काढूं ठार करूं जर्मन बनिया ॥
इंग्रज बहादुर उदार राजे इच्छा त्यांची पूर्ण करा ॥धरा०॥८॥

प्रसन्न होऊनि भूप आपुला शस्त्र देतसे तुह्मां करीं ॥
तरी शिराहो सैन्यामध्यें कापुनि काढा सर्व अरी ॥
पुरुषनें पुरुषार्थ करावा शास्त्र सांगतें परोपरी ॥
उगींच बाता ठोकित कैसे स्वस्थ बैसतां बरोबरीं ॥
देशास्तव धर्मास्तव लढुनी रणांगणीं या सुखें मरा ॥धरा०॥९॥

उदंड वाढो राज्य नृपाचें यश ही त्याचें तया सवें ॥
सहजाचि मिळतिल आर्य प्रजेला हक्क हमेशा नवे नवे ॥
सत्याचा जय होईल अंतीं ज्याची करणी त्यास भवे ॥
आज ताठ जो दिसतो जर्मन तोच उद्याला खास लवे ॥
प्रभो विजय दे जार्ज नृपाला लक्ष्मण पसरितसे पदरा ॥धरा०॥१०॥

---

## पत्रव्यवहार

आकोला ता. ३ जानेवारी १९१८

रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ. सा. न. वि. वि. आपण आपल्या ता० ३१ माहे डिसेंबर १९१७ चे अंकांत ग्रामपंचायती संबंधानें "वऱ्हाडवृत्त" ह्या सदराखालीं उल्लेख करून कमिशनमधील मुख्य अधिकारी रा. जठार ह्यांस असा इशारा दिला आहे कीं "त्यांनीं आपल्या मसुद्यांतील ग्राम पंचायत विसरून खरी सत्ता लोकांच्या हातीं राहील असें धोरण ठेवावें" आपण सदहू इशारा देण्यापूर्वी तयार असलेला मसुदा लक्षपूर्वक वाचला असेलच. लवकरच ह्या विषयावर उपांच्या करितां ग्रामपंचायत संस्था अस्तित्वांत यावयाची आहे, अशा खेड्यापाड्यांतील समजूतदार गृहस्थांचें मत घेण्यासाठीं कमिशन काम करण्यांस सुरुवात करणार आहे. अशा वेळीं आपण आपल्या वृत्तपत्रांत मोघम शब्दांनीं सदहू मसुद्याबद्दल सामान्य विरोध न दाखवितां आपणास अमान्य असलेल्या विशिष्ट भागावर घटनात्मक टीका केली असती तर सामान्य जनांना बोध होऊन आपण मार्ग दाखविला असें झालें असते व तसें होणें इष्टही आहे.

अशा परिस्थितींत आपण समग्र मसुद्याचें साग्र पर्यालोचन करून प्रत्येक मुद्यावर सकारण अनकूल व प्रतिकूल विवेचन केलें असतां लोकांपुढें हा विषय पूर्ण प्रतिपादन केल्याचें श्रेय आपणांस मिळून त्या योगानें जनतेला व कमिशन मधील मंडळीस तयार असलेल्या मसुद्याची चर्चा करण्यास मदत होईल. विषय महत्वाचा आहे. व कमिशनच्या कमास येत्या १९ तारखेपासून सुरुवात होणार आहे तरी सदहू पत्रास पुढील अंकात जागा देऊन त्याच अंकात सदहू मसुद्याचें पूर्ण विवेचन होईल अशी आशा आहे. कळावे. आपला

रा. वि. महाजनि.

---

पोंभुर्ले सर डा. भालचंद्र वाचनालय तर्फे—खारेपाटण; जि. रत्नागिरी.

सा. न. वि. वि. आपले पत्राचे ता. २४ मिनहुचे अंकीं प्रसिद्ध झालेली "राष्ट्रीय संध्या" फारच फार नामी आहे. तिचा आह्मी अमरण उपयोग करूं वऱ्हाडचे सन्मान्य साहित्याचार्य रा. ब. प्रोफेसर महाजनि एम. ए यांचे स्नेही, श्री. बापुजी नारायण यांच्या प्रामुख्यानें . साळाबाद प्रो॥ येथील नव्या श्रीक्षेत्र आशावट नांवाच्या रमणीय स्थानीं श्री दत्त जयंत्योत्साह अत्यंत थाटाचा घडला. २।३ हजारावर यात्रा लोटली होती. पांच रोज कथा, पुराणें, भजनें महाप्रसाद वगैरे सर्व पहाण्या लायक झाले. त्यांत जनसमुदायास ३२ व्या हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्षांचा जाहिर संदेश व आपली राष्ट्रीय संध्या स्वभावतः एका भारत सेवक भाईनीं समजाविण्याची व्यवस्था लावली. आर्य भूची होमरूलची मागणी सार्वभौम ब्रिटिश साम्राज्याधिपती कडून यशस्वी होण्याबाबद प्रार्थनापूर्वक नवस करण्यांत आला. लो. मा. दादासाहेब खपर्डे 'नामदार' झाल्याचें कळुन आनंद वाटलेला प्रदर्शीत झाला. हे विनंती.

आपला

आर. एस. जामेकर

---

## नोटीस.

रा. रा. मानाजी वा॥ जानजी माळी राहणार पळसो बढ्याचे तालुके आकोला

यांसी:—

खालीं सही करणार गणु वा॥ नारायण कुणबी राहणार पळसो ता. आकोला

यांजकडून:—

नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझे जवळून माझे मालकीचे वडिलोपार्जीत मौजे पळसो खुर्द ता. आकोला येथील शेत नंबर १०३ पो. नंबर १ एकर ३८३० गुंठे आकार रुपये ९॥ हे शेत ता. २१-१९१८ रोजीं रुपये २००० ला खरीदी घेऊन नोंदून घेतले. व भरणा खरीदीखताचा मौलेदीना अयुबकच्छी यचा हवाला रुपये ३७५ व आबाजी रामचंद्र गरगे याचा हवाला रुपये ४२५ एकूण रुपये ८०० चा हवाला लावून घेतला व राहिलेले रुपयें १२०० चा भरणा मजला न देतां मजजवळून गांवांत पावती करून घेतली व रजिष्टर समोर रुपये १२०० शे भरून पावल्याचे कबूल करण्यास लावले. त्याप्रमाणें बारा शे रुपये मजला अद्यापी दिले नाहीं व हवालेदारास ही रुपये तुह्मी दिले नहीं. तरी ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत तुह्मी मजला रुपयें १२०० द्यावे. गहाणदाराचे हवाल्याचे रुपये त्यांना देऊन त्याच्या पावत्या अगर गहाणखतें वापस आणून द्यावीं. या प्रमाणें न केल्यास तुह्मास करून दिलेलें खरीदीखत रद्द समजले जाईल. पुढें त्या शेताची मी पुढें निराळी व्यवस्था केल्यास त्याजबद्दल तुमचा कोणते ही प्रकारें जबाबदार होणार नाहीं कळावें. ता. ४-१-१९१८ दस्तुर त्रिंबक बळवंत पी० रा० आकोला

सही

१ गणू वा॥ नारायण द० खु०

नो० नं० १२

---

## नोटीस.

नोटीस बेशमी तुकाराम वल्लद पुंजाजी जात कुणबी धंदा शेती रा० मौजे टो ता० वाशीम जिल्हा आकोला यांसः—

नोटीस देणार जयवंती मर्द तुकाराम रा० हल्लीं कामठवाडा ता० वाशीम नोटीस देते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मला शहाणी होण्यास ५ पांच वर्षे झाली. तेव्हां पासून मी तुह्मास मला घेऊन जाण्याबद्दल पुष्कळ निरोप पाठविले. परंतु तुह्मी नेले नाहीं, त्यामुळें मला सावकाराचे कर्ज काढून मला माझा चारितार्थ चालवावा लागला व त्याबद्दलचा आज तागाईत खर्च २४० रुपये दोनशे चाळीस झाला. मी वागण्यास तयार आहे. तरी नोटीस पावल्यापासून अर्धा महिन्यांत (१५ दिवस) सदहू रुपये २४० दोनशे चाळीस देऊन मला घेऊन जाणे. सदहू रक्कम एक महिन्याचे आंत मला न मिळाल्यास तुमचा मजवरील असलेला नवरेपणाचा हक्क नाहींसा होईल व मी माझे मर्जीप्रमाणें पाट लावीन कळावे. ता० २८-११-१७ इ.

सही

नि० आंगठा जयवंती मर्द तुकाराम

नो. नं. १३

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा ज्यास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुले पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडा ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ — Lyon Scott एजंट

नो नं १४

---

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तात्काल गुण येतो. याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -।- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

संजीवनी ऑफिस

१९ खामगांव (वऱ्हाड)

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशाच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तबडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ८४

---

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला सं. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 16 Dadar Bombay

---

## कागदी बादाम

सर्वोत्तम ८१० गिरी जर्दालू ८९, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८३, गरी अक्रोट ८४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३९, सुर्मा मर्मारा,३ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८९ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो. नं. १७

---

## ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु– संतांचे, नांव गांवासह व पहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर **दहा चित्रपट!** किं० रुपये २॥; १।; व ८१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगांतील आश्चर्यें, चौऱ्यांशी आसनें. सुंदर-सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ. २०० फोटोंचे **सहा चित्रपट!** किं० रु० १॥; ८१२ व ८६ ( साहा चित्रपटांवर ९ हजार वर्षांचें **क्यालेंडर** बक्षिस! )

**श्री० व० नगरकर, नाशिक**

नो० नं० १८

---

## रोल्डगोल्ड सोन्योच

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनी बांधलेली ४–९. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सगाची २–३–४ अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

**कॅस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता– **मगनलाल के. आणि कंपनी गिरगांव– मुंबई**

नो० नं० १९

---

# अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारी एकच औषधी)

ही हजारो लोकांनीं अनुभवलेली आहे. सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर

अमृत बहार कंपनी मुलतान

जिल्हा मुलतान (पंजाब)

नो नं. २०

---

## लक्षांत ठेवा

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेंच सावकर, व सावकरला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजचे सामान, स्पांपस् वगैरे तेल पुरवितो. एकत्रळ आरडर देऊन कामाचे चोखपण बद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. २१

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांचे खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळातरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १९९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ९९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची जळजळ, संकोच, पूयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत त दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० ह० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाजाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष [५२] आकोला--सोमवार तारीख १४ माहे जानेवारी सन १९१८ ई० [ अंक २

# अमृतबहार.

(१०० रोगांवर चालणारी एकच औषधी)

ही हजारों लोकांनीं अनुभवलेली आहे. सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाही. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

माई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर अमृत बहार कंपनी मुजाफ्राबाद जिल्हा मुल्तान (पंजाब)

नो. नं. २०

## लक्षांत ठेवा

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारच माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठावितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारें सर्व सामान मोटारचें व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारें सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरें विजचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरावितो. एकवळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. २१

## नोटीस

नोटीस बेशमी धोंडीबा वा जगु चव्हाण राहणार मौजे काळेगांव तालुके भोकरदन जिल्हा औरंगाबाद

यांसः—

नोटीस देणार खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे तुमच्याशीं लग्न लागून सुमारे १० वर्षे झालीं तेव्हांपासून तुह्मी मजला तुमचे घरीं नेले नाहीं. मी माझे बापाचे घरीं राहाते त्याबद्दल मजला दरसाल रुपये ५० प्रमाणें आज मित्तीस रुपये ५०० पांचशें देणे झाले आहे करितां नोटीस देण्यांत येते कीं हल्लीं महागाई असल्यामुळें माझा बाप मजला पोसत नाहीं. तरी सदर्हू नोटीस पावल्यापासून पंधरा १५ दिवसाचे आंत वरील रुपये आणून देऊन मजला घेऊन जावे. सदरहु मुदतींत तुह्मी मजला घेऊन न गेल्यास मी हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग तुमची कायद्याप्रमाणें मुळींच तकरार चालणार नाहीं. कळावें आज तारीख ४ माहे जानेवारी सन १९१८ इ. दस्तुर मनोहर गोविंद देशपांडे अर्जनवीस राहणार बुलडाणें.

सही

आनसया मर्द धोंडीबा आ. पा. बाप दसरु वा काळुजी राहणार मौजे फडतषाडी ता० चिखलं नि. आंगठा

नो. नं २२

## नोटीस.

मुरलीधर वा लक्ष्मीनारायण मारवाडी रा. सांगवी बाजाराची

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी जी मजला नोटीस दिली ती बेकायदेशीर आहे. तुमचा माझा कांहीं संबंध नाहीं. माझा नवरा मयत झाला त्यावेळीं त्यास कर्ज होतें तें मला फेडणें जरूर आहे व त्याचप्रमाणें मयत नवऱ्यानें १२ वर्षांकरितां पट्यानें शेती केली होती त्याचीं वर्षे अद्याप भरणें आहेत. त्या शेताचे लागवडी करितां या वर्षी पुष्कळ खर्च झाला परंतु या वर्षी कोणचेच शेतांत उत्पन्न आलें नाहीं. त्यामुळें दुसऱ्याचें कर्ज काढून शेतीची लागवड करणें जरूर आहे. त्याचप्रमाणें गेल्या वर्षी ही शेतीमध्यें नुकसान लागलें कारणानें त्या वर्षी ही मला कर्ज काढणें भाग पडलें. या वर्षी शेतींत कांहींच उत्पन्न न आल्यामुळें मला या वर्षी खाण्यापिण्या करितां व शेतीचे लागवडी करितां ही कर्ज काढणें जरूर आहे तुह्मी बेकायदेशीर रीतीनें मला नोटीस दिली आहे. तुमचा व माझे नवऱ्याचा कोणत्याच प्रकारचा संबंध नव्हता व तुह्मी माझे नवऱ्याचे कोणत्याही प्रकारचें नातलग नाहीं. माझे नवऱ्याची सर्व इस्टेट स्वसंपादीत असून त्यानें मरणसमयीं माझे स्वाधीन पूर्ण मालक या नात्यानें केली आहे व त्या इस्टेटीची मी पाहिजे ती व्यवस्था पूर्ण मालक ह्मणून लावावी असें माझे नवऱ्यानें मरणसमयीं सांगितले असलेमुळें मी माझे नवऱ्याचे इस्टेटीची पूर्ण मालक आहे व तिची पाहिजे ती व्यवस्था करण्यास मी पूर्ण मुकत्यार आहे कळावें ता. ३-१-१८

सही

जीवनी मर्द जयनारायण मारवाडी ब्राह्मण रा. सांगवी बाजार नि. हातचा आंगठा

नो. नं. २४

## जाहिर नोटीस

मानबी मर्द शेख महताप मुसलमान रा० कसबे रिसोड ता० वाशिम जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी खास लग्नाची बायको असुन माझे घरीं तूं आठ महिने चांगले स्थितींत नांदत असतां तुला रमज्यान महिन्यांत तुझा भाऊ नामे राजममद वा गुलज्यारख्या फकीर चवकीदार राहणार कसबे रिसोड ता० वाशीम जि० आकोला यानीं सणाकरितां रमज्यानाचे घेऊन जातो व तिला ७।८ दिवसानीं पुन्हा सण झाल्यावर आणून घालतो अशी मला थाप देऊन तुला घेऊन गेला व आह्मी तुझी सण झाल्यावर ७।८ दिवस वाट पाहिली व आह्मा दोन २।४ वेळां तुला नेण्यास आलो तरी तुला तुझ्या भावानें व आईनें फंद फितूर शिकवून पाठाविली नाहीं. व तूं ही आली नाहींस. वरून तुजला नोटीस देतो कीं तुझ्याजवळ माझे दागिने आहेत व कपडा आहे, त्याचा तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें:—

९० चांदीचे तोड़े तोळे ९० दर भाव १ प्रमाणें

३० चांदीच्या वेढ्या तोळे ३० दर १ प्रमाणें

२९ चांदीच्या कोषऱ्या तोळे २९ दर १ प्रमाणें

३॥ सोन्याचे नाकांतील फुली मासा १॥ दर भाव २८

१६।-। सोन्याचे मणी गळ्यांतील वजन सात मासे दर भाव २८ प्रमाणें

५६ सोन्याची मुदी तोळे २ दर २८ प्रमाणें

३ आनवट पायांतील तोळे ३ चांदीचे दर १ प्रमाणें

३० रेशमी दुपटा खरा जरीचा गोट लावलेला किंमत रुपये ३०

८ साधे दुपटे २ किंमत रुपये ८

७ चांदीची पटडी तोळे ७ दर भाव १ प्रमाणें

६ चांदीचे गजरे तोळे ६ दर भाव १ प्रमाणें

९।-। सोन्याची बुलाख मासे ४ दर २८ प्रमाणें

२ चांदीचे हलके तोळे २ दर भाव १ प्रमाणें

१० नांदाळी चांदीच्या पट्याची तोळे १० दर भाव १ प्रमाणें

४ चांदीचे छल्ले ४ तोळे ४ दर १ प्रमाणें

२ हातांतील आरशी चांदीची तोळे २ दर १ प्रमाणें

५ मसरूचा पायजामा किंमत रुपये ५

८ कुडतानी १ व चोळी १ व कुडते साधे १ किंमत रुपये ८

३१९८=॥ एकूण रुपये

येणें प्रमाणें वरील दागदागीने व कपडा मिळून तूं माझे घरीं नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत यावे. जर करितां माझा सर्व माल व तूं घेऊन येणार नाहींस तर रितीप्रमाणें तुझ्यावर काम चालविले जाईल व ह्या सर्व नोटिशीचे खर्चासुद्धां तुझेकडून घेऊन मग कोणत्याच प्रकारें तुझी तक्रार ऐकली जाणार नाहीं. ही नोटिस ता० २ माहे जानेवारी सन १९१८ द० गोकुलाल किसनलाल मारवाडी राहणार मोप

सही

शेख महेताब वा शेख गुलाब रा० मोप दस्तुर खुद

नो० नं० २५

## नोटीस.

नोटिस बेशमी शिकदरखां वा महेताबखां राहणार व पोष्ट दाभा पोहोर ता. व जि. यवतमाळ

यांसः—

मी खालीं सही करणार नोटिस देतो ऐसाजे कीं, माझी मुलगी नामें सकीनाबी तुमची लग्नाची बायको असून तिजला ३॥। पावणेचार वर्षांपासून माझ्या घरी सोडून दिले असून आंगवस्त्रा करितां व खाणेंखर्चाकरितां कांहींच देत नाहींत. व तुह्मी मागें एक पत्र पाठविले होते कीं मी फारकती देण्यास तयार आहों. त्याप्रमाणें मी चार माणसें व मुलीस घेऊन तुमच्या गांवास आलो. परंतु तुह्मी चुकांडी देऊन निघून गेले. तुमच्यानें पुष्कळच चकाड्या झाल्या. ह्मणून मी पोस्टानें एक नोटिस दिली. परंतु तुह्मी घेतली नाहीं, परंतु तुह्मी खाणें खर्चा करितां व आंगवस्त्रा करिता कांहींच रुपये दिले नाहींत. आतां ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत खाणें खर्चाबद्दल व कपडेलत्याबद्दल दरसाल चे १०० शंभर रुपये एकूण ३७५ पावणेचारशें रुपयें देऊन माझ्या मुलीस घेऊन जावें. आतां तुमचे काय ह्मणणें आहे ते लेखी नोटिशीनें कळवावें. लेखी नोटिशीनें न कळविल तर तुमचे तोंडी ह्मणणें खोटें ठरवून व दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासगट व व्याजासह रुपये घेतले जातील कळावें. ता. ३-१-१९१८

सही

१ अब्दुल रहिम वा शेख बंडु राहणार कुरुम तालुके मुर्तिजापूर जिल्हा आकोला द. खुद

नो. नं. २६

## नोटीस

कि॰ नं॰ १ सन १९१८

वि॥ सबजज साहेब नंबर २ आकोला

अर्जदार

इयाबूराव वा॥ तुळसीराम रा॰ केळीवेळी ता॰ आकोट.

बिन अर्जदार

यादव वा॥ सखाराम पाटील रा॰ अंबासी तालुका बाळापूर.

सदहू अर्जदार तर्फे जाहिर रीतीनें कळविण्यांत येते कीं मयत सुकदेव वा॥ पांडूजी गांवंडे रा॰ केळीवेळी ता॰ आकोट हा अर्जदाराचा साक्षांत चुलतभाऊ आहे. मयताला लोकाकडून वेगैरे असलेले कर्ज रुपये २०९९८७ वसूल करणेंबद्दल त्यानीं आमचे कोर्टांत सक्सेशन सर्टिफिकाट मिळण्याबद्दल अर्ज केला आहे त्याची चौकशी तारीख २।२।१८ नेमली आहे. तरी बिन अर्जदार अगर अन्य दुसरे कोणाचा वारसा वगैरे असल्यास त्यानी आपली तकरार व हरकती वगैरे तारीख २।२।१८ इ. रोजीं सकाळी १० वाजतां कोर्टांत हजर राहून शाबिती करावी नहीं तर अर्जदारास वारस समजून सर्टिफिकाट देण्यांत येईल. नंतर कोणची ही तकरार ऐकली जाणार नाहीं. तारीख ७।१।१८

V. S Deo

सबजज नं २ आकोला

नो. नं. २७

## नोटीस.

नोटीस बेशमी मन्नू वा॥ छन्नू पेहेवाले रा. नसिराबाद खान्देश

यांसः—

या नोटिशनें कळविण्यांत येते कीं मी तुमचा भाऊ नामें रामूलाल छन्नूलाल पोहेवाला रा आकोला याचे जवळ १२ बारा वर्षापासून राहिली असून त्याचा संसार बायको प्रमाणें करीत होतो. त्यांचे पासून मला मुलगा नामें गंगाराम हा झाला आहे. हल्लीं हा मुलगा अज्ञान आहे. रामूलालची स्थावर इस्टेट फक्त एक घर गंजाच्या वेशीजवळील असून अज्ञान गंगाराम याचे मालकीचें आहे. सदर रामूलाल यांस १२ दिवसापूर्वी देवाज्ञा झाली. मरणाची क्रिया मीच केली व तरी तुह्मी सदरहू घरासंबंधीं कोणतीही विल्हेवाट करूं नये. केल्यास अज्ञानाचे जिनगीबद्दल तुह्मी योग्य जबाबदार व्हाल कळावें ता॰ ६-१ १८ इ.

सही

सहीची निशानी आंगठा

गंगाराम वा॥ रामूलाल पोहेवाले

अ. पा. क. आई कृष्णाबाई

मर्द रामूलाल पोहेवाले

रा. गंजाची वेस आकोला

नो. नं. २८ हिचा खुद्द असे

## नोटीस

इछाराम नारोबा शेट वाणी राहणार कजबे धरणगांव तालुका एरंडोल जिल्हा पूर्व खानदेश यांसः—

नोटीस देणार

भागीरथीबाई भ्रतार केशवराव देसाई राहणार धरणगांव हल्लीं मुक्काम पिंपळगांव काळे ता. जळगांव जि. बुलढाणा

नोटिस देते कीं, माझा नवरा नामें केशवराव महिपत देसाई हे मरण पावले. त्यांना मरण्यास आज सुमारें १० महिने झाले. त्यांचे मेल्याचे पाठीमागें मी माझे भावाजवळ वरखेड गांवीं राहण्यास आले. त्यावेळेस आपले जवळ माझे अंगावरचे दागीने व देवघेवीचे कागद ठेव ह्मणून ठेविले तें खालीं लिहिल्या प्रमाणें:—

दागीने

१ तोड्याचा जोड चांदीचा वजन तोळे १२९ अजमासे भार

१ पुतळ्याचे गाठले सोन्याचे पदका सुद्धां ११ नग वजन ३ तोळे अजमासे

१ मुद्या नग २ सोन्याच्या वजन तोळे अजमासे ३ तोळे

कागद

१ दगडु पांडुरंग देसाई याचे शेताचा गहाणखताचे कागद

१ काशीनाथ अण्णाजी कुळकर्णी याचे नांवची प्रॉमेसरी नोट

१ सुतार याचे नांवचा कर्ज रोखा

१ बहेनाबाई भ्रतार लालजी यांची प्रॉमेसरी नोट

येणें प्रमाणें कागद व दागीने चांदी सोन्याचे आपले जवळ ठेव ह्मणून ठेविले आहे, ते दागीने व कागद मी तारीख १३ माहे दिसंबर सन १९१७ रोजीं धरणगांवीं आले त्यावेळेस समक्ष मागणी केली असतां देतो ह्मणून सांगून दिले नाहीं. व दगडु डाक्टर याची आड दाखविली परंतु माझी ठेव मला परत दिली नाहीं. हल्लीं माझे जिवास सावकाश नसून दम्याचे योगानें फार बिमार आहे. व मला माझ्या जिवाचा भरंवसा नाहीं ह्मणून आपण ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसाचे आंत माझी ठेव मला वापस पिंपळगांव काळ्याचे मुक्कामीं आणून द्यावी व ठेव वापस मिळाल्याबद्दल माझ्या जवळून माझ्या आंगठ्याची पावती घेऊन जावी. त्याच प्रमाणें माझ्या नवऱ्याकडे आपले जे कांहीं असेल त्याबद्दल खात्याचा हिशोब उतरून आणून आपल्या कर्जाचा हिशेब चुकता करून घेऊन जावे. जर आठ दिवसाचे आंत ठेव आणि हिशोब न आणिल्यास तुमचे रकमेस पुढें व्याज देणार नाहीं. व माझे ठेव ठेविलेल्या दागीन्यास रितीप्रमाणें व्याज लागेल. वरील प्रमाणें काम करून त्याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९ माहे जानेवारी सन १९१८ द० शामराव राजाराम कुळकर्णी

सही

भागेर्थीबाई जवजे केशवराव देसाई

राहणार धरणगांव हल्लीं मुक्काम

पिंपळगांव काळ्याचे नि. बांगडी

नो॰ नं॰ २९

## नोटीस.

नोटिस बेशमी वायधन वा॥ माधोजी जात कुणबी अडनांव गावंडे रा. सोनाळपडसोड तालुका व पोष्ट मुर्तिजापूर जि॥ आकोला

यांसः—

नोटिस देणार सितारा‌म वा॥ कवडाजी जात कुणबी अडनांव आखरे राहणार कंमळखेड तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला कारणें या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येत आहे कीं, मी तुह्मास सन १९१६ इ. सालांत कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन नोंदून दिले आहे. व तुह्मी माझे हितसंबंधीं कोणते ही कार्य केलें नाहीं. करितां तुह्मास या नोटिशीनें कळवितो कीं, मी तुह्मास दिलेले कुलमुखत्यारपत्र रद्द आहे. व मी तुह्मास तोंडी ही बरेंच वेळां सांगितले कीं, मी दिलेले मुखत्यारपत्र आणून द्यावे तरी तुह्मी आणून दिले नाहीं. व माझे नांवानीं कोणाचे कर्ज वगैरे काढूं नये. त्या कर्जाचा बोजा तुमचेवर आहे. ही नोटास लिहून दिली सही ता. ४-१-१८

सही

सिताराम वा॥ कवडाजी द. खुद

रा. कंवळखेड पो. मुर्तिजापूर

नों॰ नं॰ ३०

## नोटीस

नोटीस बेशमी माधोजी भगवान चिकटे पाटील राहणार मौजे माळेगांव ता॰ आकोट जिल्हा आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी कसबे तळेगांव बु॥ येथील सेत सर्वे नंबर ९१/३ हा तुमचे मालकीचा आहे असे सांगून मजला पट्यानें वहीतीस दिला व त्याप्रमाणें मजजवळून कबुलायत ही करून घेतली पण मी किस्तकारी करण्यास व पेरण्यास गेलो असतां मजला भाऊराम वा॥ मुकाजी पाटील यांनीं किस्तकारी व पेरणी करण्यास हरकत केली व त्यानींच वाहीपेरी करून सदर्हु जमिनीतील मालही त्यानीं नेला. सदर्हु जमीन त्यांचे मालकीची असून त्यांचा कबजा सदरहू जमिनीवर बरेच दिवसापासून आहे आतां समजते तुह्मास ह्या पूर्वीं ही मी दोन तीन वेळां सदर्हु हकीकत सांगितली असतां तुह्मी त्याबद्दल कांहीं तजवीज केली नाहीं करितां सदर्हु नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी लिहून घेतलेल्या कबुलायती प्रमाणें मला सदर्हु सेताचा कबजा मिळाला नाहीं व मी किस्तकारी वही पेरणी केली नाहीं व सदर्हु जमिनीतील उत्पन्न ही मला मिळाले नाहीं. तुह्मी मजला सदर्हु सेत तुमची मालकी व कबजा नसतां पट्यानें दिल्यमुळें माझे नुकसान झाले आहे. सदर्हु नुकसानी बद्दल तुह्मी जबाबदार आहांत करितां ८ दिवसाचे आत मला भेटून सदर्हु नुकसानी बद्दल तडजोड करण्याची तजवीज करावी. असें न केल्यास मला कायदेशीर तजवीज करणें भाग पडेल कळावें ता. ९-१-१८ इ.

सही

दवलत रुपचंद पाटील राहणार

तळेगांव बु॥ ता. आकोट दस्तुर खद

नो. नं. ३१

## नोटीस

नोटीस बेशमी १ मारोती वा॥ गोपाळ रंगारी व २ केसरीचंद तनसूक मारवाडी उमयता रा॰ कसबे रिसोड ता॰ वाशीम

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं कसबे रिसोड येथील लादुराम बोदुलाल या नांवचे दुकानचे तुह्मास पुर्वीं कुलमुखत्यार पत्र दिले होते ते हल्लीं रद्द करून नौकरी वरून कमी करण्यास बरेच दिवस झाले तरी तुह्मी मागील कुलमुखत्यार पत्राचे आधारे कोणतेही प्रकारे आमचे दुकानचे नावानें कारभार करूं नये केल्यास त्याजबद्दल आह्मी जबाबदार नहीं. ता. ६-१-१९१८

सही

लादुराम बोदुलाल तर्फे कुलमुखत्यार

निळकंठ माणिकराव दस्तुर खुद

रा. रिसोड

नो. नं. ३२

## नोटीस

नोटीस पन्नालाल चंदुलाल मारवाडी राहणार सेंदुरजन

यांसः—

खालीं सही करणार कळवितो कीं मी तुह्मास शेताचे ताब्याबद्दल रुपये ६७५ भरले तरी शेताचा ताबा अझून मिळाला नाहीं तरी नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत मला शेताचा ताबा द्यावा नाहींतर मी कोर्टांत दावा करणार कळावें ता. ४-१-१८

सही

काळू पिराजी पाटील राहणार जागदरी नि॰ आंगठा

नो॰ नं॰ ३३

॥ श्री ॥

## श्री समर्थ मुद्गलश्वर खटेश्वर महादेव संस्थान राहित साहित ता. आकोला (वऱ्हाड)

श्री संस्थान राहित येथें अनाथ लंगडे पांगळे खुळे यांचे जावनार्थ श्री बाबांचे आशीर्वादानें एक अन्नसत्र सुरू केलें आहे चालविणार श्री समर्थ आहेत तरी या सत्कार्यास पुण्यपरायण धर्म बांधवांनीं हस्तें परहस्तें ईश्वर प्रीत्यर्थ अवश्य शक्त्यनसार मदत करावी. या कार्यास राहित येथील कांहीं धर्म परायण मंडळींनीं बरीच मदत केली आहे. त्यांत विशेषतः रा. अवचितराव बापू, पांडोबा, माधवराव, दौलतराव, गोपाळराव, वगैरे मंडळीची मदत ३-४ हजार रुपयापर्यंत पोचली आहे. वरील सत्कृत्यास इतरांनीं ही हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

श्रीचा नम्रदास

गणेश्वर बाबा साधु

रा. संस्थान राहित

ता. अकोला (प्रांत वऱ्हाड)

नो. नं ११

## पत्रव्यवहार

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्ते यांस—

इ. स. १९१७ ची राष्ट्रीय सभा ही अनेक तऱ्हेनें अवर्णनीय झाली. राष्ट्रानें एक मतानें अत्युच्चमान–श्रीमती विदुषी ए. बेझंट बाईस दिला हा बत्तिसाव्या राष्ट्रीय सभेचा विशेष होता. बाईचें आगमन कलकत्ता येथें तारीख २४ दिसेंबर रोजीं राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष या नात्यानें झालें. बाईचें स्वागत ज्या उत्साहानें कलकत्ता नागरिकाकडून होते तो उत्साह मोठेमोठे बादशाहाचे आगमनार्थ देखील होत नाहीं असें लोक सांगतात. 'पुरुषार्थ' यासच ह्मणावें. कांहीं वर्षांमागें कलकत्त्याचे लोकांपुढें बाईनीं व्याख्यान देणें त्यांचे पुष्कळ सुहृद मंडळीस धोक्याचें वाटे! त्याच बाईचा सर्वतोमुखी जयघोष होणें हा कालाच प्रताप नसून तो त्यांचे पुण्याईचा प्रभाव होय. अशीं नररत्नें जगाच्या पाठीवर क्वचितच सापडतात. श्री गोपाल कृष्णाचे बालपणीं संगोपन व्हावें ह्मणून वसुदेवास त्यास गोकुळांत नेऊन ठेवावें लागलें! तसेच बेझंट बाईचा जन्म येथें झाला असता तर कदाचित आज त्यांचे हातून मातृभूमीची जी सेवा होत आहे ती कदाचित झाली नसती ह्मणनच कीं काय त्यांचा जन्म दुसऱ्या देशांत झाला. अनेक कंठाळी ठरावास फाटा देऊन 'स्वराज्याची' मुहूर्त मेढ त्यानीं कलकत्ता राजधानींत काली देवीचे छत्राखालीं स्थापित केली आहे! स्वराज्यप्राप्ती करतां बाईचे महायुद्धाचे अगोदर अगदीं थोडे दिवस 'न्यू इंडिया'चा जन्म, बाईची नजरकैद, त्यांची सुटका वगैरे गोष्टी दैवी चमत्काराच्या आहेत असें वाटणें साहजीक आहे. श्री कृष्णानीं ह्मटलें आहे—भ्रामयन्सर्व भूतानी यंत्रा रूढानि माय या—ही गोष्ट बाईचेबद्दल आंग्लो इंडियन ब्युराक्रसीचे मति भ्रष्टतेंत अगदीं स्पष्ट दिसून येते! 'साम्राज्यांतर्गत 'स्वराज्य' मिळावें ह्मणून बाईचा प्रयत्न असून त्यांत या मतिभ्रष्टास राजद्रोह दिसावा हें नवल नव्हे काय? परंतु त्यांच्या गैरसमजांतच आर्यभूमीचें मुक्ततेचें बीज असल्यास कोणास ठाऊक.

बाईचे अध्यक्षस्थानावरून झालेलें भाषण वाचून आंग्लो इंडियन पत्रकारांचे अंतःकरणाची झालेली स्थिति पाहून त्यांची खरोखरीच कींव येते! हिंदुस्थानचे कल्याणार्थ हिंदुस्थानास 'स्वराज्य' दिल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं ही गोष्ट त्यानीं अनेक साधक बाधक प्रमाणें देऊन सिद्ध केली आहे. प्रत्येक हिंदपुत्रानें त्या भाषणाचें पारायण करावें असें तें भाषण आहे.

बेझंटबाईनीं आर्यभूमीचे राजकीय मुक्ततेचा व्यक्तिशः प्रयत्न सुरू केल्यापासून जेथें राष्ट्रीय सभा तेथें थिऑसोफिकल सोसायटीची परिषद भरत असते. मि. जिनराजदास मि. आरंडेल, मि. वाडिया व न्यायमूर्ती सदाशिव आयर याची चार दिवस निरनिराळे विषयावर चित्ताकर्षक व विद्वत्ताप्रचुर अशीं भाषणें होऊन पांचवे दिवशीं श्रीमती बेझंटबाईचे सोसायटीचें अध्यक्ष या नात्यानें भाषण झालें. समाजाचे अनेक कार्यव्यापृत्यामध्यें राष्ट्रीय शिक्षण हें प्रमुख आहे. समाजाचे सभासदांचे प्रयत्नानें राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना होऊन कार्यकारी मंडळांत राष्ट्रांतील थोर थोर मंडळी आहेत. या मंडळाचे तहाह्यात सभासद होण्याकरितां एक हजार, शंभर व पांच रुपये प्रवेश फी ठेविली आहे. सभेचे सेक्रेटरी मि. आरंडेल, अड्यार मद्रास हे आहेत.

कलकत्ता } आपला
७।१।१९१८. } चिं० ह० मराठे.

## टिळक–दर्शन.

(खामगांवकरांची कार्यनिष्ठा)

ता. ९।१।१८ रोजीं लो. टिळक नागपूर मेलनें पुण्यास गेले. जलंब स्टेशनवर त्यांना पानसुपारी व होमरूल लीगला देणगी देण्यासाठीं खामगांवची मंडळी आली होती. लो. मेलनें जाणार ही बातमी काल दुपारीं २ वाजतां तारेनें येथें समजली. तावडतोब येथील पुढारी मंडळींनीं व्यवस्था करून दोन तासांत ११७३ रुपये जमा केले. व लोकमान्यांस या रुपयाची थैली नजर केली. येथील लोकांचे वतीनें येथील स्वराज्य संघ शाखेचे उपाध्यक्ष शेट धनजी कानजी यांना लोकमान्यास हार तुरे अर्पण करण्याचा व शेट विश्वनाथ नागोसा सावजी यांस लोकमान्यांस थैली देण्याचा मान देण्यांत आला होता. एकंदर जलंब स्टेशनवर ६००।७०० लोक हजर होते. तरी सर्व लोकांत शिस्त फार वाखाणण्या सारखी होती.

माटरगांव येथील प्रसिद्ध सावकार रा० गोपाळराव पाचपोर यांनीं लोकमान्याना रु. १०१ ची भेट दिली.

सर्व लोकांमध्यें उत्साह अपूर्व होता. लो० तब्यत नादुरुस्त असल्यामुळें प्लॅट फार्मवर उतरतो आलें नाहीं. लोकांनीं गडबड न करतां उभे राहून गाडी चालू झाल्यानंतर त्यांचें दर्शन घेतलें. कळावें,

प. का. चांदे
सेक्रेटरी स्वराज्य संघ

वऱ्हाडसमाचार

पौष शुद्ध २ पिंगल संवत्सर १८३९.

## कांग्रेस आणि स्वराज्य.

कांग्रेसच्या कार्यक्रमांत स्वराज्याच्या ठरावावरील भाषणासाठीं स्वतंत्र एक दिवस देण्याची व कांग्रेसचे सर्व मुख्य मुख्य नायकांनीं त्या विषयावर भाषणें करण्याची वहिवाट गत वर्षीपासून पडली आहे या वरून हिंदुस्थानच्या लोकांच्या दृष्टीनें त्या विषयाचें महत्त्व किती आहे त्याची चांगली कल्पना करतां येईल. त्या विषयाला जें येवढें महत्त्व देण्यांत येतें तें अगदीं रास्त आहे; कारण आमच्या राजकीयच नव्हे तर सामाजिक, शिक्षणविषयक आणि विशेषतः औद्योगिक उन्नतीची गुरुकिल्ली स्वराज्यांत आहे. ही किल्ली आमच्या हातांत आली नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थानच्या उन्नतीबद्दलचे आमचे सगळे प्रयत्न पंगु होतात असा अनुभव आलेला आहे. स्वराज्याचे अधिकार मिळाले नाहींत तोंपर्यंत सरकारी खजिन्यांतल्या पैशाचा व्यय लोकांच्या हिताचे कामींच होत आहे कीं नाहीं तें आह्मांला कळत नाहीं, व तसा तो होत नसल्यास कां होत नाहीं हें सरकारी अधिकाऱ्यांना विचारतां येत नाहीं; मोठाल्या अधिकाऱ्याच्या जागांवर नेमणुका करतांना हल्लीं दिसून येणारा वर्णभेद नाहींसा करतां येत नाहीं; आपल्या देशाच्या रक्षणार्थ शस्त्र धारण करण्याच्या जन्मसिद्ध हक्कापासून आह्मी वंचित राहतो; अपराध शाबीत केल्यावांचून वाटेल तेव्हां वाटेल त्या रीतीनें राष्ट्राच्या पुढाऱ्यांना अटकबंदी करण्याचा अधिकाऱ्यांचा क्रम असाच सुरू राहणार; सैन्यांतल्या मोठाल्या अधिकाराच्या जागा दुसरेच लोक पटकावणार; रेल्वे कंपन्या आमच्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना मेंढरांप्रमाणेंच वागविणार; पोलीसांना व इतर अधिकाऱ्यांना आपण लोकांचे नोकर आहों ही भावना स्वप्नांत सुद्धां कधीं यावयाची नाहीं; देशांत उत्पन्न होणारा कच्चा माल हिंदी लोकांसाठीं नाहीं, तर आपले साठीं आहे असेंच परदेशी व्यापाऱ्यांना वाटणार; रेल्वे कंपन्या त्यांनाच सवलती देणार; हिंदी लोकांना जोंपर्यंत हा हक्क मिळाला नाहीं तोंपर्यंत त्यांच्यांत मनुष्यपणाचा स्वाभिमान कधीं उत्पन्न होणार नाहीं; त्यांच्या देशबांधवांपेक्षां त्यांचें हित आह्मांलाच ज्यास्त कळतें असा मानभावीपणाचा हक्क परदेशी अधिकारी सांगत राहतील; आमचे लोक घरांत शेर पण बाहेर गुलाम अशी स्थिति राहील तोंपर्यंत कोणतीही सामाजिक किंवा धार्मिक व नैतिक उन्नति त्यांच्या हातून घडणें शक्य नाहीं; शिक्षणाचा प्रसार हें साऱ्या राष्ट्रीय व्याधीवर रामबाण औषध आहे अशी सर्वांची खात्री झाली असून ही हें औषध लोकाच्या मुखांत पडूं नये अशीच तजवीज मतलबी अधिकाऱ्यांकडून करण्यांत येईल; शिक्षणक्रमांत कोणतें विषय घालावयाचे व कोणतें नाहींत हें ज्यांचा हितसंबंध मुलांच्या शिक्षणाशीं आहे त्या पालकांच्या सल्लयानें ठरविलें न जातां भलत्याच लोकांच्या हातीं तें ठरविण्याचें काम जाईल व तें भारतमातेचीं मुलें वर डोकें काढणार नाहींत अशाच प्रकारची शिक्षणपद्धति चालू ठेवतील; सारांश, हिंदुस्थानची सर्वांगीन उन्नति एकट्या स्वराज्यप्राप्तीच्या प्रश्नावर अवलंबून असल्यामुळें कांग्रेसमध्यें या विषयाला जें येवढें महत्त्व प्राप्त झालें आहे तें अगदीं यथायोग्य आहे. या विषयावर कांग्रेसमध्यें लोकमताच्या पुढाऱ्यांचीं जीं भाषणें झालीं तीं सर्वोत्कृष्ट होतीं. हीं भाषणें निरनिराळ्या देशी भाषांत भाषांतरित होऊन स्वतंत्र पुस्तकरूपानें लोकांच्या हातांत पडली पाहिजेत, व प्रत्येक गावांतून व खेड्यापाड्यांतून ज्यांना वाचतां येत आहे अशांनीं तीं आपल्या निरक्षर बंधूंना वाचून दाखविण्याची तजवीज होणें अवश्य आहे. स्वराज्याची तहान समाजाच्या पृष्ठभागावरच्याच नव्हे तर तळच्या लोकांना ही लागली पाहिजे. यंदा झालेल्या भाषणांत लो. टिळक, पंडित मदन मोहन मालवीय, ना. मि. जिना, प्रभृति वक्त्यांचीं भाषणें लोकांच्या मनावर उत्तम ठसा उत्पन्न करणारीं व स्वराज्याच्या विरुद्ध येणाऱ्या आक्षेपांना निरुत्तर करणारीं होतीं. ना. मि. जिना यांचें याच विषयावर मुस्लीम लीगपुढें झालेलें भाषण फार जोरदार, कळकळीचें व मुद्देसूद होतें. या भाषणाचें उर्दूंत भाषांतर होऊन तें प्रत्येक मुसलमानास फुकट दिलें पाहिजे. मुसलमान लोकांत शिक्षणप्रसार कमी असल्यामुळें स्वराज्याच्या शत्रूंनीं त्यांना भलभलतेंच सांगून गैरसमज उत्पन्न करून ठेविले आहेत ते अशा उपायानें दूर होऊन हिंदु, मुसलमान, यहुदी, ख्रिस्ती, जैन, लिंगायत, वगैरे सर्व लोक एकस्वरानें स्वराज्य मागूं लागतील. असें होईल तेव्हांच स्वराज्याचा टाहो विलायतपर्यंत पोहचून हिंदुस्थानची दाद लागेल.

## विद्यार्थी आणि राजकारण.

हिंदुस्थानांत अधिकारी वर्ग व लोकनायक यांच्यामध्यें विशेष घर्षण उत्पन्न करणारा असा जर एखादा विषय असेल तर तो हा आहे. बंगाल घ्या, मद्रासप्रांत घ्या, किंवा मुंबई इलाखा घ्या. सर्व ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या संबंधानें सरकारी अधिकाऱ्यांचे वर्तन अत्यंत अनिष्ट प्रकारचें—विद्यार्थ्यांना निःसत्त्व, स्वातंत्र्यहीन करून टाकणारें, पालकांचा त्यांच्यावरील जन्मसिद्ध ताब्याला धाब्यावर बसविणारें—आहे असें दिसून येईल. आमच्या प्रांताधिकाऱ्यांनीं तर इतर सर्व ठिकाणच्या अधिकाऱ्यांवर कडी केल्यामुळें अतिशयच खळबळ उडून मध्यंतरीं कित्येक दिवस शिक्षणसंस्था बंदच पडल्या होत्या. विद्यार्थ्यांनीं चळवळींत भाग घेऊं नये या तत्त्वाला कोणी विचारी पुरुष विरुद्ध नाहीं, पण त्यांनीं आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं भाषणें ऐकण्यास जाणें सुद्धां पाप आहे असें समजणें व तो नियम सक्तीनें अमलांत आणूं पाहणें ही अरेरावी अत्यंत अपमानास्पद व देशहितास घातुक आहे. खुद्द इंग्लंडांतल्या शहाण्या लोकांचें मत अशा प्रकारचें नाहीं. याचा ताजा पुरावा ह्मणजे सुप्रसिद्ध राजकीय तत्त्ववेत्ते मि. जी. डब्ल्यू. ई. रसेल यांचें भाषण हा होय. ते ह्मणतात— "तरुण नागरिक हा स्वातंत्र्याचा भक्त पाहिजे. स्वातंत्र्य ही व्यक्तीला व समाजाला ईश्वरदत्त देणगी आहे. विचारस्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य, व आचारस्वातंत्र्य हा जीवनाचा सर्वोत्कृष्ट भाग आहे. ही अमूल्य संपत्ति आहे. तिची सर दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला येणारी नाहीं." पण केवढी दुःखाची गोष्ट आहे कीं ही अमूल्य संपत्ति हिंदी तरुणांच्या हातीं पडूं नये ह्मणून हिंदुस्थानांतले अधिकारी अटोकाट प्रयत्न करून राहिले आहेत. स्वातंत्र्य हा शब्दच या अधिकाऱ्यांचें पित्त खवळण्यास कारण होत असतो. विद्यार्थ्यांनीं कैद्याप्रमाणें नेहमीं दुसऱ्याच्या हुकूमतींत राहवें, स्वातंत्र्याचें वारें ही

त्यांना लागूं नये म्हणून त्यांची कोण धडपड चालली आहे!

## औद्योगिक परिषद.

स्वराज्य आणि अलीबंधूंची अटकबंदी यांच्या खालोखाल एखाद्या विषयाकडे लोकांचें चित्त वेधिलें गेलें असेल तर तें यंदाच्या औद्योगिक परिषदेनें वेधिलें होतें. औद्योगिक परिषद आज पंधरा सोळा वर्षे अस्तित्वांत आहे, व तिच्या कामाचीं सूत्रें आमच्या प्रांताचे सुप्रसिद्ध नागरिक ना० रा० ब० मुधोळकर यांचे हातीं आरंभापासून गतवर्षी पर्यंत होतीं; पण त्यांच्या व्यवसायांच्या भिन्नत्वामुळें म्हणा, अगर परिषदेचें कार्यस्थान उमरावतीसारख्या उद्योगशून्य शहरीं येऊन पडल्यामुळें म्हणा, अगर दुसऱ्या अशाच अनिवार्य कारणामुळें म्हणा, पण या संस्थेच्या हातून व्हावें तसें कार्य झालें नाहीं. आतां या अडचणी दूर झाल्या आहेत. उद्योग हाच ज्यांचा व्यवसाय आहे अशाच्या हातीं संस्थेचा कारभार गेला आहे व परिषदेचें आफिस ही मुंबईसारख्या उद्योगकेंद्राचे ठिकाणीं नेण्यात आलें आहे. सध्याची वेळ ही औद्योगिक कार्य विशेष उत्साहानें हातीं घेण्यास अधिक अनुकूळ आहे, तेव्हां आतां तरी ही संस्था विशेष कार्य करून दाखवील अशी उमेद आहे. आजपर्यंतच्या वहिवाटीप्रमाणें यंदाच्या औद्योगिक परिषदेनें केवळ शाब्दिक चर्चे पलीकडे कांहीं एक व्यावहारिक कार्य केलें नाहीं. देशांतल्या सगळ्या औद्योगिक संस्था एका सूत्रानें बद्ध होतील अशी एखादी व्यावहारिक योजना तयार केली नाहीं, किंवा लहानसान उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं कांहीं विशेष कार्य हातीं घेतलें नाहीं. शाब्दिक चर्चाच केली, मात्र ती ज्यास्त व्यापक स्वरूपाची अशी केली. स्वागतकमिटीचे चेअरमन कासीमबाझारचे महाराज सर मणींद्रचंद्र नंदी हे होते व अध्यक्ष बडोदा, त्रावणकोर व म्हैसूर या तीन संस्थानांची दिवाणगिरी केलेले मि० व्ही० पी० माधवराव हे होते, दोघांच्या ही भाषणांत कांहीं कांहीं मुद्दे सामान्य होते व त्यांची चर्चा औद्योगिक कमिशनपुढें झालेल्या अनेक साक्षीच्यावेळीं निरनिराळ्या प्रकारें झालेली होती, तथापि औद्योगिक परिषदेच्या व्यासपीठावरून व वरील दोघा वजनदार पुढाऱ्याच्या मुखांतून तिचें प्रकटीकरण झालें ही गोष्ट महत्त्वाची म्हटली पाहिजे. सरकारनें कारखाने काढण्यांत व ते यशस्वी रीतीनें चालून दाखविण्यांत पुढाकार घ्यावा, देशी मालाला उत्तेजन द्यावें, कारखानदारांना सवलतीनें भांडवल मिळेल अशा रीतीच्या सवलती बँकांकडून देण्याची तजवीज करावी, पगारी शास्त्रज्ञ ठेवून लोकांना त्यांचेकडून मोफत सल्ला देण्याची तजवीज करावी, मालाच्या वाहतुकीचे रेल्वेचे दर भारी असल्यामुळें देशी मालाच्या प्रसारास येणारा अडथळा दूर करावा, युरोपियन व देशी व्यापारी यांनीं अहिनकुलसंबंध न ठेवतां सलोख्यानें कार्य करावें, वगैरे गोष्टी आतां इतक्या परिचित झाल्या आहेत कीं त्यांच्या संबंधानें विशेष चर्चा करावयास पाहिजे असें नाहीं. या परिषदेनें यदा पास केलेल्या ठरावापैकीं कांहीं यंदाच्या विशेष परिस्थितीमुळें प्राप्त झालेले होते. उदाहरणार्थ, सरकारनें बंगालमधील लहान लहान कोळशांच्या खाणी (ज्या हिंदी लोकांच्या मालकीच्या होत्या) बंद करवून त्यांतले मजूर युरोपियनांच्या मालकीच्या मोठाल्या खाणींत काम करण्यास पाठविले याबद्दलचा निषेध करणारा एक ठराव पास करण्यांत आला. हा विषय इतका महत्त्वाचा होता कीं त्यावर नुसता ठराव पास करून स्वस्थ न बसतां एखादें डेप्युटेशन सरकारकडे जावयास पाहिजे होतें. मिठाच्या निर्बंधामुळें उत्पन्न झालेली महर्घता हा सार्वजनिक हिताचा विषय ही असाच डेप्युटेशन पाठविण्यासारखा होता. याशिवाय प्रांतोप्रांतीं औद्योगिक शाळा व कालेजें काढणें, सर्व ठिकाणीं सारखीं वजनें मापें सुरू करणें, शेतीच्या अभिवृद्धीसाठीं इरिगेशन वाढविणें वगैरे दुसरे कांहीं ठराव झाले. पण सध्या उद्योगधंद्यांसंबंधानें जी विचार जागृति दिसत आहे तिचें एकीकरण करून कांहीं व्यावहारिक कार्याचें ' सूत उवाच ' परिषद करून ठेवील अशा जी आशा वाटत होती ती मात्र सपशेल कालवती ठरली हें मोठ्या दुःखानें सांगणें भाग आहे.

## मुसलमान बंधूंच्या चळवळी

कलकत्त्यास भरलेल्या अनेक परिषदांमध्यें केवळ मुसलमानांच्याच पण अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन परिषदा होत्या. एक मुस्लीम लीगची सभा व दुसरी शिक्षण परिषद. मुस्लीम लीगसंबंधानें दोन गोष्टी अत्यंत खेदकारक घडलेल्या होत्या. एक लीगनें नियुक्त केलेले अध्यक्ष मि. महमद अली यांची मुक्तता करण्याविषयीं एकंदर मुसलमान समाजानें अत्यंत आग्रहाची प्रार्थना केली असतां ही सरकारनें त्या प्रार्थनेची केलेली अवमानना ही होय. दुसरी गोष्ट म्हणजे स्वराज्यसंबंधाच्या ठरावास मुसलमानांचें पाठबळ मिळूं नये म्हणून कित्येक मतलबी लोकांनीं त्याच्यांत फूट पाडण्याचा यत्न ही होय. अलीबंधूंस अटकेंत ठेवण्याबद्दलचा सरकारनें धरलेला हट्ट ही त्यांचे हातून फार मोठी चूक होत आहे, तिच्या योगानें मुसलमानसमाज क्षुब्ध होऊन सध्याच्या अस्वस्थतेंत भर घालीत आहे हें सरकारच्या ध्यानांत अजून ही येऊं नये हें आश्चर्य आहे. परवा अलीबंधूंची आई काँग्रेसमध्यें व लीगच्या सभेस गेली तेव्हां लोकांनीं उठून तिचा सन्मान केला, व मनुष्यमात्रानें तिच्याविषयीं सहानुभूति दाखविली यावरून तरी अलीबंधूंविषयीं त्यांच्या देशबंधूंच्या ठायीं असलेला विश्वास व आदर, याची कल्पना सरकारास करतां येईल, व ते त्यांची मुक्तता तरी करतील किंवा निदान सदर बंधूंना सरकार गुन्हेगार कां समजते त्याचा पुरावा लोकांपुढें मांडून आपल्या कृतीचें समर्थन करतील अशी आम्ही उमेद बाळगतों. मुस्लीम लीगपुढें दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे स्वराज्याच्या ठरावासंबंधाचा होता. या ठरावावर ना. मि. जिना यांचें भाषण इतकें उत्तम व खात्री पटविणारें झालें कीं या ठरावासंबंधानें मतभेद होऊन लीगमध्यें दुफळी होण्याचा रंग पार नाहींसा झाला. शिक्षण परिषदेचे अध्यक्ष मि. हैदरी हे होते. देशांत एकी झाली पाहिजे व ती वर्तमान काळास अनुसरून बदललेल्या पूर्व संस्कृतीला धरून व उदारतेच्या पायावर बसविलेली पाहिजे या मुद्यावर त्यांचा कटाक्ष होता. हा त्यांचा मुद्दा त्यांनीं सप्रमाण व जोरानें प्रतिपादिलेला पाहून हिंदुस्थानच्या प्रगतीच्या शत्रूंना अत्यंत खेद झाला असला पाहिजे. पण अधिकाऱ्यांच्या तोंडाकडे पाहून त्यांना गोड लागेल असें बोलण्याचे दिवस गेले, आपल्या देशाचें हित कशांत आहे तें लोकांस कळूं लागलें आहे व त्यामुळें अप्रिय सत्य उच्चारण्यास ते आतां भीत नाहींत. उच्चारा मागून तसें आचरण करण्याची ही वेळ येऊन ठेपली आहे हें ही हिंदुस्थानच्या हितशत्रूंना लवकरच दिसून येईल.

## लॉर्ड मॉर्ले आणि स्थानिक अधिकारी.

हिंदुस्थानाविषयक प्रश्नांवर अधिकारयुक्त निकाल देण्याची पात्रता विलायतेंत राहणाऱ्या लोकांच्या ठायीं खरोखर नसते, ती स्थानिक अधिकाऱ्यांच्याच ठायीं असते, सबब त्यांच्याच मताचें वर्चस्व पार्लमेंटांत व्हावयास पाहिजे तरच हिंदुस्थानचा राज्यकारभार सुरळीतपणें चालेल असें आंग्लोइंडियनपत्रें जेव्हां तेव्हां म्हणत असतात, व ' सुरळीतपणें ' या शब्दाचा त्यांचा अर्थ हिंदुस्थानच्या हिताला उपकारक असा नसून हिंदुस्थानांतल्या गोऱ्या समाजाच्या फायद्याचा असा असतो हें हिंदुस्थानांतल्या लोकांना पूर्णपणें ठाऊक आहे. विलायतेंतले लॉर्ड मोर्ले सारखे राजनीतिज्ञही हा अर्थ पूर्णपणें ओळखून आहेत. मात्र हिंदुस्थानांतल्या अधिकाऱ्यांच्या मताला विरोध करण्याइतकें मनोधैर्य त्यांचे ठायीं नसल्यामुळें या अधिकाऱ्यांच्या मनाप्रमाणें सगळ्या गोष्टी घडून येत असतात. लॉर्ड मोर्ले साहेबांनीं आपल्या आठवणींचें जें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे त्यांतला या संबंधाचा उतारा वाचनीय आहे. हिंदुस्थानांतल्या राज्यकारभाराचें कामीं येणाऱ्या अडचणी हिंदुस्थान सरकारला जितक्या कळतात तितक्या पार्लमेंटच्या सभासदांना कळत नाहींत असें लॉर्ड मिंटो यांनीं लिहिलें होतें त्यास उद्देशून मोर्ले साहेब स्पष्टपणें विचारतात ' तुमच्या कौंसिलच्या मेंबरा इतकी सुद्धां अक्कल ॲस्किथ, ग्रे, लोरबर्न प्रभृति मुत्सद्यांना नाहीं अशी कां तुमची समजूत आहे? हिंदुस्थानचे लोक व त्यांचा स्वभाव यांतल्या खुब्या आपणास कळल्या आहेत असें म्हणणारे हे तुमचे अधिकारी हिंदुस्थानचा राज्यकारभार करण्यांत यशस्वी झाले आहेत काय?........होम गव्हर्नमेंट म्हणजे महामूर्ख अशी जी सिमल्यास समजूत झालेली आहे ती मला बिलकूल मान्य नाहीं. " स्थानिक अधिकाऱ्यांची ज्ञानाविषयींची घमेंड लॉर्ड मोर्ले यांनीं या प्रश्नांच्या द्वारें चांगलीच उतरली होती. त्यानंतर मेसोपोटेमिया कमिशनच्या रिपोर्टावर मि. माँटेग्यु यांनीं केलेल्या भाषणांत ही स्थानिक अधिकाऱ्यांच्या अहंमन्यतेवर चांगली ताशेरा झाडण्यांत आला होता. इतकी फजीती झाली तरी आंग्लोइंडियनपत्राकर्ते वेळीं अवेळीं स्थानिक अधिकाऱ्यांच्या सर्वज्ञतेचें स्तोम माजवून विलायतेंतल्या लोकांच्या ज्ञानाविषयीं कुत्सितपणाची टीका करण्याची खोड टाकीत नाहींत या निर्लज्जपणाला काय म्हणावें? लॉर्ड मोर्ले हे स्पष्ट म्हणतात कीं इंडिया सरकार हें एक ओतीव यंत्र आहे व तें काळाच्या तडाख्यांत चुरडले गेलाच पाहिजे. त्यांच्या मतें हा चुराडा हळू हळू व मंद गतीनें व्हावयाला पाहिजे; पण सांप्रतच्या लढाईच्या तत्वज्ञानापुढें इंडिया सरकार आतां एक क्षणभरही टिकूं शकणार नाहीं.

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांत प्रत्यक्ष रणक्षेत्रावरची अशी सांगण्यासारखी बातमी फार थोडी आहे. इटालियन रणक्षेत्राकडें बर्फ पडूं लागल्यामुळें तिकडे जर्मनीला पाय पसरण्याची संधी आतां मिळणार नाहीं हें आतां निश्चित आहे. मेसोपोटेमिया व पॅलेस्टैनमध्यें तुर्क लोकांचें फारसें चालत नाहीं. जेरूसलेम परत घेण्याचा त्यांचा यत्न निष्फळ झाला, आणि जरी ते अद्याप हताश झालेले नाहींत, तरी इंग्रजांची बाजू तिकडे भक्कम आहे हे ते लोक पूर्णपणें जाणून आहेत. रशियाकडचा युद्ध भाग कर्धीच आटोपला आहे. जर्मनीनें तहाच्या घातलेल्या अटी रशियानें यद्यपि मान्य केल्या नाहींत तरी रशिया पुनरपि हातांत शस्त्र धरील व त्यापासून मित्रराष्ट्रांवरचा भार किंचित् देखील हलका होईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. दरवेशानें पकडलेलें अस्वल एखादे वेळीं बिथरून दरवेशाच्या मर्जीप्रमाणें नाचण्यास आपण तयार नाहीं असें गुरगुरून व थयथयाट करून दाखवूं लागलें तरी तेवढ्यावरून त्या दरवेशाचा त्याच्यावरचा ताबा उडून अस्वल स्वतंत्र झालें असें मानतां येत नाहीं. क्षणभरानें तें वठणीवर येतेंच, तशीच आज रशियाची स्थिति झाली आहे. रशियन अस्वल जर्मन दरवेशाच्या हातांत पूर्ण गेलें आहे. त्यानें त्या अस्वलाच्या नाकांत वेसण ही घातली आहे. आता त्या अस्वलाचा थयथयाट क्षणभर लोकांना तमाशा दाखविण्यापुरताच आहे, यापलीकडे त्यांत अर्थ नाहीं हे शहाणे लोक जाणून आहेत. पोलांड, कोरल्यांड वगैरे प्रदेश आपल्या ताब्यांत असावेत ही जर्मनीची इच्छा. पण बाह्यतः जर्मनी असें दाखवीत आहे कीं त्या प्रदेशांना बळकावण्याची आपली बिलकूल इच्छा नसून तेथलेच लोक जर्मनीच्या ताब्यांत जाण्यास उत्सुक आहेत. खरी गोष्ट अशी आहे कीं ज्यांना आपल्या देशाचा व स्वत्वाचा अभिमान आहे असे लोक अगोदरच रक्षणार्थ देशत्याग करून कधींच मेले आहेत, व जे राहिले आहेत ते जर्मनीच्या कांचनानें वश करून घेतलेले आहेत तेव्हां जर्मनीच्या ताब्यांत जाण्यास उत्सुक असलेले हेच लोक असले पाहिजेत. पण या मूठभर लोकांचें मत तें एकंदर देशाचें लोकमत कसें म्हणतां येईल. सध्या तहाचें बोलणें येथें थांबलें आहे.

## तहाचीं तीन मूलभूत तत्त्वें.

सध्यां युरोपाच्या वातावरणांत तहविषयक चर्चा भरली असल्यानें तह झाल्यास तो कोणत्या तत्त्वानुसार होईल या विषयीं ब्रिटिश साम्राज्याच्या मुख्य प्रधानाचें व एकंदर क्याबिनेटचें मत काय आहे इकडे लोकांचे डोळे लागले होते. मुख्य प्रधान मि. लॉईड जॉर्ज यांनीं या बाबतींत लोकांना संदेहांत न ठेवतां वेस्ट मिन्स्टर येथील व्यापारी संघापुढें केलेल्या आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषणांत या संबंधांत इतका स्पष्ट खुलासा केलेला आहे कीं हें त्यांचें भाषण एकंदर ब्रिटिश जनतेचें मत म्हणून बेलाशक समजण्यास हरकत नाहीं. तहाचीं तीन मूलभूत तत्त्वें त्यांनीं सांगितलीं. पहिलें तत्त्व हें कीं राष्ट्राराष्ट्रांत पूर्वी ठरलेले तहनामे पवित्र समजून त्यांचा योग्य आदर ठेविला पाहिजे. तहनामे किंवा करार म्हणजे कागदाचीं केव्हां ही फाडतां येणारीं चिठोरीं ही समजूत केव्हां शांततेचा भंग करण्यास लावील याचा नेम नाहीं. प्रस्तुत युद्धाला हें तत्त्व लाविलें म्हणजे बेल्ज्यमची स्वतंत्रता त्याला परत दिली पाहिजे, इतकेंच नाहीं तर त्याची पूर्वीची भरभराटीची स्थिति त्याला परत आणून देण्याची ही जबाबदारी जर्मनीवर येऊन पडते. दुसरी गोष्ट प्रजेच्या संमतीच्या पायावर बसविलेल्या राज्यपद्धतीचा भाग नव्या कराराच्या मुळाशीं असला पाहिजे. या तत्त्वानें बेल्ज्यमच नव्हे तर सर्विया, रुमानिया, पोलंड, रशियाचा जर्मनीनें घेतलेला प्रांत, अर्मेनिया, मेसोपोटेमिया व अरबस्थान इतक्या मुलखांतल्या लोकांचें भवितव्य त्या त्या लोकांच्या संमतीनें ठरविलें पाहिजे. आणि तिसरें तत्त्व म्हणजे युरोपांतल्या कोणत्या ही राष्ट्रानें आपलें सैन्यबळ अतोनात वाढवूं नये व शांततेचा भंग त्याला करतां येऊं नये म्हणून सर्व राष्ट्रीय असा एखादा संघ सर्वांना योग्य मर्यादेंत व व्यवस्थित रीतीनें वागविण्यासाठीं निर्माण झाला पाहिजे. जर्मनीनें देंडुकशाही चालवून आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा क्रम जो आज कित्येक वर्षे स्वीकारला आहे त्याच्या अगदीं विरुद्ध हें तिसरें तत्त्व आहे, किंबहुना त्याला किंवा तें धोरण स्वीकारूं इच्छिणाऱ्या इतर महत्त्वाकांक्षी राष्ट्रांना दाबांत ठेवण्यासाठीं या तत्त्वाची अत्यंत अवश्यकता आहे हें युरोपचा सध्याचा इतिहास बरवर पाहणाराला सुद्धां कळून येणार आहे. मि. लॉईड जॉर्ज यांनीं सांगितलेलीं हीं तीन तत्त्वें कायमची शांति स्थापित होण्यास अत्यंत अवश्यक आहेत या विषयीं साऱ्या जगाचें एकमत आहे आणि म्हणूनच इंग्लंडांतले भिन्न भिन्न पक्षांनींच नव्हे तर फ्रान्स, अमेरिका वगैरे प्रमुख राष्ट्रांनीं मि जॉर्ज यांच्या या भाषणाची अतिशय तारीफ करून त्यास आपली पूर्ण संमति दिली आहे.

## युद्धविषयक बातम्या.

प्रस्तुत युद्धासाठीं विलायतेंत सरकारकडून जें कर्ज काढण्यांत आलें आहे त्यांत आतांपर्यंत लोकांकडून ब्यांकमार्फत २१ कोट पौंडांची रकम भरण्यांत आली आहे. पोस्टांच्या मार्फत १ कोट पौंडांवर रकम जमा झाली असून वॉर सेव्हिंग सर्टिफिकिटांच्या रूपानें जवळ जवळ १४ कोट पौंड मिळाले आहेत.

पस्तीस वर्षांच्या वयाच्या वरच्या सगळ्या लोकांना जबरदस्तीनें पश्चिम रणक्षेत्रावर पाठविण्याचा जर्मन सरकारनें हुकुम सोडल्यामुळें जर्मनींत फार क्षुब्धता उत्पन्न झाली असून २५००० लोकांनीं बंड केलें व रायफल बंदुका व यांत्रिक तोफा घेऊन खंदकाचा आश्रय केला आहे. जर्मन सैन्याचा रसद बंद करण्याचा त्यांचा यत्न आहे असें राशियन पत्रकावरून कळतें.

फिनल्यांडमध्यें स्थापन झालेलें प्रजासत्ताक राज्य जर्मनीनें कबूल केलें.

सबमरीननें बुडविलेल्या ब्रिटिश बोटींची संख्या गेल्या वर्षांतल्या पेक्षां यंदा कमी झालेली आढळते. नाश केलेल्या जर्मन सबमरीनची १९१७ सालच्या तीन महिन्यांची संख्या गतवर्षीच्या याच मुदतींतल्या संख्येच्या नऊपट आहे

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—तिलसंक्रांतीचा ऋतु आरोग्याला जोमदार थंडीमुळें जसा मानवतो तसा तो प्लेगालाही चांगला उत्तेजक असतो असा यंदाचा अनुभव आहे. जवारीचा भाव फार कडाडल्यामुळें लोक मोठे हवालदिल झाले आहेत.

**प्लेग**—मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून दर हप्त्याला सरासरी ८००-९०० लोक मरण पावतात. त्या पैकीं तारीख २९ डिसेंबर पर्यंतच्या आठवड्यांत सुमारें ९०० मृत्यू वऱ्हाडच्या वाट्याला येतात. हल्लींच्या चांगल्या ऋतुंतही हा प्लेगाचा फैलाव सांप्रतचीं गांवें व नगरें आरोग्याच्या दृष्टीनें दुसरीकडे खुल्याहवेच्या मोकळ्या मैदानांत नेण्याविषयीं सुचवित आहे.

रा. रा. गोपाळ वामन बापट जज्ज स्मालकाज कोर्ट नागपूर यांची वर्ध्याला बदली होऊन त्यास ॲडिशनल सेशन जज्जचे अधिकार देण्यांत आले आहेत आणि रा. रा. बाळकृष्ण नरहर मूलकर सबजज्ज नागपूर यांस तेथेंच स्मालकाज कोर्टाचे जज्ज नेमण्यांत आलें.

रा. रा. भूपेंद्रनाथ घोष सबार्डिनेट जज्ज बुलडाणा यांनीं दुसरे वर्ग मॅजिस्ट्रेटचेही अधिकार देण्यांत आले आहेत.

**दुधाचा पुरवठा**—दुधाचा प्रश्न उत्तरोत्तर बिकट होत चालला आहे आणि म्हणून नागपूरच्या कॉलेजला सरकारी दुधदुभत्याचा कारखाना जोडण्याचा विचार चालू आहे. असे प्रयत्न वऱ्हाडांतील पुष्कळशा शहरांमधून करण्याला हा अवसर महत्वाचा आहे आणि सर बेंजामिन या बाबतींत सरकारी मदत देण्याला उद्युक्त आहेत ही समाधानाची गोष्ट होय. गायगांवला रावसाहेब कुळकर्णी हे असाच कारखाना सहकारी तत्वावर काढण्याच्या विचारांत आहेत असें कळतें. त्याशिवाय दुधाच्या महर्गतेमुळें 'घृतमायुः' हा मंत्र हळूहळू फलमूलाकडे आयुष्याची रेषा बदलली पाहिजे.

**कृषिशाला**—जिल्हानिहाय शेतीच्या प्रयोगशाला काढण्याचा आणि तेथें शेतकऱ्यांच्या मुलांना कृषीविद्या शिकविण्याचा उपक्रम व्हावा या दृष्टीनें सर बेंजामिन राबर्टसन यांनीं शेतीच्या रिपोर्टावर आपले उद्गार नमुद केले आहेत ही मोठी संतोषाची गोष्ट होय.

**ग्राम पंचायत**—ग्रामपंचायतीच्या कमिशनचे अध्यक्ष रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार हे उद्यापासून १० दिवसपर्यंत बुलडाणें जिल्ह्यांत फिरतील आणि तारीख २६ जानेवारी पासून १० फेब्रुवारी पर्यंत कमिशनचें काम आकोला जिल्ह्यांत निरनिराळ्या विवक्षित गावीं चालावयाचें आहे. या कमिशनच्या फिरतीच्या प्रोग्रॅमाची सूची येणें प्रमाणें:—

| ता० | स्थळ | ता० | स्थळ |
| --- | --- | --- | --- |
| जानेवारी | | | |
| १५-१६ | जलंब | १७ | नांदूरा |
| १८ | पिंपळगांवराजा | १९ | खेरा |
| २० | मोताळा | २१ | बुलडाणा |
| २२ | चिखली | २३ | देऊळघाट |
| २४-२५ | शेलापूर | २६ | आकोला |
| २७ | रानंदा | २८-२९ | पातूर |
| ३० | वाडेगांव | ३१ | बाळापूर |
| फेब्रुवारी | | फेब्रुवारी | |
| १-२ | गायगांव | ३ | ऊरळ |
| ४ | अंदूरा | ५ | नेर |
| ६-७ | केळीवेळी | ८-९ | आकोला |

**चर्चा**—ग्रामपंचायत ही स्वराज्याची पहिली पायरी आहे या दृष्टीनें सर्व बाजूंनीं लोकांचें मत कमिशनपुढें मांडण्यांत यावें म्हणून येथील जिल्हा कांग्रेस कमिटीची काल रोजीं मुद्दाम जाहीरसभा भरून भवति न भवति करण्यांत आली. इतरत्र ही लोक या बद्दल चांगली जोराची चर्चा करीत आहेत तेव्हां राजश्री जठार यांच्या हातून ग्रामसंस्थेला जें मूर्तरूप येईल तें सर्वांना आवडेल असा भरंवसा वाटतो.

**नजर**—मुंबईच्या राणीच्या बगीचांतील पदार्थ संग्रहालयास यवतमाळचे डिव्हीजनल फॉरेस्ट ऑफिसर यांनीं एक हिंदी अस्वल नजर केला आहे. नागपूरच्या महाराज बागेंतही तो चांगला शोभला असता.

**पैसाफंड**—मुंबईचे या फंडाचे उत्साही स्वयंसेवक रा. रा. पारखी बी. ए. एल्. एल्. बी. हे औद्योगिक फंड गोळा करण्यासाठीं फिरत असून त्यांना बुलढाणे जिल्ह्यांत समाधानकारक आंकडे मिळाले आहेत; पण आकोल्यास त्यांच्या कार्याला यश येण्यापूर्वीं पैसाफंडाच्या कारभाऱ्यांनीं आपला उद्योग लोकांच्या विश्वासाला विशेष पात्र होईल असा अधिक खंबीर केला पाहिजे असा येथील मंडळीच्या विचाराचा रंग दिसतो.

**आनंद रहस्यः**— लोकमान्य टिळक साहेब आपल्या पायावरील फोडाच्या तक्रारीमुळें वर्धा, आकोला, आकोट, खामगांव, वाशिम इत्यादि गांवचा आपला स्वराज्याचा दौरा बंद करून डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणें थोडे दिवस विश्रांती घेण्यासाठीं गेल्या बुधवारीं थेट पुण्याला रवाना झाले. पुढील महिन्यांत त्यांचा संकेत वऱ्हाडांत येण्याचा आहे. आणि त्यांच्या प्रकृतीच्या स्वस्थपणातल्या दर्शन लाभांत व सुख संवादांत खरें आनंद रहस्य आहे हें आतुर व उत्सुक लोक समूहास निराळें सांगणें नकोच.

**रिकले पिंजराः**— गेल्या डिसेंबरच्या १८ तारखेपासून ३ दिवस वऱ्हाड विद्यापरिषद यवतमाळ येथें भरली होती. तेथें तिन्ही दिवशीं डॉक्टर काणे, रावबहादुर मुंडळे व रा. रा. लक्ष्मणराव अभ्यंकर वकील यांचीं अनुक्रमानें मुद्दाम व्याख्यानें करविण्यांत आलीं. पण शेवटल्या दोन वक्त्यांच्या शिक्षण या विषयावरील व्याख्यानांसंबंधात राजश्री मेह्यू डायरेक्टर यांनीं रावबहादुर मुडल्यांचा उपरोधिक भाषणानें उपमर्द केला आणि त्यांच्याच मायाचक्रावर भ्रमण करणाऱ्या शिक्षकांनीं राजश्री अभ्यंकर यांच्याविषयीं उपमर्दकारक निषेधाचा ठराव पसार केला आणि तो राजश्री चॅपमन डेप्युटि कमिशनर यांनीं भर कचेरींत रा० अभ्यंकर यांना अर्पण केला! विद्या परिषदेंत हा विनयाला घातलेला पिंजरा पाहून रिकले पार्किंसन.विषयीं चर्चा करणाऱ्या व्याख्यात्यासंबंधानें सिंहिणीप्रमाणें हे सरकारी अधिकारी कसे चवताळतात यांची कल्पना वरील प्रकारच्या गेल्या 'महाराष्ट्रा' च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या हकीकतीवरून सहज कळण्यासारखी आहे. आमंत्रित वक्त्यावर छापा घालण्याची ही श्वापदवृत्ती विद्याखात्यांतील श्रेष्ठ तज्ज्ञासच शोभते!

**स्मृतिविषय**—रा. रा. बाळकृष्ण हरी काणे बी. ए. एल्. एल्. बी. वकील आकोला यांस वयाच्या ३० व्या वर्षी प्लेगानें गेल्या शनवारीं देवाज्ञा झाली. तरुण पत्नी वृद्ध मातापितर, व लहान भावंडें यांचा हा वर्धमान व फलपुष्पानीं ओथंबणारा आम्रवृक्ष असा अकस्मात पडावा या पेक्षां संसारांतली दारुण आपत्ती ती कोणती? विद्याभ्यास चालू असतांना अलीपूरच्या बॉम्ब खटल्यांत यांच्यावर तुफान आलें; पण त्यांतून निर्दोषी सुटल्यावर आपल्या मृदुल सुशीलपणाच्या जोरावर ते सेंट्रल हिंदू कॉलेजांतून बी. ए. व पुढें एल्. एल्. बी. झाले व ते वकीलीच्या उद्योगांत नुकतेच नांवा लौकिकाला चढत चालले होते. त्यांचा तो हास्यमुख चेहरा, आनंदी वृत्ती, कार्याची चट्ट चिकाटी आणि सार्वजनिक कार्याची हौस या सद्गुणांनीं चित्रित असलेला हा नकाशा गुंडाळतांना आमच्या प्रेमळ आठवणी त्यांचा पुढील मार्ग अधिक सुखकर व कल्याणप्रद करोत.

रावबहादुर वासुदेव रामचंद्र ढोबळे डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज आकोला यांना ३ महिन्यांची हक्काची रजा १६ फेब्रुवारी पासुन देण्यांत आली आहे.

## आकोला बाजार भाव

| | |
| --- | --- |
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें | २७ ते २८ |
| चांदी | १०१॥ |
| तुरी | ४ ते ५ |
| मुग | ४॥ ते ५ |
| तांदूळ | ७ ते १० |
| तेल | ७ ते ८ |
| जवारी | ८५ ते १३६ |
| गहू काठे | ६ ते ७॥ |
| गहूं खांडवा पीवडा | ८॥ ते ९॥ |
| सरकी | ३० ते ३५ |
| कापूस | २२५ ते २३० |

## जाहीरखबर

आकोला येथील व इतर सर्वत्र लोकांसः-

या जाहिर लेखानें जाहीर करण्यांत ते कीं, मेहरबान महमद याकुबखान न्शानर व्हेटरनरी असिस्टंट राहणार अकोला ३ महिन्या पूर्वी मरण पावले. त्यांची थावर जंगम जिनगी बरीच असून खालीं सही करणार हे महमदी शास्त्राप्रमाणें हिस्सेदार व वारस असून सर्व जिनगी माझ्या ताब्यांत व वहिवाटींत आहे. आमचे वडील ह्मणजे वरील महमद याकुबखान हे जिवंत असतांना सगळ्या जिनगीची देखरेख मीच करीत होतों आणि आह्मा दोघांच्या मेहनतीनें व मिळकतीच्या रकमेनें आज विद्यमान असलेली जिनगी संपादन केली आहे. ही गोष्ट सर्वांस जाहिर असून ही मला आतां असें कळते कीं महमद सईदखांन वा अब्दुल मजीदखांन राहणार कसबा गोत्मी जि. प्रतापगढ हे मोगलाई प्रकार चालवून माझ्या वहिवाटींतल्या जिनगीला दखल देवूं पहात आहेत. त्यांना असे करण्याला या जिनगीची कोणतीच त्यांची मालकी हक्क किंवा स्वामित्व नाहीं. ते खोट्या व निराधार कंड्या ही उठवितात आणि त्यामुळें आमच्या अब्रूला व इज्जतीला मोठाच धक्का पोंचेल. असें वातावरण ते तयार करीत आहेत. अशी ही खबर लागते कीं या त्यांच्या अयोग्य वर्तनाला आमचा लहाना सावत्र बंधू युसुफखां सामील झाला आहे. या दोघांच्या लबाड्यामुळें माझ्या वहिवाटीला धक्का पोंचतो आणि रोख नगदी रकम, दागदागीना व इतर घरांतील चीज वस्तू हीं निरनिराळ्या खोट्या बहाण्यानें वरील दोन्ही इसम लांबवीत आहेत आणि या रितीनें जिनगीची धुळधाण होऊं पहात आहे. वरील प्रकारामुळें वरील दोघा इसमांच्या हातीं कांहीं दागीना, नगदी रकम व दुसऱ्या कांहीं मौल्यवान वस्तू या लागल्या असून त्यांच्या बरोबर सावकाराकडे असलेली अमानत रकम ही नेण्यांत आली आहे. या दोघांनीं कर्ज काढण्याला प्रारंभ केला असून त्यांचा इरादा त्या कर्जाचा बोजा मयत याकुबखांन यांच्या जिनगीवर बसविण्याचा आहे.

या जाहीर लेखानें सर्वत्रांस खबर देण्यांत येते कीं मरहूम महमद याकुबखान यांच्या स्थावर जंगम जिनगी संबंधानें सर्व मालकी वहिवाट व ताबा माझ्याकडेस आहे. महमद सईदखांन किंवा त्यांचे जोडीदार महमद युसुफ यांना माझ्या संमतीशिवाय कोणती ही देवघेव किंवा व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. जर कोणी मला न विचारतां देवघेव किंवा व्यवहार करील तर त्याची जबाबदारी ज्याच्या त्याच्या माथीं राहील. साहू सावकार व आमचे शेताचे वहितदार या लोकांनीं ही आह्माला विचारल्या शिवाय व आमच्या लेखी पावती शिवाय अमानत रकमा अगर इतर पैसे कोणाला ही देऊं नयेत. कोणाला ही तकलीफ होऊं नये व आगाऊ ह्मणून ही सूचना करीत आहे. तसेच महमद सईदखान व महमद युसुफखान यांच्याशीं ही अलग व्यवहार करण्याची जोखीम ज्यांनीं त्यांनीं आपल्या शिरावर घ्यावी. त्याचा जिनगीचा कांहीं संबंध राहणार नाहीं. कळावें. ता. १२।१।१९१८

सही

महमद यामीनखां वा महमद याकुबखां डाक्टर मरहूम आकोला

नों० नं० ३४

---

## नोटीस

रा. रा. गणु नारायण बोरडे रा. पळसो ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे आशील रा. मानाजी वा जानजी माळी रा. पळसो यानीं तुमचे पासून २००० रुपयांचे भरण्यांत ता. २-१-१८ इ रोजीं मौजे पळसो खुर्द ता. आकोला येथील शेत स० नं० १०३ पो. नं. १ या शेताचे रजिष्टर खरेदीखत करून घेतलें. सदरहु खरेदीखताचे भरण्यापैकीं रुपये १२०० बाराशे आमचे पक्षकारानें रोख तुह्मास ता. २२-१२-१७ इ. रोजीं दिले आहेत. व त्या बद्दल तुह्मी आपखुषीनें त्यांस स्वदस्तुरची पावती ही दिली आहे. तुह्मी वऱ्हाड समाचाराचे ता. ७-१-१८ चे अंकांत आमचे पक्षकारास एक खोट्या मजकुराची नोटीस दिली आहे. व त्यात सदरहु पावती १२०० रुपयांचा भरणा न देतां गांवांत रुपये घेऊन भरून पावल्याचे कबूल करण्यास लावले असा खोटा मजकूर लिहिला आहांत. आमचे पक्षकाराचे तुह्मास असें ह्मणणें आहे कीं तुह्मी दुसऱ्याचे सांगण्यावरून ही खोटी नोटीस दिली, हें तुह्मास उचित नाहीं. दुसऱ्याचा त्यांत काय हेतु आहे हें स्पष्ट दिसत आहे.

खरेदीचे भरण्यापैकीं दुसऱ्या लोकांचे हवाले आमचे पक्षकारानें घेतले आहेत. त्या हवाल्यांची फेडीची व्यवस्था ही आमचे पक्षकार करीत आहे. त्या हवाल्यांची जबाबदारी आमचे पक्षकारांनं घेतली आहे. त्याबद्दल तुह्मास काळजी नसावी. हवालदारांचे पैशाची फेड केल्याबद्दलची पावती वगैरे मागण्याचा तुह्मास अधिकार नाहीं. कारण ती आपले जवळ ठेवण्याचा अधिकार आमचे आशीलाचा आहे. तसेच तुह्मी करून दिलेले खरेदीखत किंवा खरेदीचा व्यवहार रद्द करण्याचा अधिकार तुह्मांस नाहीं. तसेच शेतावर आतां तुमचा कोणते ही प्रकारें मालकी न राहिल्यामुळें त्याची तुह्मी ह्मणता त्याप्रमाणें निराळी व्यवस्था करण्याचा ही तुह्मास कोणताही अधिकार नाहीं. तुह्मी विनाकारण गैरकायदा वर्तन कोणत्या ही प्रकारें करू नये अशाबद्दल तुह्मास मुद्दाम सूचना ह्या नोटिशीनें देण्यांत येत आहे. तुह्मी कोणतेही प्रकारें गैर कायदा वर्तन कराल तर त्याबद्दल कायद्यानें सर्व जबाबदारी तुमचेवर राहील. कळावें ता १२।१।१९१८ इ.

सही

V. K. Rajwade<br>
Pleader for<br>
Manaji Janji

नो० नं० ३९

---

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिज्वर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो नं १४

---

### युनानी इलाज!

युनानी व आयुर्वेदिक शास्त्राधारें तयार केलेला.

# संजीवनी पाक



यांत प्रवाळ, मौक्तिक, शीलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

**बालामृत संजीवनी कि. १ रु.**

आमच्या औषधांबद्दल निरनिराळ्या प्रदर्शनांतून सार्टीफिकिटें मिळालीं आहेत. खात्री करा.

संजीवनी औषधालय

निमगांव—नांदूरा G. I. P.

नो० नं० ३६

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें मागचटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H. L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 16 Dadar Bombay

---

### कागदी बादाम

सर्वोतम ८१० गिरी जर्दालू ८९, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८३, गरी अक्रोट ८४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३९, सुर्मा मर्मीरा, ३ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८९ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो. नं. १७

---

### ५०० फोटो १ रु. त!

निरनिराळ्या साधु— संतांचे, नांव गांवासह व पाहतांच ओळख पटण्या इतके हुबेहुब ३०० फोटोंचे; सुंदर **दहा चित्रपट!** किं० रुपये २॥; १।; व ८१० आणि लोकोत्तर चमत्कार, जगांतील आश्चर्यें, चौऱ्यांशीं आसनें, सुंदर—सुंदर स्त्रिया आणि मनोविकार व प्रेम इ, २०० फोटोंचे **सहा चित्रपट!** किं० रु० १॥; ८१२ व ८६ ( सोळा चित्रपटांवर ५ हंजार वर्षांचें **क्यालेंडर** बक्षीस! )

**श्री० वा० नगरकर, नाशिक**

नों० नं० १८

---

### रोल्डगोल्ड सोन्याच

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३—४; गोठ जोडी २—२॥; पाटल्या जडी २—२॥; वज्रटीका ३—४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनी बांधलेली ४—५. शिंप्याचें मोती लहान मोठें वाटेल तसें. सराची २—३—४ अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २—२॥. सरी ४

**कैस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी**

**गिरगांव— मुंबई**

नो० नं० १९

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवात्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष [५२] आकोला--सोमवार तारीख २१ माहे जानेवारी सन १९१८ ई० [अंक ३

## अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारी एकच औषधी)

ही हजारो लोकांनीं अनुभवलेली आहे. सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग अँन्ड सन्स मॅनेजर

अमृत बहार कंपनी मुजाबाद

जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. २०

---

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचे सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि कंपनी

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळबादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. २१

---

॥ श्री ॥

### श्री समर्थ मुद्गलेश्वर खटेश्वर महादेव संस्थान राहित साहित ता. आकोला (वऱ्हाड)

श्री संस्थान राहित येथें अनाथ लंगडे पांगळे खुळे यांचे जीवनार्थ श्री बाबांचे आशीर्वादानें एक अन्नसत्र सुरू केलें आहे. चालविणार श्री समर्थ आहेत. तरी या सत्कार्यास पुण्यपरायण धर्म बांधवांनीं हस्तें परहस्तें ईश्वर प्रीत्यर्थ अवश्य शक्त्यनुसार मदत करावी. या कार्यास राहित येथील कांहीं धर्म परायण मंडळींनीं बरीच मदत केली आहे. त्यांत विशेषतः रा. अवचितराव बापू, पांडोबा, माधवराव, दौलतराव, गोपाळराव, वगैरे मंडळीची मदत ३-४ हजार रुपयापर्यंत पोचली आहे. वरील सत्कृत्यास इतरांनीं ही हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

श्रीचा नम्रदास
गणेश्वर बाबा साधु
रा. संस्थान राहित
ता. अकोला (प्रांत वऱ्हाड)

नो. नं. १५

---

## नोटीस.

रा. रा. युसफखा वा। लालखा मुसलमान रा. अकोला :

यांसः——

खालीं सही करणार यांजकडून जाहिर नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी व माझे वडील असे उभयतां एक होऊन मला न विचारतां माझ्या जिनगी संबंधानें कांहीं लटपटी तुह्मी केल्या आहेत असें कळतें.

(२) माझ्या मेहेरची रकम रुपये १० दहा हजार ५ आश्रफि [illegible] दिनार घ्यावयाची आहे. आणि कालेखां साहेब यानीं मरतेवेळीं मला त्याचे हिश्यास आलेली मेहेर वसूल होईपर्यंत माझ्या ताब्यांत ठेवण्याविषयीं हुकूम लिहिलेला आहे. आमच्या महमदी शास्त्राप्रमाणं ही मला जिनगी ताब्यांत ठेवण्याचा अधिकार आहे.

(३) कालेखा साहेब मरतेवेळीं त्यांची खालीं वर्णन केलेली स्थावर जंगम जिनगीचे वर्णन येणें प्रमाणें:—

(अ) मौजे शाहानवाजपूर पैकीं आकोला तालुका व जि. आकोला येथील

१ स. नं. २१ एकर १७८३ आकार १७ यांतील पश्चिमेकडील एक द्वितीयांश हिस्सा विहीरी सुद्धां

२ मौजे जलम टाकळी ता. व जि. आकोला येथील स. नं. ३१ पोट हिस्सा नंबर २ ए. गुं. १३८१८ आकार रुपये ३३८९८३ सालीम

३ मौजे खडकी टाकळी ता. व जि. आकोला येथील स. नं. २६ पोट हिसा नं. १ ए. गुं. १२ आकार रु. २५ सालीम

४ मौजे घुसर ता. व जि. आकोला येथील स. नं. ६८ पोट हिसा नं. २ ए. गुं. ६८२ आकार रुपये १२८८३ एक द्वितीयांश हिस्सा

५ मौजे निरमळखेड ता. व जि. आकोला येथील स. नं. ४ ए. गुं. २०८३३ आकार रुपये ४३ एक द्वितीयांश हिस्सा

६ राहते घरांतील निंमे हिसा

७ भाजी बाजारांतील दुकानचा निंमे हिसा

८ पनाल्यांतील जमीन त्यांतील निंमा हिसा

९ बैल २ गाडी नांदुरी

येणे प्रमाणें स्थावर जंगम जिनगी

(४) मेहेर संबंधीं माझा ताब्याचा हक्क आणि माझा स्वतःचा ८४ चार आण्याचा हिसा या दोहोंला अनुसरून ही सर्व जिनगी तुह्मी माझ्या मेहेराची रकम व महमदी शास्त्राप्रमाणें माझा ८४ आण्याचा हीसा मजला देई पावेतो तुह्मास माझेजवळून हिसकून घेण्याचा कांहीं एक हक्क नाहीं.

५ तुह्मी शाहानवाजपूर व जलम टाकळी या दोन शेतांतील कापूस अजमासे ३०० रुपयाचा व जोडी बंडीचे रुपये ७५ व दुकानाचे इसाराचे रुपये ५० ही सर्व रकम मी आणून देतो असें सांगितले असून मी तुमचे विश्वासावर आजपावेतो वाटपहात आहे. परंतु तुह्मी अद्याप पावेतो मजला आणून दिली नाहीं. तुह्मी माझेशीं कपट विश्वासघात करून मजला फसविलें. तुह्मी ही रकम आमची नोटिस पावतांच आणून द्यावी या प्रमाणें न केल्यास मी तुमचेवर योग्य कोर्टांत विश्वासघाताची फिर्याद फौजदारींत करीन.

६ तुह्मी माझ्या मेहेरची रकम व माझा हिसा मजला दिल्या शिवाय माझ्या स्थावर जंगम जिनगीवर बळजोरी करून ताबा घेऊ नये. असें या जाहीर नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येत आहे. या जाहीर नोटिशी प्रमाणें तुह्मी वर्तन करणार नाहीं व विनाकारण दांडगाई व दंगाधोपा कराल तर तुमचेवर दुसरी फौजदारी करण्यांत येईल. आकोला ता. ७।१।१९१८

सही

१ जयनबबी मर्द कालेखा याचा आंगठा

नो० नं० ३६

---

## जाहिर नोटीस

नोटीस बेशर्मा मारजी मर्द नारायणजी बहिरे राज रा. गोरेगांव पो. मुर्तिजापूर ता. आकोला

इसः—

या जाहिर नोटीशीनें खालीं सही करणार नोटीस देते कीं तूं माझी साक्षांत सवत असून तुला एक मागील घरचा मुलगा (गबा वा। बाळाजी हा आहे.) मला एक नारायणजीचे पोटची मुलगी असून ती मयत नारायणजी राज याचे इस्टेटीची मालक होणार आहे, वास्तवीक तुझा पहिला घरचा मुलगा याचा नारायणजी राज याचे इस्टेटीशीं अर्थाअर्थीं संबंध नसतां तूं त्यांची इस्टेट स्थावर मौजे सांजापूर बद्रागीर ता. आकोला येथील शेत सर्वे नं. ३९ एकर २६ गुंठे २० आकार रुपये ५५ यांतील अर्धा हिस्सा हा आपणा दोघींचे मालकीचा वरील रा. गबा वा। बाळाजी यांस बक्षीसपत्रानें विक्रीनें अगर गहाण अगर कैलपंथ्यानें देणार आहेस असें ऐकतें तरी असें तुला करणें बेकायदेशीर आहे. हा असा इस्टेटीचा दुरुपयोग तूं करूं नयेस. सबब तुला आगाऊ कळवितें कीं असें कांहीं तूं केल्यास ते करणें गैरकायदा होऊन रद्द समजले जाईल. तुझ्या व माझ्या हयातीपुढें वरील जिनगी माझ्या मुलीकडे जाणार आहे. मयत नारायणजीस दुसरी संतती नाहीं. तुझ्या कागदपत्राचा माझ्या जिनगीवर बोजा राहणार नाहीं क. ता. ११-१ १८

सही

सहीची निशाणी आंगठा
आनंदी मर्दे नारायणजी राज रा. गोरेगांव ता. आकोला हिचा खुद्द

नो० नं० ३७

---

## नोटीस

नोटीस बेशमी उकर्डा वा। बाळुबा माळी राहणार मौजे नांद्र कोळी ता. चिखली जि. बुलठाणा

यांसः—

नोटीस देणार गणु वा। बाळूबा माळी राहणार मौजे नांद्र कोळी ता. चिखली जि. बुलठाणा नोटीस देतो कीं, तुह्मी माझे सावत्र भाऊ आहांत. तुमचें वय अजमासे १७।१८ वर्षांचे आहे. तुह्मी व मी आजपावेतो एकत्र राहात असून तुह्मी अज्ञान असतां तुमचा प्रतीपाळ मीच केला आहे. आपली वडीलोपार्जीत असलेली इस्टेट आजपावेतो समाईक आहे. आपण एकत्र असतां आपणास आपले उदरनिर्वाहाचे खर्चा करितां सावकार लोकांचे देणें झालेले आहे. आतां तुह्मी दुसरे लोकांचे नादी लागून घरामध्यें फंद फीतुर चालविला आहे, व तुह्मी आपले समाईक इस्टेटीची अफरातफर करण्याकरितां पोकळ खरेदी अगर कोणत्या ही प्रकारचे कागद लोकांस करून देण्यास तयार आहांत. ह्मणून नोटीस देण्यांत येते कीं, तुमची व माझी वाटणी झाली नाहीं. वाटणी झाल्याशिवाय तुह्मी दुसरे लोकांस आपली समाईक इस्टेट गहाण खरेदी अगर बक्षीस वगैरे करून दिल्यास तो व्यवहार माझे संमतीशिवाय असल्यामुळें मजला कबूल नसून रद्द समजला जाईल. ही नोटीस दिली आज तारीख १२-१-१९१८ इ० द० मनोहर गोविंद देशपांडे अर्जनवीस रा. बुलठाणा

सही

गणु वा। बाळुबा नि॥ आंगठा

नो० नं० ३८

## नोटीस

रा. रा. देविदास पांडुरंग टोळे जात ब्राह्मण रा. मानोरा ता. मंगरुळपीर

यांसः—

खाली सही करणार यांजकडून कळविण्यात येते कीं तुह्मांस ता. ११-८- १६ इ. रोजीं रामचंद्र कणीराम या या दुकानचे कुलमुखत्यार पत्र करुन दिलें होतें परंतु आतां तुमचे कडून दुकानचे काम बरोबर होत नाहीं असे नजरेस आल्यावरुन आह्मीं तुमचे नांवचें मुखत्यार पत्र ता. ८- ८- १७ इ. रोजी रद्द केलें आहे अशा बद्दल आपली पावती झाली आहे. वरील तारखे पासून पुढें तुह्मीं आमचे नांवावर कोणते ही प्रकरचा व्यवहार केल्यास त्याची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील कळावें.ता. १-१- १८

सही.

रामचंद्र कनिराम मारवाडी द. खु

सा. दु. कारखेडा

नो. नं.३९

## पत्रव्यवहार

### मराठा शिक्षण परिषद आणि महाराष्ट्रीय ज्ञानकोश

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

सा० न० वि० वि० तारीख २७-१२-१७ रोजीं भरलेल्या मराठा शिक्षण परिषदेच्या स्वागत मंडळाचे अध्यक्ष रावबहादूर केशवराव देशमुख यांनीं जें भाषण केलें त्यांत ज्ञानकोशाचा उल्लेख खालील शद्बांनीं केला आहे.

"तसेंच भरतखंडांत आपल्या ज्ञातीनेंच प्रमुखपणें इतिहास केला आहे. व तो प्रसिद्ध होण्याचें काम आपला ज्ञाति व इतर समज करीत आहेत. तसेंच नागपुरांत ज्ञानकोश होणें सुरू आहे. प्रसिद्ध होत असलेल्या इतिहासांत व अन्य ठिकाणीं येत असलेला मजकूर आपल्या ज्ञातीविषयीं व आपल्या ज्ञातींतील थोर पुरुषाविषयीं यथातथ्य आहे किंवा नाहीं या विषयीं आपण दक्ष असलें पाहिजे महानुभाव पंथाविषयीं एकदां प्रसिद्ध होऊन बरेंच दिवस अबाधींत राहूं दिलेला मजकूर कसा नडतो हें आपल्या पाहण्यांत आलेंच असेल"

वरील वाक्यावरुन जर कांहीं मराठ मंडळीचा असा समज होईल कीं ज्ञानकोशांत प्रसिद्ध होणारा मजकूर शंकास्पद आहे असे व्यक्त करण्याचा रावबहादुरांचा उद्देश आहे तर त्यांनीं एवढेंच लक्षांत ठेवावें कीं रावबहादुर केशवराव देशमुख हे ज्ञानकोशाचे अभिमानी असून त्यांनीं ज्ञानकोशास द्रव्य रूपानें मदत केली आहे त्याअर्थीं ज्या बोलण्याच्या योगानें ज्ञानकोशास अपाय होईल असें बोलण्याचें कार्य रावबहादुर देशमुख यांच्याकडून व्हावयाचें नाहीं. रावबहादुरांच्या उक्तीचें पृथक्करण करतां त्यांचा हेतु एवढाच दिसतो कीं मराठ्यांच्या इतिहासाविषयीं मराठे समाजानें जागरूक रहावें. त्यांच्या विषयीं चुकीचा मजकूर कोठें प्रसिद्ध झाल्यास त्याचें खंडण व्हावें; कांहीं चुकी राहूं दिल्यास ती चुकी पुढें मागे नडते आणि ज्या अर्थीं ज्ञानकोश तयार करण्याचें काम होत आहे त्याअर्थीं मराठ्यांच्या इतिहासाविषयीं खरा मजकूर प्रसिद्ध करण्याचें आणि अस्तित्वांत असलेल्या मजकुराचा दोष दाखविण्याचें काम जोरानें व्हावयास पाहिजे.

रावबहादुर देशमुख यांच्या वरील विधानांचा उद्देश आह्मी समजतों त्याप्रमाणेंच असला तर त्यांच्या विधानास आह्मीही दुजोरा देतों.

ज्ञानकोश बाहेर पडल्या नंतर त्यांतील चुकाबद्दल समाचार पुढें लोक घेतीलच; तथापि आमच्या ग्रंथांतील दोष ग्रंथ प्रसिद्ध होण्याच्या पूर्वींच प्रसिद्ध व्हावेत अशी जशी आमची इच्छा आहे तशीच मराठ जातींतल्या प्रसिद्ध गृहस्थांची इच्छा आहे हें पाहून आह्मांस आनंद होतो. आज ज्ञानकोशांत लिहिण्यासारखे इतिहासज्ञ मराठ्यामध्यें दिसत नाहींत तथापि मराठ्यांपैकीं इतिहासाच्या अभ्यासाची पूर्व तयारी ज्यांची चांगली झाली आहे अशी मंडळी इतिहासावर परिश्रम करून इतिहासाचा कांहीं भाग लिहिण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतील तर तें ज्ञानकोशाच्या संपादकांस हवेंच आहे याबद्दल आमची खात्री आहे. कांहीं दिवसापूर्वीं रा रा. विठ्ठलराव शिंदे यांनीं मराठ्यांच्या इतिहास संशोधना साठीं जमलेल्या निधीचा उपयोग कसा करावा या संबंधानें ज्ञानकोशाच्या संपादकास सल्ला विचारला असतां संपादकांनीं असा सल्ला दिला कीं इतिहासाच्या अभ्यासास अवश्य असणारीं शास्त्रें अवगत करून घेऊन इतिहास लेखनाचें कार्य करण्यासाठीं चागल्या सुशिक्षित मराठ्यास वृत्ति द्यावी आणि या शिवाय असें ही सांगितलें कीं सुशिक्षित मराठ्यांपैकीं जर कोणी इतिहास संशोधनाच्या कार्यांत लक्ष घालील तर त्यास आह्मी आपल्या आफीसांत काम करण्याची संधी देऊं.

थोडक्यांत सागावयाचें तें हेंच कीं ज्ञानकोशांत मराठ्यांविषयीं मजकूर शंकास्पद येईल असें सांगण्याचा रावबहादुर देशमुख यांचा रोख ही नाहीं आणि ज्ञानकोशाचे धोरण ही त्या प्रकारचें नाहीं. रावबहादुर देशमुख हे मराठ्यास स्वज्ञातीच्या इतिहासाविषयीं अधिक आस्था घेण्यास सांगतात तसेंच आह्मीही सांगतों. ज्ञानकोशांत मराठ्याविषयीं यथातथ्य मजकूर यावा ह्मणून दक्ष राहण्याविषयीं जो स्वज्ञातीस उपदेश केला त्याबद्दल आह्मी आभारी आहोंत. आमचें काम जें ज्ञान जमलें आहे त्या ज्ञानाचें संकलन करण्याचें आहे. सध्याच्या ज्ञानांतच जे दोष असतील ते अशेंकरून आमच्या संकलनांत उतरतील ही गोष्ट मनांत ठेवून इतिहाससंबंधीं यथातथ्य माहिती प्रसिद्ध करण्यांत सर्व ज्ञातींनीं खटपट करावी व ती माहिती आमच्या नजरेस आणण्याची खटपट करावी अशी मंडळातर्फे सर्व ज्ञातीस विनंति करतों कळावें हे विनंती.

गोविंद चिंतामण तांबे

सेक्रेटरी

वऱ्हाडसमाचार

पौष शुद्ध ९ पिंगल संवत्सर १८३९

## मि. कर्टिस आणि स्वराज्य

लखनौ कांग्रेसच्या वेळेपासून मि कर्टिसचें नांव हिंदुस्थानच्या राजकारणासंबंधानें लोकांना ठाऊक झालें आहे. त्यावेळीं दुसऱ्याच्या कारभारांत नसती ढवळाढवळ करूं पाहणाऱ्या या लेखकाचें एक गुप्त पत्र मुंबईच्या क्रॉनिकल पत्रानें उघडकीस आणून त्यावर जी सणसणीत टीका केली व 'राउंड टेबल' नामक संस्थेशीं हिंदुस्थानच्या कित्येक बड्या बड्या अधिकाऱ्यांनीं संबंध ठेवल्याबद्दल कौंसिलांत जेव्हा प्रश्न विचारण्यांत आले तेव्हांपासून मि. कर्टिस यांच्या खोडसाळ चळवळीला थोडासा आळा बसला, तथापि एकदां बोटें भाजलीं तरी लष्करच्या भाकरी भाजण्याचा त्यांचा उद्योग त्यांनीं अजीबात सोडून दिला नाहीं. मि. मांटेग्यु इकडे हिंदी पुढाऱ्यांच्या भेटा घेत होते व त्यांचे स्वराज्याविषयक विचार ऐकून घेत होते अशा वेळीं या उपद्व्यापी लेखकानें जणूं काय आपण मोठे राजकारणी तत्त्वज्ञ आहां आणि हिंदी लोक व युरोपियन अधिकारी दावांनीं ही आपलें शिष्यत्व पतकरलें आहे असा आव आणून हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणासंबंधानें पांच चार जाहिरपत्रें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केलीं. या पत्रांतून स्वराज्यासंबंधानें त्यांनीं बरीच चर्चा केली आहे. ते ह्मणतात कीं आज लोकांत स्वराज्याच्या कल्पना चार भिन्न प्रकारच्या आहेत. ब्रिटिश अधिकारी व त्यांच्या मताचे कांहीं लोक यांची स्वराज्याची कल्पना येवढीच आहे कीं प्रांतिक सरकारावर हिंदुस्थान सरकारचा व हिंदुस्थान सरकारावर पार्लमेंट व स्टेट सेक्रेटरी यांचा जो ताबा आहे तो नसवा. दुसऱ्या कित्येकांना वाटतें कीं स्वराज्य ह्मणजे हल्लींची देशी संस्थानिकांची राज्यपद्धति. हिंदुस्थानचे निरनिराळे भाग करून त्यावर सरकारनें एकेक संस्थानिक नमून त्याच्या स्वाधीन तो भाग करावा, व त्याच्या कारभारांत इंग्रज सरकारनें हात घालूं नये; तिसरी कल्पना ह्मणजे हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत हिंदी लोकांचा हळूं हळूं पण ज्यास्त प्रमाणानें शिरकाव व्हावा; आणि स्वराज्याचें चवथें स्वरूप ह्मणजे कांग्रेस—मुस्लीम लीगच्या ह्मणण्याप्रमाणें हल्लींची राज्यव्यवस्था सगळी कायम असावी, मात्र अधिकारी लोकांना जबाबदार रहावे. या चार कल्पनापैकीं पहिली व शेवटची या दोन मात्र खरोखर अस्तित्वांत आहेत, बाकीच्या दोन मि. कर्टिस याच्यांच स्वतःच्या सुपीक मेंदूंतून निघालेल्या आहेत. हिंदुस्थानची विभागणी करून सर्वत्र देशी संस्थानें करावीं व या संस्थानिकांना पूर्ण स्वतंत्र अधिकार द्यावे ह्मणजे हिंदुस्थानला स्वराज्य दिल्या सारखें होईल असें ह्मणणारा एक तरी इसम वेड्याच्या इस्पितळा बाहेर कोणी असेल कीं नाहीं याची आह्मांला शंका आहे. देशी संस्थानांच्या राज्यपद्धतीचा औपरोधिक रीतीनें उपहास करण्याच्या हेतूनेंच मि. कर्टिस यांनीं ही कल्पना आपल्या पत्रांत गोंविली असली पाहिजे अशी आह्मांस जबरदस्त शंका येते. ज्याला देशस्थितीचें यत्किंचित् ज्ञान आहे व देशी संस्थानांतून अधिकाऱ्यांची अरेरावी कशी चालते, संस्थानिकांना राज्याचें उत्पन्न ह्मणजे स्वतःच्या सुखाकरितां प्राप्त झालेलें असून आपण त्यांतून रयतेकरितां जो अंश खर्च करूं त्याचा स्वीकार त्यांनीं कृतज्ञतापूर्वक मुकाट्यानें केला पाहिजे ही समजूत त्यांच्यांतल्या श्रेष्ठ व्यक्तीच्या ठायीं ही कशी रूढ झालेली असते व त्यामुळें राजांची व त्याच्या खुषमस्कऱ्यांची चंगळ व रयतेचे हाल अशी स्थिति बहुतेक सर्व संस्थानांतून कशी दिसते हें ज्यांना ठाऊक आहे ते स्वप्नांत सुद्धां अशा प्रकारचें स्वराज्य देवाजवळ कधीं मागावयाचे नाहींत हें मि. कर्टिस यांना माहित नसेल तर त्यांना हिंदुस्थानची कांहींच माहिती नाहीं असें ह्मटलें पाहिजे; आणि जर असून त्यांनीं या गोष्टीचा स्वराज्य विषयक विचारांत अंतर्भाव केला असेल तर तो अप्रामाणिकपणा अत्यंत गर्ह्य ह्मटला पाहिजे. त्याच प्रमाणें हिंदुस्थानांतल्या राज्यकारभारांत गोरे लोक आहेत त्यांच्या जागीं हळूं हळूं काळे लोक नेमा ह्मणजे झालें स्वराज्य ही कल्पना ही आमच्या मतें केवळ मनःकल्पित आहे; अशी मागणी कोणी केव्हां ही केलेली नाहीं. अधिकाऱ्यांची सत्ता मर्यादित करून लोकाचे आपण नोंकर आहों, मालक नाहीं, अशी भावना त्यांचे ठायीं उत्पन्न केली नाहीं, तर अधिकारीवर्ग गोरा असो कीं काळा असो, त्यापासून रयतेचें दुःख तिळमात्र कमी व्हावयाचें नाहीं ही गोष्ट न समजण्याइतक दुधखुळे कोणी निदान सुशिक्षितांत तरी खास नाहींत. कांग्रेस वगैरे राष्ट्रीय संस्था आज कित्येक वर्षें हिंदुस्थानांतल्या राज्यकारभारांत हिंदी लोकांना उच्च अधिकाराच्या जागीं काम करण्याची पात्रता असून व नेमणुका करतांना वर्णभेद न ठेवतां फक्त पात्रापात्रतेचाच विचार ठेवावयाचा असें अभिवचन १८९८ सालच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्यानें दिलें असता ही तें अभिवचन पाळलें जात नाहीं अशी जी वाजवी तक्रार करीत असतात ती तक्रार वरील स्वराज्याविषयक कल्पनेच्यारूपानें मि. कर्टिस यांनीं विद्रूप व भेसुर करून दाखविली आहे असें आह्मांस वाटतें. खरें बोलावयाचें ह्मणजे कांग्रेसाविषयीं विलायतेंतल्या लोकांचा गैरसमज करून देण्याचा मि० कर्टिस यांचा हा निंद्य प्रयत्न आहे आणि त्याबद्दल हिंदी लोकांनीं एकमतानें त्याचा जोरदार शद्बांनीं निषेध करणें योग्य आहे. राहतां राहिल्या दोन कल्पना. एक पहिली व दुसरी शेवटची. पहिली ह्मणजे प्रांतिक सरकारला हिंदुस्थान सरकारच्या व स्टेटसेक्रेटरीच्या ताब्यांतून मुक्त करून स्वतंत्र करण्याची ही अर्थात् आंग्लोइंडियन अधिकाऱ्यांचे बगलबच्चे जे हिंदुस्थानांतले इंग्रजी वर्तमानपत्रकर्ते व इंग्रजी व्यापारीवर्ग त्यांची

## ग्राम पंचायती.

( सेक्रेटरी, डिस्ट्रीक्ट कांग्रेस कमिटी, आकोला, यांजकडून )

नागपूर येथें ता० १३।११।१६ रोजीं भरलेल्या कायदे कौन्सिलच्या बैठकींत रायसाहेब शेट नयमल यांनीं ह्या प्रांतांतील कांहीं निवडक भागांत ग्रामपंचायतींची स्थापना करण्याच्या प्रश्नासंबंधानें विचार करण्यासाठीं एक मिश्र कमिटी नेमावी असा ठराव आणला होता. तो ठराव सरकारनें मान्य करून मेहेरबान जठार साहेब डेप्युटी कमिशनर आकोला यांची हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या पंचायतींची स्थिती अवलोकन करून त्या विषयीं आपल्या प्रांतांत काय करण्याजोगें आहे ह्या विषयीं रिपोर्ट करण्यासाठीं नेमणूक केली. तो रिपोर्ट प्रसिद्ध झाला असून सरकारनें आपल्या प्रांतांत चवकशी करण्याकरितां एक कमिटी नेमिली आहे. ह्या कमिटींत (१) मेहेरबान काशिनाथ श्रीराम जठार (२) मि. विल्स आय. सी. एस्. (३) रा. ब. के. गो. दामले बी. ए. एल एल बी वकील आकोला (४) ना. रा. बाय. जी देशपांडे ॲडव्होकेट उमरावती व (५) रा. ब. केशवराव देशमूख खामगांव हे सभासद असून मेहेरबान जठार साहेब ह्या कमिटीचे अध्यक्ष आहेत. ही कमिटी ता. १६ पासून आपल्या प्रांतांत दौऱ्यावर निघाली असून आकोला जिल्ह्यांत ता. २६ पासून ह्या कमिटीचें काम सुरू होईल. ही कमिटी निवडक खेड्यांत जाऊन वर लिहिलेल्या रिपोर्टांतील योजना लोकांस समजावून देऊन त्या संबंधांत लोकांचें ह्मणणें काय आहे, लोकांस पंचायती हव्यात किंवा नकोत, हव्या असल्यास त्यांचेकडे कोणकोणतीं कामें सोंपवावीं व त्यांचे अधिकार किती असावेत त्याविषयीं चवकशी करून त्या चवकशीचे आधारें एक योजना सरकारपुढें मांडणार आहे. सरकारास नक्की योजना करण्यापूर्वीं लोकांचें काय ह्मणणें आहे तें ऐकून घेण्याची इच्छा आहे व लोकांच्या ह्मणण्या प्रमाणें पुढील योजना तयार व्हावयाची आहे तरी जेव्हां वरील कमिटी चवकशी करण्यासाठीं आपल्या गांवीं येईल तेव्हां आपलें खरें मत निर्भिडपणें कमिटीपुढें मांडणें हें आपलें कर्तव्य आहे. जठार साहेबांनीं सादर केलेल्या मसुद्यांत आपणास कोणते फरक पाहिजेत ते खालीं दिले आहेत. ते सर्व नीट समजावून घेऊन लोकांच्या फायद्याच्या गोष्टी कमिटीपुढें ठेवणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

| सरकारी मसुदा. | लोकांचें मागणें |
| --- | --- |
| १ प्रचलित राज्यकारभारांत सरकारास मदत करण्यासाठीं ग्राम पंचायती नेमणें जरूर आहे. | १ प्रचलित राज्यपद्धति अजिबात बदलून लोकांचा कारभार लोकांचेच हातीं असणें जरूर आहे. लोकांना स्वतःचा कारभार पहाण्याची संवय होऊन मोठमोठीं कामें करण्याची लायकी त्याचेमध्ये उत्पन्न व्हावी ह्मणून त्यांस राज्यकारभार करण्याचें शिक्षण देण्यास व त्यांस स्वावलंबी करण्यास ग्रामपंचायतींची स्थापना झाली पाहिजे. |
| २ ग्राम पंचायती स्थापन करणें, त्यांचे कामावर देखरेख करणें त्यांचे अधिकार काढून घेणें वगैरे संबंधीचे सर्व अधिकार डेप्युटि कमिशनर साहेब यांचेकडे असावे. | २ हे सर्व अधिकार जिल्ह्याचे ठिकाणीं बिन अधिकारी लोकांचें एक मंडळ नेमून त्यांचेकडे द्यावे. |
| ३ पंचाची नेमणूक अखेरीस डेप्युटी कमिशनर साहेब ह्यांचे मताप्रमाणें व्हावी. | ३ पंच केवळ गांवांतील लोकांनीं निवडून द्यावे. त्यांचे निवडणूकींत कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याचा कांहींही संबंध असूं नये. |
| ४ पाटलास पंचामध्यें पाटील ह्या नात्यानें बसण्याचा अधिकार असावा. | ४ लोकांनीं निवडून दिल्याशिवाय पाटलास पंचायतींत बसण्याचा अधिकार नसावा |
| ५ एखादा पक्षकार सरकारी नोकर असल्यास त्या तंट्याची चवकशी ग्राम पंचायती पुढें होऊं नये. | ५ गांवांतील सर्व लोकांच्या तंट्यांची चवकशी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस असला पाहिजे. |
| ६ ग्राम पंचायतीस कर बसविण्याचा अधिकार द्यावा. | ६ ग्राम पंचायतीस कर बसविण्याचा अधिकार देवूं नये. |
| ७ ग्रामपंचायतीत सध्यांचे सरकारी वसुलातील भाग तोडून देवू नये. | ७ सरकार सध्या जो पैसा लोकांकडून करांचे रूपानें वसूल करते त्यांतील ठरावीक भाग ग्रामपंचायतीस तोडून द्यावा. |
| ८ सुरवातीस पंचायतीकडे फक्त किरकोळ दिवाणी व फौजदारी मुकदमे चालविण्याचे अधिकार द्यावे. | ८ ह्याशिवाय खेड्यातील साफसुफी, शिक्षण, संरक्षण, जंगल, शेतकी पाणीपुरवठा, औषधपाणी, रस्ते वगैरेंची व्यवस्था ठेवण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस असावे व ह्यासंबंधीची योजना कायद्यांत स्पष्टपणें असावी. |
| ९ पंचांची नेमणूक करतानां सर्व जातींचे प्रतिनिधी निवडून येतील इकडे लक्ष्य द्यावे. | ९ पंचायतीमध्यें जातीचा कांहीं एक संबंध असू नये. गांवांतील लोकांस जे पंच योग्य वाटतील त्यांस निवडून देण्याचा अधिकार लोकांस असावा. मग ते पंच कोणत्याही जातीचें असोत. |

कलम (१)

सरकारनें प्रसिद्ध केलेला मसुदा व लोकांच्या मागण्या ह्यांत वर लिहिलेले मुख्य फरक आहेत. सरकारतर्फे पुढें आलेल्या मसुद्यांत ठिकठिकाणीं धरसोड, फाजील सावधगिरी, लोकांचे योग्यतेविषयीं अविश्वास इत्यादींची रेलचेल असून त्यामुळें सर्व सत्ता जिल्हा अधिकाऱ्यांचे हातांत ठेवण्याची व प्रत्येक मंडळांत सरकारी अधिकारी नेमण्याची विशेष काळजी घेतलेली आहे. तो मसुदा वाचला असतां सरकार कांहीं तरी साहस करण्यास प्रवृत्त झालें आहे अशी सरकारची समजूत असल्याचें दिसतें. दीनदुबळ्या व अशिक्षित लोकांवर विसंबून आपले राज्यकारभाराचें यंत्र कमी कार्यक्षम होईल कीं काय अशी भावना त्यांत पदोपदीं दिसते. उलट, लोकांचें ह्मणणें असें आहे कीं ज्या तुमच्या कारभारानें प्रजा इतकी अशिक्षित, दीन व दुबळी राहिली ती कारभारपद्धती बदला. लोकांचे अधिकार त्यांचे हातांत द्या. खेड्याची सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याची जबाबदारी खेड्यांतील लोकांवर आहे ही गोष्ट त्यांचे मनावर बिंबू द्या. सरकार हें लोकाहून वेगळें आहे ही समजूत नाहींशी करा ही समजूत नाहींशी करण्यास लोकांस खरे अधिकार द्या. प्रत्येक खेड्यांतील लोकांस त्यांचे इच्छेप्रमाणें आपल्या खेड्याचा कारभार पाहूं द्या. ही जाणीव लोकांचे मनांत उत्पन्न होण्यास पुढें लोकमतास जबाबदार राज्यपद्धती सुरू होणार आहे त्याची पहिली पायरी ग्रामपंचायत आहे हें लोकांचे मनावर ठसल्याशिवाय त्यांस आपली जबाबदारी कळणार नाहीं. सध्यांचे पद्धतींत कर दिला कीं आपलें कर्तव्य संपेल असें प्रत्येकास वाटतें असल्या पद्धतींत सरकारास मदत करण्यास पुढें सरसावण्याची इच्छा होणें दुर्घट आहे. करितां राज्यव्यवस्थेची सर्व जबाबदारी लोकांवरच आहे ही जाणीव उत्पन्न करुन ती जबाबदारी पार पाडण्याकरिताच ग्रामपंचायतींची स्थापना होत आहे ही गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे.

२,३,४,५,९

वर लिहिलेल्या कारणाकरितां ग्रामपंचायती संबंधाचा सर्व अधिकार बिनसरकारी लोकांचेच हातांत असला पाहिजे व पंचांची निवडणूक गांवांतील लोकांच्या मताप्रमाणेंच झाली पाहिजे. त्यांत सरकारी अधिकाऱ्यांनीं कांहीं एक ढवळढवळ करूं नये लोकांनीं पाटलास पंच निवडल्यास त्यांनीं पंचायतींत बसावे. सरकारी अधिकारी ह्या नात्यानें पाटलास पंचायतींत बसण्याचा अधिकार दिल्यास पंचांचा पंचपणाच नाहींसा होईल. त्याचप्रमाणें पंचायतीस खरे अधिकार द्यावयाचे असल्यास सरकारी नोकरांचे खाजगी तंटे पंचायतीपुढें चवकशीस येण्यास कांहींच हरकत नाहीं. जे खरेपणानें निकाल देणारे लोक आहेत त्यांचे मनावर एखादा पक्षकार सरकारी नोकर असला तरी त्याचें वजन पडणार नाहीं. व वजन पडेल तर असला मनुष्य पंच होण्यास लायक नाहीं. प्रसंगविशेषीं सरकारी नोकराविरुद्ध निकाल न्यायानें दिल्यास त्याजपासून आपणांस कांहीं त्रास होत नाहीं अशी लोकांची खात्री पटली ह्मणजे कांहीं एक अडचण उत्पन्न होणार नाहीं शिवाय गावांतील सरकारी नोकरांचे विरुद्ध सुद्धां पंचायतींत न्याय मिळतो असे दिसलें ह्मणजे पंचायतींची इभ्रत वाढेल. त्याचप्रमाणें पंचायतींमध्यें जातीभेदाचें पिशाच शिरकविण्याची कांहीं एक गरज नाहीं. दुर्दैवानें इंग्रज सरकारनें जातीभेदाचें स्तोम माजविलें आहे. परंतु लोकांची पक्की खात्री आहे कीं जातीभेदाचा राजकीय परिस्थितीशी कांहीं एक संबंध नाहीं. खेड्यांतील सर्व जातीचे लोक शेंकडो वर्षे सुखानें एके ठिकाणीं नांदत आहेत. त्यांना धार्मिक गोष्टी सोडून एकमेकांच्या जातीची आठवण ही होत नाहीं. अशा लोकांत प्रत्येक जातीचे लोक पंचायतींत येण्याकडे लक्ष दिल्यानें विनाकारण जातींकडे जास्त लक्ष देण्याकडे प्रवृत्ति होईल व त्यामुळें खेड्यांतून एक नवीनच अरिष्ट उत्पन्न होण्याचा संभव आहे.

६।७

ग्राम पंचायत ह्मणजे सरकारा व्यतिरिक्त कांहीं एक नवीन गोष्ट नसून तें सरकारचेंच खेड्यांतील मूर्तिमंत स्वरूप आहे अशी लोकांची खात्री पटण्यास सरकारी उत्पन्नांतीलच कांहीं एक भाग ग्राम पंचायतीस तोडून देणें जरूर आहे. ग्राम पंचायतीस स्वतःचे उत्पन्नाकरितां नवीन कराचे रूपानें पैसे वसूल करू दिले तर लोकांस असें वाटेल कीं सरकार तें वेगळें आहे व ही पंचायत सरकारपासून वेगळी आहे. ही कल्पना खेड्यांतील लोकांचे मनांत उत्पन्न होता कामा नये. सरकार खेड्यांत जीं कामें करितें त्यांतील बहुतेक कामें पंचायतींनीं करावयाचीं असल्यानें त्या कामीं सरकार खर्च करीत असलेला पैसा सरकारनें तीं कामें करण्यासाठीं पंचायतीपाशीं देणें न्यायतःच प्राप्त होतें. शिवाय लोकांची कर देण्याची शक्ति मर्यादित आहे ही गोष्टही विसरतां कामा नये. हल्लींच दुष्काळ, महागाई इत्यादि कारणांनीं लोकांस सध्याचेच कर देणें जड झालें आहे. अशा स्थितींत लोकांवर नवीन करांचें ओझें लादणें युक्त नाहीं. लोकोपयोगी नवीन सुधारणा अंमलांत आणणें हें सरकारचेंच कर्तव्य आहे. हें कर्तव्य सरकारनें स्वतःचे सध्याचे उत्पन्नांतूनच पार पाडलें पाहिजे.

सरकारी मसुद्यांत सांगितलेल्या किरकोळ दिवाणी व फौजदारी अधिकारा खेरीज कलम ८ यांत लिहिलेल्या खात्यांतील अधिकारही पंचायतीकडे लवकर सोंपाविण्यांत आले पाहिजेत. ह्या संबंधीं सरकारी मसुद्यांत एक मोघम कलम आहे पण कोणती कामें पंचायतीवर सोंपवावीं ह्याचा स्पष्ट उल्लेख कायद्यांत असणें जरूर आहे. पंचायत स्थापन झाल्यावर केवळ न्यायाचें काम फारच अपुरें पडून पंचांस कांहींच काम उरणार नाहीं. शिवाय गांवांतील कामें हल्लीं गावांतलेच लोक करतात. तीं करण्यास कांहीं परठिकाणाहून लोक येत नाहींत. फक्त हल्लीं सरकारी अधिकाऱ्यांचे देखरेखी खाली व त्यांच्या तंत्रानें होतात तीं गांवांतल्या पंचांच्या देखरेखी खालीं होण्यास कांहीं फार कालावधी नको. सरकारच्या मनांतून खरोखरी लोकांवर भार टाकून त्यांचेमध्यें जबाबदारीची भावना उत्पन्न करणें असल्यास त्यांनीं अर्धवटपणाचें धोरण सोडून लोकांवर पूर्ण विश्वास टाकावा. असा विश्वास टाकल्यास लोक आपली जबाबदारी पूर्णपणें ओळखतील व लोकांच्या सहायानें लोकांच्या मदतीवर उभारलेले सरकार आतांच्या सरकारापेक्षां ही जास्त लोकोपयोगी व जास्त सामर्थ्यवान होईल.

(२ कॉलम ४ वरून पुढें चालू)

कारण, जोंपर्यंत हिंदुस्थान सरकार सेक्रेटरी यांचा ताबा प्रांताधिका- आहे तोंपर्यंत गोऱ्या व्यापाऱ्यांना पत्रकर्त्यांना हवा तसा गोंधळ घालतां सांपडत नाहीं. हिंदुस्थानांतल्या प्रातिनिधि कौंसिलांत प्रश्न विचारून आणून अथवा सभा भरवून चळवळ करून वरिष्ठ सरकारास पळो करतात हें मिसेस बिझांट सुटकेवरून त्यांच्या अनुभवास नुक्तेंच आहे व तें त्यांना नको आहे. आपले हातीं अनियंत्रित सत्ता पाहिजे यासाठीं प्रांताधिपतींना पूर्ण अधिकार स्वराज्य मिळाल्यासारखें हिंदी समाधान वाटेल असें ते ब्रिटिश भासवीत आहेत. पण लोकांची मागणी ही नाहीं. त्यांची खरी मागणी मुस्लीम लीगनें ठरविलेल्या म्हणजे चर्चेकारच्या स्वराज्यकल्पनेंत आहे व तेंच नचें खरें लोकमत आहे हें मि० यांना लोकसंस्थांच्या अर्जांवरून व नायकांच्या घेतलेल्या मुलाखतींवरून आलेंच असेल.

## . विल्सन व तहाच्या अटी.

या युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रामध्यें तह कोण कोणत्या गोष्टी अवश्य पाळल्या पाहिजेत या विषयीं ब्रिटिश मुख्य मि. लॉईड जॉर्ज यांनीं केलेल्या सुंदर भाषणाचा सारांश आमच्या गेल्या अंकीं आम्हीं दिला होता. लॉईड जॉर्ज यांच्या भाषणाच्या मागो- अमेरिकेचे प्रेसिडेंट डॉ० विल्सन यांनीं विषयासंबंधाचे आपले विचार प्रकट त्यांनीं मि. लॉईड जॉर्ज यांच्या ही वर ताण केली आहे. या भाषणांत तहाच्या चौदा शर्ती सांगितल्या. त्या प्रमाणें:—

तहाच्या अटी उघड रीतीनें व मोकळ्या ठराव्या म्हणजे त्यांत गैरसमजुतीला राहणार नाहीं.

युद्धाच्या व शांततेच्या दोन्ही काळांत राष्ट्राच्या हद्दीच्या बाहेरील समुद्रभागांत जाण्यास कोणास कसल्या ही प्रकारचा नसावा.

व्यापारावरील निर्बंध शक्य तेवढे काढून यांत येऊन व्यापारविषयक समता करण्यांत यावी.

आपापल्या देशाच्या संरक्षणार्थ अवश्य खेरीज करून बाकी ज्यास्त लष्कर आरमार न ठेवण्याबद्दल सर्वांनीं हमी

वसाहतींबद्दलच्या हक्कांचा निवाडा मोकळ्या मनानें निष्पक्षपातानें आणि अनिर्बंध करण्यांत यावा व तो करतांना च्या म्हणण्याबरोबर आपणांस कशा प्रकारची राज्यपद्धति पाहिजे या विषयींच्या मताचा व त्यांच्या हितसंबंधाचा ही च विचार करण्यांत यावा.

रशियाचा सगळा प्रदेश खालीं करून त यावा व त्या देशाला आपली णा स्वतंत्रपणें करतां येऊन स्वतःचे धोरण ठरविण्याची संधी मिळेल अशा रीतीनें कोणता ही प्रत्यवाय आड न आणितां सर्वांनीं मोकळेपणानें त्याच्याशीं सहकारित्व ठेवावें.

७ बेल्जयम खालीं करून त्याला स्वातंत्र्य व पूर्वींची स्थिति प्राप्त करून द्यावी; त्याच्या राजसत्तेला आळा घालण्याचा प्रयत्न कोणीं करूं नये; सर्व अंतर्राष्ट्रीय नियमांचा हा पाया समजावा.

८ फ्रान्सचा जिंकलेला सगळा मुलुख सोडून द्यावा. आल्सेस—लॉरेनच्या संबंधांत आज ५० वर्षें चालत आलेला अन्याय दूर करावा.

९ इटलीच्या सरहद्दीसंबंधाचा वाद राष्ट्रीयत्वाच्या मर्यादा स्पष्टपणें ओळखता येतील अशा रीतीनें मिटवावा.

१० आस्ट्रिया—हंगेरीच्या लोकांना स्वराज्याधिकार द्यावे.

११ रूमानिया, सर्व्हिया व मांटिनीग्रो यांचा मुलुख खाली करून ज्याचा त्याला परत द्यावा. सार्व्हियाला समुद्रांत जाण्याचा मार्ग खुला करून द्यावा व बल्कन प्रकरणाचा निकाल ऐतिहासिक दृष्टीनें मित्रत्वाच्या रीतीनें व राजकीय आणि सांपात्तिक हिताच्या व स्वातंत्र्याच्या दृष्टीनें करावा.

१२ तुर्कांना त्यांची राजसत्ता कायम राहील असें आश्वासन द्यावें, पण तुर्की अंमलाखालच्या इतर जातीच्या लोकांना सुरक्षितपणा व स्वराज्याची वाढ होईल असें आश्वासन द्यावें. त्याचप्रमाणें अंतर्राष्ट्रीय हमी देऊन दार्दानेल्सची सामुद्रधुनी सर्वांना खुली करण्यांत यावी.

१३ लहान मोठ्या सर्व राष्ट्रांना आपापली सुरक्षितपणा व राजकीय स्वातंत्र्य या विषयीं खात्री पटण्यासाठीं सर्व राष्ट्रांचा संघ कांहीं विवक्षित नियमाप्रमाणें बनविण्यांत यावा.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** फार दूरवर पाऊस पडल्यासारखा हवेंत गारठा आला असून पृथ्वीचा गंध ही पाऊस सूचित करतो. प्लेग हळूं हळूं वाढत असून रोज ५।७ मृत्यु होतात.

आलिशान नामदार सर बेंजामिन रॉबर्टसन चीफ कमिशनर हे गेल्या शुक्रवारीं दिल्लीकडे रवाना झाले. आजपासून ता. २७ पर्यंत त्यांचा तेथेंच मुक्काम असून मांटेग— कमिशनमध्यें खलबत चालणार आहे.

रा० रा० सय्यद नकी-उल-हसन ए० अ० कमिशनर बुलढाणा यांस २ महिने ८ दिवसांची रजा दिली असून त्यांचे जागीं रा० रा० नीळकंठ गोविंद देशपांडे यांस आफिशिएटिंग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर बुलढाण्यास नेमलें.

रा० रा० शामराव देशपांडे सिटी इन्स्पेक्टर बुलढाणे यांची बढती डेपुटि सुपरिंटेंडेंटच्या जागीं वाशिम येथें होऊन त्यांचे जागीं रा० रा० भगवतीचरण सिटी इन्स्पेक्टर आकोला यांस बदलण्यांत आलें.

रा० रा० एफ० जे० ऊडवर्ड सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट वाशिम यांची बदली नागपुरास होऊन त्यांच्या जागीं रा० रा० वॉटरफाल असिस्टंट कमिशनर रायपूर यांस बदलण्यांत आलें.

**ग्राम पंचायत**—या कमिशनची चौकशी चालू असून येथील जिल्हा कॉंग्रेस कमिटीनें लोकजागृती करण्यासाठीं सरकारी इंग्रजी मसुद्यावरील चर्चेची तत्वें मराठींत निराळीं प्रसिद्ध केलीं आहेत त्याचें सर्वांनीं अवश्य मनन करावें.

रा. रा. ज्योतिषचंद्र मित्र सेकंड ज्युडिशिअल कमिशनर यांनीं रजा घेतल्या कारणानें त्यांच्या जागीं वकिलाच्या शाखेंतून कोणाची नेमणूक होते या विषयीं तर्क चालू आहेत.

रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी हे ज्युडिशियल कमिशनर होतील तर त्यांत लोकांची इच्छा पुरी होऊन वऱ्हाडच्या आशा थोड्या बहुत फलद्रूप होतील.

संस्कृत पाठशाळा आकोटचे अध्यापक रा. जयवंत शर्मा यांनीं संक्रातीच्या तिळगुळा निमित्त लोकमान्य टिळकांना १० सुमनांची माला अर्पण करण्यासाठीं तयार केली आहे, पण ती त्यांनीं फेब्रुवारींत समक्ष भेटीचा योग येईपर्यंत लोपामुद्रेच्या द्वारा प्रमाणें सदा सुगंधित व शोभायमान अशी आपल्या काव्यसृष्टींत जतन करून ठेवावी.

## आकोला बाजार भाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें | २७ ते २८ |
| चांदी | ११० |
| तुरी | ४ ते ५ |
| मुग | ४॥ ते ५ |
| तांदूळ | ७ ते १० |
| तेल | ७ ते ८ |
| जवारी | ८५ ते १२६ |
| गहू काठे | ७॥ ते ८ |
| गहूं खांडवा पीवडा | ८॥ ते १० |
| सरकी | ३० ते ३५ |
| कापूस | २२५ ते २३० |


## जाहिर नोटीस

त्रि. से. स. ज. साहेब आकोला यांचे कोर्टांत
कि. मु. नं. ६ सन १९१८
चौ. ता. ९।२।१८ इ.

अर्जदार

शेरुबाई जवजे मिठालाल मारवाडी रा. दापुरे ता० मुर्तिजापूर जि० आकोला.

अर्ज सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याबद्दल

सर्वत्र लोकांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, अर्जदार शेरुबाई जवजे मिठालाल इनें आमचे कोर्टांत मयत मिठालाल मुलचंद मारवाडी रा. दापुरे ता० मुर्तिजापूर याचे इस्टेटीबद्दल सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याबद्दलचा अर्ज केला आहे. तरी सदर्हू मेताचे इस्टेटीशीं ज्याचा कांहीं हक्क संबंध असेल त्यांनीं आपले कागदोपत्रीं पुराव्यानिशीं आमचे कोर्टांत ९।२।१८ रोजीं हजर रहावें. सदर्हू तारखेस कोणी हजर न राहिल्यास मागाहून तक्रार ऐकली जाणार नाहीं व वरील अर्जदार इजला सक्सेशन सर्टिफिकिट दिलें जाईल कळावे ता० १६।१।१८ इ.

V. S. Deva

ता० १६।१।१८ आकोला. } सबजज्ज साहेब नं. २ आकोला

N. N. 40

## नोटीस

वऱ्हाड म्यु. कायद्याचें कलम ६३ (३)
जनरल कमेटीचा ठराव नंबर ६ ता० ३०।५।१७

आकोलें येथील सर्वत्र रहीवाशी लोकांस या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं, ज्या इसमावर ता. ३१।३।१७ अखेर करांची मागील बाकी येणें निघत असेल ती त्यांनीं सदर्हू नोटिशीचे तारखेपासून एक महिन्याचे आंत कमेटीचे ऑफिसांत भरून चुकती करून द्यावी. तसें न केल्यास सदर्हू मागील बाकीचे रकमेवर दरसाल दर शेंकडा १२॥ टक्के व्याज आकारिलें जाऊन व्याजासह सर्व रकम वसूल केली जाईल कळावें. ता. १५-१-१८

अकोले ता० १५-१-१८ } (सही) सेक्रेटरी म्यु० कमेटी आकोला

नो०नं० ४१

## सुदर्शण

बदाम पिस्त्या सारख्या द्रव्यावर वंग प्रवाळ. मौत्तीक, कस्तुरी,; सारख्या औषधांची योजना; धातुक्षीणता; व तज्जन्य अगर कोणत्या ही अशक्ततेवर एकच दिव्य, स्वादीष्ट; उपाय. खुलासा सोबत. २० तोळ्यास १ रु. ख० शिवाय.

व्ही० आर० मुळे० नांदुरा G. I. P.

नो० नं० ४२

## जाहीरखबर

सर्वत्र लोकांस जाहिर खबर करण्यांत येते कीं खालीं सही करणार याचे मालकीचा चांदीचे तोड्याचा जोड १ एक अजमास वजन तोळे ११९ ते १२१ तारीख ८।१।१९१८ पासून गेलेला आहे. तो ज्या कोणास सापडेल अगर कोणतेही दुकानदार यांचेकडे विक्रीकरितां आल्यास अगर सोनार दुकानदार यांचेकडे मोडीस दिल्यास त्यांनीं ताबडतोब खालीं सही करणारा यांजकडेस ताबडतोब कळवावे. याजबद्दल समक्ष भेटल्यास योग्य बक्षीस देण्यांत येईल व सापडलेली वस्तु आमचे जवळ आणून दिल्यास ठिक होईल व बक्षीस दिलें जाईल ही जाहिरखबर दिली सही ता. १८-१-१८

रतनलाल मुकुंदलाल अगरवाले
रा. आकोला ठि. मोठें राममंदीर

नो. नं. ४३

## कागदी बादाम

सर्वोतम ८१० गिरी जर्दालू ८५, जर्दालु ८४ कागदी अक्रोड ८२, गरी अक्रोट ८४, अंगुरी हिंग रु. २। आणि शाहजिरें १। रत्तल, सुरेख कस्तुरी रु. ३५, सुर्मा ममीरा,२ पवित्र केशर १॥ आणि शुद्धशिलाजित ८५ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो. नं. १७


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५२] आकोला---सोमवार तारीख २८ माहे जानेवारी सन १९१८ ई० [अंक ४

सर्व औषधांचा राजा.

## अमृतबहार.

(२०० रोगांवर चालणारें एकच औषध)

सदर्हू औषध घरांत असल्यास कोणत्या ही प्रकारें इतर औषधाची जरूर पडत नाहीं. खरूज, गजकर्ण, खोकला, ताप, महामारी, प्लेग, गरमी, परमा, डोकेंदुखणें, पोटदुखणें, दाढदुखणें, दमा, थंडी, हॉंव वगैरे वर मूल्य १ बाटलीस रुपये २ अर्धाशिशी कान ठणकणें वगैरे सर्व प्रकारचे २०० रोगावर आणि रामबाण आहे. ट. ख. निराळा. जागोजागीं एजंट पाहिजेत.

पत्ता

भाई रामसिंग ॲन्ड सन्स मॅनेजर
अमृत बहार . कंपनी सुभाबाद
जिल्हा मुलतान (पंजाब)

नो. नं. २०

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कामिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वैगरे वगैरे सर्व प्रकारच माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारें सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारें सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता—ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं. २१

॥ श्री ॥

### श्री समर्थ मुद्गलेश्वर खटेश्वर महादेव संस्थान राहित साहित ता. आकोला (वऱ्हाड)

श्री संस्थान राहित येथें अनाथ लंगडे पांगळे खुळे यांचे जीवनार्थ श्री बाबांचे आशीर्वादानें एक अन्नसत्र सुरू केलें आहे. चालविणार श्री समर्थ आहेत. तरी या सत्कार्यास पुण्यपरायण धर्म बांधवांनीं हस्तें परहस्तें ईश्वर प्रीत्यर्थ अवश्य शक्त्यनुसार मदत करावी. या कार्यास राहित येथील कांहीं धर्म परायण मंडळींनीं बरीच मदत केली आहे. त्यांत विशेषतः रा. अवचितराव बापू, पांडोबा माधवराव, दौलतराव, गोपाळराव, वगैरे मंडळीची मदत ३-४ हजार रुपयापर्यंत पोचली आहे. वरील सत्कृत्यास इतरांनीं हा हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

श्रीचा नम्रदास
गणेश्वर बाबा साधु
रा. संस्थान राहित
ता. अकोला (प्रांत वऱ्हाड)

नो. नं. ११

*By Order of B. Bankey Behari Lal Sahib*
Judge small cause Court, Cownpore

SUMMONS FOR DISPOSAL OF SUIT.

(Order 5, Rles 1 anud 5.)

*IN THE COURT OF SMALL CAUSES*
AT CAWNPORE.

Suit No. 1258 of 1917

Firm Jamnadhar Potadar New Road Cownpore through Bishanlal—Plaintiff
Vensus
Firm Narsinghdass LachhmiNarain in Telbara District Akola (Berar) through Maghraj resident of Tilhara Distric Akola Difendent

To Firm Narsinghdass Lachhmi-Narain.

Dwelling at

WHERE AS Plaintiff has instituted a suit against you for Rs. 68/8/9, you are hereby summoned to appear in this Court in person or by a pleader duly instructed and able to answer all material questions relating to the suit or who shall be accompanied by some person able to answer all such questions on the 12 th Twelveth day of February 1918 at 11 o'clock in the forenoon, to answer the claim; and, as the day fixed for your appearance is appointed for the final disposal of the suit, you must be prepared to produce on that day all the witnesses upon whose evidence, and all the documents upon which, you intend to rely in support of your defence.

Take notice that, in default of your appearance on the day beforementioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the court, this 14 th day of January 1918.

*B. Bankey Behari Lal*
*Judge*

*Presiding Officer*

N. N. 44

### नोटीस

रा. रा. तोताराम एडूबा सुतार राहणार उमाळी तालुका मलकापूर

यांसः—

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं पांच वर्षें झालीं तुह्मी मला टाकून दिली आणि असे शब्द चार लोकासमक्ष बोलला कीं त्याचा अर्थ तुह्मी मला तोंडी फारकत दिल्या बद्दलचा होत आहे. पण अशा रितीनें व्यवहारांत चालत नाहीं. तुह्माला दारु गांजा वगैरेंची निशा लागत असते आणि तुह्मी इतकी मारहाण केली कीं माझा हात कायमचा दुखावला आहे; आणि या मारहाणी नंतर तुह्मी मला कायमची टाकून दिली आहे. तुह्मी लेखी फारकत न दिल्यामुळें दुसरा इसम माझ्याशी पाट लावित नाहीं; आणि त्यामुळें मला २९० रुपये कर्ज झालें आहे. ही नुकसानी तुह्मी भरून दिली पाहिजे आणि लेखी फारकत ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसाच्या आत देऊन माझा निकाल करावा. असें मुदतींत न होईल तर मी तुह्मावर कोर्टांत दावा करून योग्य दाद मिळवीन. कळावें. ता. १६ जानेवारी १९१८ इ.

सही.

पुंजी मर्द तोताराम सुतार राहणार
सुनगांव ता. जळगांव निशाणी

नो. नं. ४९ बांगडी

### जाहीर नोटीस

सर्वत्र शेट सावकार व गांवकरी लोक राहणार वाहाळे बु० ता० बाळापूर जि० अकोला

यांस

खालीं सही करणार जाहिर नोटीस देण्यांत येते कीं माझा मुलगा नामे बळीराम वा शिवराम पाटील राहणार वाहाळे हल्लीं चिचोली पो. बाळापूर हा आज सरासरी ८।९ महीने झाले आमचे घरून आपले सासुचे घरी रहात अहे व मतीभ्रष्ट हा झाला आहे तरी त्यास कोणी कर्ज किंवा कोणतेच प्रकारची देवघेव करू नये कारण तो आमचे घरी नसून कोणी कडे ही राहतो तर त्याचे कर्जाचे जबाबदार आह्मी किंवा आमची इस्टेट आमचे हयातीपावेतों जबाबदार नाहीं कळावे ता० १९।१।१८ इ.

दस्तुर गोविंराव हनवतराव देशमुख

सही

शिवराम वा पुंजाजी पाटील
रा० वाहाळा नि० आंगठा.

नो. नं. ४६

### नोटीस.

माधो वा भुता पाटील गावंडे रा० ममुराबाद ता० जळगांव जि० खानदेश

यांस

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची मोहतीराची बायको आहे. तुह्मी मला दोन वर्षे टाकून दिल्यामुळें मला माझे आईचे राहणें भाग पडलें. माझ्या वागविण्या ह्मणजे अन्नवस्त्रा बद्दल माझ्या अ लोकांचें कर्ज झालें अहे. आतां इच्छा मला वागविण्याची नाहीं. व अ ही मला नेत नाहीं. तेंव्हां तुह्मी न करितां मला तुह्मी आपले घरीं घे जावे. व माझे २ दोन वर्षाचे खावट खर्च रु. १५० पाठवून द्यावे. जर स्वतः मला घेण्याकरितां न आलांत वरील रुपये १५० व भाड्या बद्द खर्च ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत पाठवावे या प्रमाणें न केल्यास तुमचा माझ्या वरील असले नवरेपणाचा हक्क नष्ट होईल. व दुसरा नवरा करण्यास माझी मी मुखत आहे असें समजावे व मी तुह्मांस को तेंही प्रकारें जबाबदार नाहीं. हें या समजावें ही नोटीस दिली सही ता १९-१-१८ इ.

दस्तुर रामचंद्र रमाकांत इंगळे अर्जन

सही

पुती उर्फ सिती मर्द म
रा. हल्लीं माखनेर त
मलकापूर जि० बुलढ
वऱ्हाड नि० आं

नो. नं. ४७

### नोटीस

लक्ष्मण वा काशिबा व गंगाई लक्ष्मण गाढवे कुणबी राहणार मौजे दहिग ता. चिखली जि० बुलडाणा

यांजकडून:—

या नोटिशीनें सर्वत्रांस कळविण्यांत कीं, आमचा उभयतांचा अती वृद्धापका झाला असून आह्मांस मुलगा नाहीं, फ तुळसी मर्द जाणु नांवाची एक मुल असून दुसरी मुलगी रंगु मयत ति भगवान नांवाचा मुलगा आहे, व दु साधारण नातेदार आहेत. परंतु यापै किंवा दुसरे कोणी आमचेकडेस लक्ष नसून आमचे कांहीं एक संगोपन क नाहींत; त्यामुळें आमची फार फा होण्यास लागली, ह्मणून आह्मी आम साक्षांत भाचा नामें मारूती वा रा खंडाळे कुणबी राहणार दहिगांव ता. चिख यानें आमचे देहांत देह आहे तावत्कालप सर्व प्रकारें पालनपोषण करण्याचें क करून पूर्णपणें अभय दिल्या अन्वयें त्या चांगले प्रकारें सेवा चाकरी करण्या सुरवात केल्यावरून व करीत असल्यावरु त्या आमचे सदर्हू भाच्यास आमचे माल कीचा स्थावरमाल मौजे बोरगांव कांक प्र० खेर्डे ता० चिखली जि० बुलडाण

येथील शेत सर्वे नं० ३५ एकर गुंठे २९८३७ आ० रु० २८ ची सालीम जमीन झाडाझुडासह ता० ४।७।१९१७ इ० रोजीं अंमल वगैरे न करितां चांगले स्थितींत सावधपणांत असतां बक्षीस देऊन बक्षीसपत्र रजिष्टर करून दिलें आहे. व शेत ही ताब्यांत दिले अहे. त्यावर आमचा अगर दुसरे कोणाचा कांहीं एक हक्कसंबंध राहिला नाहीं. त्यानें त्या शेताचा वंशपरंपरा उपभोग घ्यावा. आह्मी मयत झाल्यावर त्याजवर कोणी खोटा हक्क दाखवून व फंद फितुर करून शेत घेण्यासंबंधानें दावा अगर दुसरी कांहीं जबरी वगैरे करतील ती गैर कायदा समजली जाऊन सर्व बातल असे हक्क तर कोणाचाच कांहीं एक नाहीं. परंतु लबाडी करून खोटेपणानें कोणी कांहीं थोतांड उत्पन्न करील, ह्मणून आह्मी हयात असतां ही जग जाहीर नोटिस दिली आहे, तर सदर्हू शेतावर कोणाचा कसा काय कोणते प्रकारें हक्क आहे त्याबद्दल त्यांनीं ही नोटिस पावल्यावर ८ दिवसाचे आंत गांवांत पंचासमोर हक्क दाखवून कोर्टांत दावा करावा आणि शाबिती करून दाखवावी. नाहीं तर पुढें कोणतेच प्रकारें कांहीं एक ऐकिलें न जातां खोटेपणानें काम चालविणेबद्दल कायद्याप्रमाणें योग्य व्यवस्था केली जाईल. यास्तव ज्यास कांहीं करणें असल्यास तें त्यानीं आमचेसमोर करावें. आह्मी मयत झाल्यावर फंद उत्पन्न केल्यास तो खोटा समजला जाईल. ते कळावें. ता० १९।१।१८

सह्या

१ लक्ष्मण वा काशिबा गाढवे कु नि० आंगठा

१ गंगाई मर्द लक्ष्मण गाढवे कु० नि० आंगठा

नो० नं० ४८

## जाहिर नोटीस

गोपाळ बापूजी भावसार राहणार चांडोळ ता० चिखली जि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार राहाणार देऊळगांवराजा ता० चिखली

इजकडूनः—

जाहीर नोटिस करण्यात येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून आपले लग्न होण्यास सुमारें ६।७ वर्षें झालीं. इतक्या अवकाशांत आपण मला पाहिल्या २-२॥ वर्षांत नेले व आणले. परंतु गेल्या ३-४ वर्षांपासून तुह्मी मला मुळींच नेले नसून [illegible]र्धी घेण्यास ही आला नाहींत व इतक्या अवकाशांत मला नेण्याविषयीं माझ्या आई-बापांनीं पुष्कळ निरोप व माझ्या हातचीं पत्रें व नोटिस ही पाठविली. परंतु कांहीं व्यवस्था झाली नाहीं. ह्मणून यामुळें मला [illegible]के दिवस आईबापाच्या आश्रयानें येथें [illegible]हून काढावे लागले. माझ्या माहेरची गरिबी असल्यामुळें त्यांना माझ्या पोषणासाठीं सावकाराचें कर्ज काढावे लागले. हल्लीं [illegible]चि वर्षें झाल्यामुळें यापुढें कोणी ही [illegible] देऊं शकत नाहीं व आईबापाकडून [illegible]ण ही करवत नाहीं. अशा स्थितींत [illegible] राहणें दुरापास्त झाल्यामुळें आपणास या नोटिशीनें कळवितें कीं, नोटिस पावल्यापासून दहा दिवसाचे आंत आपण मजला घेऊन जावे. व मजला येथें झालेले कर्ज २२५ रुपये देऊन जावे. येथील सर्व झिगाडा साफ झाल्यास मी आपणाबरोबर येण्यास तयार आहे. परंतु वरील मुदतींत कांहींच व्यवस्था न झाल्यास तुह्मास माझी गरज राहिली नाहीं असें समजून हीच फारकती (सोडचिठ्ठी) जाणून वर दर्शविलेले कर्ज फेडून टाकणाऱ्या गृहस्थाबरोबर मजला घरठाव करणें भाग पडेल. यासाठीं या नोटिशीनें तुह्मास आगाऊ कळविले आहे. मी घरठाव केल्यावर मग माझेवर तुमचा नवरेपणाचा हक्क कोणते ही प्रकारें चालणार नहीं. कळावें दस्तुर सां। केशव जोशी देऊळगावराजा

सही

हिराई मर्द गोपाळ भावसार रा० देउळगांवराजा नि० आंगठा

नो० नं० ४९

---

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दि. मुकद्दमा नंबर १ सन १९१८ इ. विद्यमान डिस्ट्रिक्ट जज साहेब यांचे कोर्ट

मुक्काम आकोला पश्चिम वऱ्हाड

नांव नथु

बापाचें नांव गणपती

जात रजपूत राहणार डोलखेड

तहसील मलकापूर जिल्हा बुलढाणा

ज्या अल्पवयी देवराव रामकृष्ण

उमर वर्ष ८ अदाजें

राहणार डोलखेड ता. मलकापूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षण करण्यासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २३ माहे २ सन १९१८ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २१ माहे १ सन १९१ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज

पश्चिम वऱ्हाड

नो. नं. ५० आकोला

---

## वऱ्हाडसमाचार

पौष वद्य १ पिंगल संवत्सर १८३९

## हिंदुस्थानांतलें नवें मन्वंतर.

हिंदुस्थानांत नवें मन्वंतर लवकरच सुरू होणार याविषयींचीं चिन्हें इतकीं स्पष्ट आहेत कीं तीं आंधळ्याला सुद्धां दिसतील. हिंदुस्थानाविषयीं विलायतच्या लोकांचा दृष्टिकोण बदलत आहे. तेथील मजूरपक्षानें हिंदुस्थानाविषयीं पूर्ण सहानुभूति दाखवून त्याला स्वराज्य मिळवून देण्याचे कामीं साह्य करण्याचें कबूल केलें आहे. आयरिश लोक स्वतःच स्वराज्याच्या अभावीं भोगावीं लागणारीं दुःखें अनुभवीत असल्यामुळें हिंदुस्थानाशीं त्यांचें नातें समदुःखी माणसाचें असल्यामुळें त्यांची सहानुभूति आहे याविषयीं शंका नाहीं. विलायतेंत आमच्या विरुद्धपक्षांत लॉर्ड सिडनह्याम सारखे खालुच्यावरचे वासे मोजणारे थोडेसे हिंदुस्थानांतून पेनशन घेऊन गेलेले आंग्लो—इंडियन अधिकारी मात्र आहेत. परंतु या अधिकारीवर्गांत ही लॉर्ड कारमायकेल सारखे कांहीं उदार, सरळ मनाचे व निष्कपट वृत्तीचे पेनशनर अधिकारी आहेत. जे आपणाकडून हिंदुस्थानाविषयींचे लोकांचें गैरसमज दूर करण्याविषयींचे प्रयत्न करीत आहेत. परवा लॉर्ड कारमायकेल यांनीं लंडन येथें रॉयल कलोनियल इन्स्टिट्युटपुढें एक भाषण केलें. त्यांत त्यांनीं सांगितलें—' आपणास आवडो अगर न आवडो, हिंदुस्थानांत असंतोषवृत्ति वाढत आहे, आणि हा सर्व वर्गांत रोज वाढत चालली आहे. माझ्या दृष्टीनें आतां या वृत्तीला शहाणपणाच्या मार्गदर्शित्वाची फार जरूरी आहे. आपण ब्रिटिश लोकांनीं ही वृत्ति वाढूं देण्याची प्रत्येक संधी हिंदुस्थानाला दिली, आणि मला वाटतें कीं तिला आतां योग्य मार्ग दाखविण्याचें काम ही आपणांस करतां येईल. या असंतोषानें हिंदी लोकांचीं मनें बिथरल्यास फार अनर्थ होईल. पण त्या वृत्तीला योग्य दिशा मिळाली, तर नुसत्या ब्रिटनशींच नव्हे तर एकंदर ब्रिटिश साम्राज्याशीं भागीदाराच्या नात्यानें राहून प्रत्येक कामांत मदत करण्यास हिंदुस्थान शिकेल व तो ब्रिटिश मुत्सद्दीगिरीचा मोठाच विजय ह्मणतां येईल.' लॉर्ड कारमायकेल यांनीं हिंदुस्थानच्या असंतोषाचें खरें खरें मर्म ओळखून त्यावर रामबाण उपाय ही यांत सुचविला आहे असें कोण ह्मणणार नाहीं? ब्रिटिश साम्राज्याचे मुख्य प्रधान मि. लॉईड जॉर्ज, माजी प्रधान मि. ॲस्क्विथ प्रभृति मुत्सद्यांनीं प्रस्तुत युद्धाच्या फलश्रुतीसंबंधानें वेळोवेळीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून लॉर्ड कारमायकेल यांनीं ब्रिटिश मुत्सद्दीगिरीचा जो मोठा विजय ह्मणून दाखविला आहे तो संपादण्याचा या मुत्सद्दीमंडळीचा तूर्त तरी विचार दिसतो पण या विचाराला दृढता आणण्याला हिंदुस्थाननें एक कार्य करणें अत्यंत अवश्य आहे. आणि तें हें कीं हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश जनतेपुढें मांडण्यासाठीं इकडून डेप्युटेशन पाठविणें. एक मि० बापटिस्टा गेले तर त्यांनीं केवढें कार्य केलें! मजूरपक्षाची सहानुभूति मिळविण्यांत त्यांचें फार मोठें साह्य झालें आहे. असें डेप्युटेशन लवकर जाईल अशी उमेद आहे. हिंदुस्थानांतली अशांतता दूर करण्यासाठीं लॉर्ड कारमायकेल हे आपल्या देशबांधवांना निराळा उपाय सुचवितात. ते ह्मणतात कीं हिंदुस्थानच्या लोकांची समजूत घालण्यासाठीं विलायतेहून कांहीं चांगलीं माणसें पाठविल्यास हिंदुस्थानचे लोक त्यांचें ह्मणणें शांतपणें ऐकून घेण्याइतके मनाचे उदार आहेत. होय. आह्मी लोक मनाचे उदार आहों कीं नाहीं हें मि० ह्यूम, ब्राडलॉ, सरविल्यम वेडरबर्न व मिसेस बिझांट प्रभृति ब्रिटिश व्यक्तीविषयीं आमच्या लोकांचे ठायीं वागत असलेली पूज्यबुद्धि व कृतज्ञताच सांगेल. पण हे विलायतचे लोक इकडे येऊन आह्मांला काय सांगणार? आमची तुह्मांला पूर्ण सहानुभूति आहे असल्या शुष्क शब्दांनींच आमची बोळवण करणार असले तर त्यासाठीं इकडे येण्याची यातायात कशाला हवी? आह्मी त्यांना असें सांगतों कीं तुमच्या सहानुभूतीबद्दल हिंदुस्थान अत्यंत आभारी आहे. पण तुमची सहानुभूति कृतीच्या रूपानें दिल्याशिवाय हिंदुस्थानचें समाधान व्हावयाचें नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांना उपदेश करण्याऐवजीं तुमचेच देशबंधु जे इकडे अधिकारावर असल्यामुळें गर्वानें ताठून जाऊन हिंदुस्थानच्या लोकांना तुच्छपणानें वागवितात, त्यांना समजुतीच्या चार गोष्टी सांगा; त्यांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घाला; त्यांचा विवेक निद्रित आहे तो जागृत करा; त्यांच्या कृतीनें ब्रिटिश न्यायबुद्धीला कलंक लागत आहे तो पुसून काढण्यास त्यांना लावा; हिंदुस्थानांतल्या लोकांशीं योग्य मर्यादेनें वागण्यास त्यांना शिकवा. हिंदुस्थानाला स्वराज्य देणें हें ब्रिटिश सरकारचें ध्येय आहे ही गोष्ट मि. मांटेग्यु यांनीं ता० २० आगष्ट १९१७ रोजीं पार्लमेंटमध्यें जाहिर केली आहे ते ध्येय साधण्याची खटपट तनमनधनें करून करण्याविषयीं एकदम प्रयत्नास लागून कलकत्याच्या कांग्रेसनें मागितल्याप्रमाणें स्वराज्य दानाचा पहिला मोठा हप्ता एकदम देऊन टाका, ह्मणजे तुमच्या सदिच्छेविषयीं लोकांना विश्वास पटेल व बरीचशी अशांतता एकदम नाहींशी होईल. इंग्लंडहून या कार्यासाठीं जे कोणी येतील त्यांना हिंदुस्थानचे लोक योग्य आदरपूर्वक सन्मानानें वागवितील या विषयीं लॉर्ड कारमायकेल यांस पूर्ण खात्री आहेच. पण अशा लोकाना येथील अधिकारीवर्ग कशा रीतीनें वागवील या विषयीं त्यांना खात्री आहे काय? मिसेस बिझांट बाईना त्यांच्या इकडील देशबांधवाकडून कसें वागविण्यांत आलें व येत आहे तें नीट ध्यानांत ठेवा ह्मणजे उपदेशाची व समजुतीच्या चार गोष्टीची अधिक जरूरी कोणाला आहे तें लॉर्ड कारमायकेल यांच्या चांगलें लक्षांत येईल. इकडील अधिकारीवर्ग वरून चांगले

जोराचें दडपण असल्याशिवाय दडपला जाणारा नाहीं. त्यांचा मगरूरपणा सुप्रसिद्ध आहे व तो वाढविण्यास आणि सरकार व प्रजा यांच्यांतली फूट वाढविण्यास मद्रास मेल सारखीं पत्रें अहोरात्र झटत आहेत. त्यांचा बंदोबस्त अगोदर केला पाहिजे. हिंदुस्थानच्या लोकांचे उत्साहास सध्या मोठा पूर आला आहे; तथापि त्यांच्या हातून मर्यादेचें उल्लंघन घडल्याचें एकही उदाहरण अद्याप घडलेलें नाहीं. या वरून आमचे लोक न्याय, नीति व सदाचार यांची मर्यादा उल्लंघण्याचे कामीं किती पापभीरू आहेत तें दिसून येईल. अशा लोकांना त्यांच्या वाजवी मागण्या देऊन संतुष्ट ठेवल्यास व हिंदुस्थानांत नवें मन्वंतर लवकर घडवून आणिल्यास त्या पासून ब्रिटिश सिंहासनाला केवढी मजबुती येईल तें सांगावयास नकोच. पण हें घडून येण्यास लॉर्ड कारमायकेल यांच्या सारख्या उदार अंतःकरणाचे व प्रवृत्तीचे ब्रिटिश लोक पुढें येऊन त्यांनीं इकडील अधिकाऱ्यांचे पक्ष तोडले पाहिजेत व स्पष्टपणें कान उघाडणी करून त्यांना आपलें योग्य कर्तव्य करण्यास लाविलें पाहिजे.

---

## कापड आणि मीठ यांची महर्घता.

पायोनियर सारख्या पत्रांतल्या विचारांशीं आमचें एकमत होणें हा कपिलाषष्ठीचाच योग ह्मणावयाचा! पण कापड व मीठ यांच्या हल्लींच्या महागाईसंबंधांत तो योग घडून आला आहे. या दोन जिनसांचे संबंधांत जी विलक्षण महागाई हल्लीं झालेली आहे ती मुख्यतः व्यापारी लोकांच्या धनलोभामुळें झालेली आहे. व्यापारी लोक या दोन जिनसांनीं स्वतःचें कोठार भरून ठेवून या जिनसांच्या किंमती मन मानेल तशा चढविल्या आहेत. वस्तुतः ही गोष्ट या पूर्वींच सरकारचे लक्षांत यावयास पाहिजे होती. पण सरकारी अधिकाऱ्यांनीं वेळींच जी दक्षता ठेवावयास पाहिजे होती ती न ठेविल्यामुळें ही आपत्ति प्राप्त झाली आहे. सरकारनें या व्यापाऱ्यांच्या मतलबी आणि समाजास अत्यंत कष्टकारक अशा कृत्याचा बंदोबस्त करण्यांत दिनावधि लावूं नये अशी ओरड सर्व वर्गाकडून झाली तेव्हां हिंदुस्थान सरकारनें जागे होऊन डिफेन्स ऑफ इंडिया आक्टाच्या नियमांत सुधारणा केली आहे व बाजारचे भाव योग्य मर्यादेंत ठेवण्यास लागणारे पूर्ण अधिकार स्थानिक अधिकाऱ्यांना दिल्याचें जाहिर केलें आहे. त्यामुळें आतां जिनसाचे भाव थोडे तरी सैल होतील अशी उमेद लोकांना वाटत आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा धाक येवढेंच एक शस्त्र या व्यापारी लोकांचें डोकें ताळ्यावर आणण्यास असावें व ज्या समाजांत हे स्वार्थांध व्यापारी वावरतात तो समाज स्वतः त्यांना शासन करण्यास असमर्थ असावा ही स्थिति कोणी ही स्पृहणीय समजणार नाहीं. पूर्वींच्याकाळीं समाजाचा धाकच अशा गोष्टींचा बंदोबस्त करण्यास पूर्णपणें समर्थ होता. सरकारच्या साह्याची त्याला विशेषशी गरजच लागत नसे. पण आतां तें पारडें फिरलें आहे. अशा व्यापाऱ्यांना बहिष्कार घालून त्यांचे डोळे उघडण्याचें समाजाच्या मनांतच येत नाहीं. समाजाचा हा विस्कळितपणा अत्यंत शोचनीय ह्मटला पाहिजे. समाजानें आपापल्या जातीच्या सभा भरवून अशा समाजशत्रूंवर बहिष्काराच्या अस्त्राचा प्रयोग करावयास हवा होता. पण तें जोंपर्यंत होत नाहीं व समाज निर्वीय स्थितींतच राहील तोंपर्यंत त्याला आपल्या संरक्षणार्थ दुसऱ्याच्याच तोंडाकडे पहावें लागेल. पण अशी परावलंबी स्थिति इष्ट आहे काय आणि नसल्यास समाजबळ वृद्धिंगत करण्यास काय केलें पाहिजे याचा विचार समाजाच्या पुढाऱ्यांनीं अवश्य केला पाहिजे.

---

## नियोग पद्धतीचें पुनरुज्जीवन.

समाजाच्या अवश्यकतेप्रमाणें धर्मशास्त्राच्या आज्ञा बदलणें हें समाजाच्या वाढीचें व दृढतेचें लक्षण आहे. कारण, धर्मशास्त्र समाजाकरितां आहे, समाज धर्मशास्त्रासाठीं नाहीं. यामुळें भरतवर्षाच्या प्राथमिक समाज स्थितींत—महाभारतकाळीं—पुत्रोत्पत्ति करण्यास असमर्थ असलेल्या पुरुषांच्या स्त्रियांना इतरांकडून ती करवून घेण्याची मोकळीक धर्मशास्त्रानें आपद्धर्म ह्मणून दिल्याचीं उदाहरणें महाभारतसारख्या ग्रंथांत आहेत. येवढीच एक गोष्ट घेऊन कांहीं ख्रिस्ती मिशनरींनीं हिंदुधर्माला अनीतिमूलक धर्म ह्मणून त्याची निंदा चालविली होती. पण आतां तीच आपत्ति प्रस्तुच्या युद्धामुळें जर्मनी सारख्या पाश्चात्य देशावर आल्याबरोबर तेथें हीयाच उपायानें लोकसंख्येची वृद्धि करण्याचा उपाय तेथील पंडित गंभीरपणानें सुचवूं लागले आहेत! प्रो. कार्ल हरमान नांवाच्या प्रोफेसरानें याविषयावर लिहिलेल्या एका चोपड्यावर लंडन टाइम्स पत्रांत एक लेख आला आहे. त्यांत या पंडिताच्या सूचनेची सविस्तर माहिती दिली आहे थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे प्रोफेसरांचें ह्मणणें असें आहे कीं जर्मनीचे लोक या युद्धांत इतके मारले गेले आहेत कीं जर्मनीचें मनुष्यबळ अतिशय क्षीण झालें आहे व ती क्षीणता दूर करून लोकसंख्येची वृद्धि करण्यास नियोगशिवाय दुसरा उपाय नाहीं. हा उपाय प्रथम दर्शनीं अनीतीचा वाटतो खरा; पण नीतिमत्तेची कल्पना समाज स्थितीशीं सापेक्ष असते. समाजाच्या स्थैर्याला अवश्य लागणारी गोष्ट अनीति होऊच शकत नाहीं. आज जी गोष्ट अनीतीची वाटते तिच्यावर समाजानें नीतिमत्तेचा छाप मारला ह्मणजे तीच नीति ह्मणून पुढें मानिली जाईल. हा उपाय चैनी करितां करावयाचा नाहीं. ह्मणून त्याला योग्य निर्बंध घालणें अवश्य आहे. पहिला निर्बंध हा आहे कीं ज्या स्त्रीला नियोग करण्याची इच्छा नसेल तिच्यावर जबरदस्ती नसावी; दुसरा निर्बंध ह्मणजे जरूरी पुरताच या गोष्टीचा उपयोग करावा. हे निर्बंध पाळून समाजानें ही सुधारणा सुरू केल्यास २० वर्षांत जर्मनीचें मनुष्यबळ पूर्वीच्या इतकें होईल. प्रोफेसर साहेबांची ही सूचना तूर्त इंग्लंड सारख्या देशांतल्या पत्रकर्त्यांना उपहासाचा विषय होऊन बसली आहे. पण खुद्द इंग्लंडांतही नितिमत्तेविषयींचे लोकांचे विचार युद्धामुळें बदलत चालले आहेत व एकपत्नीव्रताची धर्माज्ञा शिथिल करून बहुपत्नीकत्वाची चाल सुरू करावी अशा सूचना होत आहेत हें कशाचें चिन्ह आहे! जर्मनीची नियोगाची कल्पना बहुपत्नीकत्वाइतकीच ख्रिस्ती दृष्टीला प्रथम अनीतीची वाटेल; पण हें युद्ध आणखी कांहीं वर्षें असेंच चालल्यास खुद्द इंग्लंडलाही त्या गोष्टीला मान्यता द्यावी लागणार नाहीं कशावरून? कोणत्याही देशाच्या नीतिमत्तेविषयींची परीक्षा तेथील समाजाच्या तत्कालीन स्थितीवरून व गरजांवरूनच करणें योग्य आहे. पण महाभारतकालीन नियोगपद्धतीविषयीं लिहितांना ख्रिस्ती मिशनरी हे तत्त्व विसरतात, आणि उपहास करतात हें अत्यंत गर्ह्य आहे.

---

## वैयक्तिक कर्तव्य.

### ( राष्ट्रकार्याची वाटणी )

आजकाल जिकडें पहावें तिकडें राष्ट्रीय कल्पनांची लाट उसळलेली दिसते. सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर या लाटेच्या बुडाशीं दहा पांच नेणती कर्तृत्ववान् व राष्ट्रहित तत्पर माणसें आहेत, असें दिसून येईल. टिळक, बेझांटबाई, गांधी, वगैरे सारख्यांनीं जेव्हां प्रेरणा करावी तेव्हां कुठे सुशिक्षित लोकांमध्यें सुद्धां कर्तव्य जागृति व्हावयाची अशी स्थिती आहे. आपल्या समाजांतील राष्ट्रहितेच्छु सुशिक्षितांपैकीं शेंकडा ९९ लोक असे आहेत कीं, त्याचे स्वतःचे राष्ट्रीय कर्तव्याचे बाबतींत ध्येय अथवा कार्य दिशा मुळींच ठरलेली नसते विशेष दगदग न करतां राष्ट्रकार्यास हातभार लाविल्यासारखे दिसावे अशी आह्मापैकीं निदान शेंकडा ७९ सुशिक्षित लोकांची इच्छा असते. त्यांचा आपला एक ठोकळ मार्ग असतो. आज बेझांटबाई अथवा महमदअल्ली यांच्या अटकेच्या निषेधार्थ सभा आहे चला अर्धा घंटा बसून येऊं, टिळक आले चला त्यांच्या स्वागतार्थ जाऊं, त्यांचें व्याख्यान ऐकूं, व त्यांच्या स्वागतार्थ जमलेल्या फंडास बेताबातानें वर्गणी देऊं. सुशिक्षितपैकीं शेंकडा ३० लोक तात्विक दृष्ट्या विचार करणारे असतात. काम करण्याला त्यांची इच्छा अथवा पात्रता नसते असें नाहीं. परंतु मतस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य हें त्यांना प्राणापेक्षांही प्यार असते. त्यांच्या स्वातंत्र्याचा अर्थ इतकाच कीं कोणी कांहीं करो अथवा बोलो तें यांच्या मताला व विचाराला रुचणारे नसतें. ह्यावरून कोणी असें समजेल कीं अशा लोकांचें ध्येय व कर्तव्य दिशा ठरलेली असली पाहिजे, व त्याप्रमाणें ते वागण्यास तयार असले पाहिजेत. परंतु अशी स्थिती मुळींच नसते यांच्या कर्तव्याचें व मत स्वातंत्र्याचें क्षेत्र वर्तुळ टीके पलीकडे नसतें. आपल्याला राष्ट्रिय हित कोणतें साधावयाचें आहे व तें कशा तऱ्हेनें साधावयाचें आहे, ह्या विचाराची दगदग त्यांच्या स्वातंत्र्य प्रियतेला असह्य होते. गोखल्यांनीं वेल्बी कमिशनपुढें व प्रेसॲक्टच्या बाबतींत वाण केली ह्मणून गोखले टाकाऊ. बेझांटबाईचें कृष्णमूर्तीच्या खटल्यांत खूपच बिंग बाहेर आलें, व त्यामुळें आतां राजकीय कारस्थानें करून पुन्हा आपली छाप लोकांवर बसविण्याची युक्ति अशा लोकांनी ताडली असल्यामुळें त्या टाकाऊ. टिळक आतां बहल मवाळाच्या व हिंदु मुसलमानांच्या तडजोडीच प्रयत्नांत मुसलमान व मवाळ यांजक वहावत चालले आहेत ह्मणून अप्रिय. सारांश आमचे कोणाशीं पटत नाहीं व आमच्या हातून कांहीं घडत नाहीं अशी लोकांची स्थिती असते. राहिल्यापैकीं शेंकडा ९ लोक कळकळीनें, नेटानें, कैक प्रसंगी स्वार्थत्याग करून सुद्धां, राष्ट्रहितासाठीं विवक्षित ध्येय पुढें ठेवून आखलेल्या मार्गा कार्यतत्पर असतात.

आतां ही स्थिती चांगली नाहीं हें प्रत्येक समंजस व आस्थेवाईक माणसाला कबूल करावें लागेल. आपली स्थिती सर्वस्वी परावलंबी आहे. ती सुधारण्याचा प्रयत्न न केल्यास दिवसेंदिवस अधीकच खालावत जाईल. किंबहुना थोडक्याच दिवसां आपण राष्ट्र या दृष्टीनें नामशेष होऊं ह्या गोष्टी वर वर्णन केलेल्या सर्व सुशिक्षित लोकांना कळून चुकल्या आहेत त्यांना हें ही समजतें कीं आपणच ज कांहीं हातपाय हालविले नाहींत तर चालू असलेलें काम ही थंडावेल. कारण हिंदु जनतेपैकीं सुशिक्षित बाह्य लोकांत शेंकडा पांच तरी असे लोक सांपडतील कीं नाहीं—कीं ज्यांना आपल्या राजकीय परिस्थितीची जाणीव आहे— याची वानवा आहे. अशा स्थितींत प्रत्येक कर्त्या जाणत्या सुशिक्षिताचे हें आद्य कर्तव्य आहे कीं त्यानें स्वतःच्या परिस्थितींत आपल्याला राष्ट्राच्या कार्याला कोणत्या तऱ्हेनें हातभार लावणें शक्य आहे हें पहावें, आपलें वैक्तिक ध्येय ठरवून ते यथाशक्ति साधण्याचा मार्ग आखावा. —असा मार्ग आंखून ठेविल्या नंतर त्या मार्गानें जाण्याचा नेटानें प्रयत्न चालवावा. अशा मार्गानें जात असतां पुष्कळशा स्वार्थाच्या दृष्टीनें झीज सोसावी लागेल. परंतु अशी झीज सोसणें अशक्य झाल्या शिवाय मार्ग पराङ्मुख न होण्याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. सर्वांनाच महात्मा गांधी होणें शक्य नसतें. परंतु त्यांना कांहीं अंशीं तरी स्वाभिमानी, कार्यतत्पर व राष्ट्रहितेच्छु होणें शक्य असते. "मुकी बिचारीं कुणि ही हका अशीं मेंढरें बनूं नका" हेंच तात्पर्य. निर्गुण निराकार ध्येय व निष्क्रीय आचरण हीं सद्यःस्थितींत राष्ट्रहिताच्या दृष्टीनें निरूपयोगी आहेत एवढेंच नव्हेतर बाधक आहेत. सामाजिक, नैतिक, औद्योगिक व इतर तऱ्हेनें लोकांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे सुद्धां राष्ट्रीय कार्याला हातभार लावण्यासारखें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा तऱ्हेनें राष्ट्रीय कार्याचें क्षेत्र किती विस्तृत आहे हें अवलोकन केलें ह्मणजे प्रत्येकाला अशा कार्याला सदोदित शक्त्यनुसार मदत करणें किती सोपें आहे हें लगेच कळून येईल

---

## हें सर्टिफिकेट पहा!

मद्रास ख्रिश्चन कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल रे. डा. मिलर यांची उत्तम शिक्षकांत गणना असून त्यांच्या विषयीं युरोपियन समाजांत व देशी तरुणांत अत्यंत आदर व पूज्यभाव वसत आहे. मद्रास इलाख्यांतले सध्याचे अनेक सन्मान्य देशी अधिकारी व लोकमान्य पुढारी हे त्यांचे

शिष्य आहेत. हे पेनशन घेऊन विलायतेंस गेल्यापासून दरसाल आपल्या विद्यार्थ्यांना 'संदेश' पाठवीत असतात. यंदाच्या संदेशांत ते लिहितात—'हिंदुस्थानाला स्वराज्य चालविण्याचे कामीं लागणारी पात्रता आणून देण्याचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले नाहींत ही गोष्ट अगदीं खरी आहे. अशी खटपट त्यांनीं केली नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलट लोकांनीं ती केली असतां तिला विरोध केला. तुह्माआह्मासारख्यांना जी प्रगति हवीशी वाटते ती ज्यांना अनवश्यक किंबहुना अपायकारक वाटते अशी कांहीं मंडळी आहे. ज्यांना आपल्याच हातीं सदोदित अधिकार ठेवण्याची चटक लागलेली आहे, आणि त्या अधिकाराचा उपयोग एकंदर देशाच्या खऱ्या कल्याणाकडे आपण केला आहे असें ज्यांना वाटतें ते त्या अधिकाराला पोटाशीं घट्ट धरून बसतात यांत आश्चर्य नाहीं. डा० मिलर सारखे ऋषितुल्य पूज्य अनुभवी धर्मशिक्षक ही जेव्हां हिंदुस्थानांतल्या अधिकारी वर्गासंबंधानें असें सर्टिफिकेंट देतात आणि लोकांनीं केलेल्या प्रगतीच्या यत्नाला अडथळे आणून निष्कारण त्रास दिल्याबद्दलचीं स्वतःच्या अनुभवांतली उदाहरणें सांगतात, तेव्हां त्यांच्या विधानाच्या सत्यतेबद्दल कोणाची खात्री पटणार नाहीं ?

## प्रागतिक विचारांची लाट.

सध्या प्रागतिक विचारांची जी लाट हिंदुस्थानांत उठलेली दिसते तिनें सामाजिक जीवनाची प्रत्येक शाखा व्यापलेली दिसते. धर्माचा तट अभेद्य असतो, पण त्यावर सुद्धां या लाटेचे जोराचे प्रहार सुरू आहेत, आणि लवकरच तो किल्ला सर होणार अशीं चिन्हें दिसत आहेत. करवीर मठाचे श्रीशंकराचार्य यांच्या आश्रयाखालीं चाललेल्या 'फिलॉसफी आणि रिलिजन' नांवाच्या इंग्रजी वृत्तपत्राच्या एका ताज्या अंकांत अस्पृश्य वर्गासंबंधानें लिहितांना ह्मटलें आहे कीं 'अस्पृश्य' हा शद्ब कोशांतून काढून टाकावयास पाहिजे. अस्पृश्यांचा विटाळ ही कल्पनाच सुशिक्षितांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न करणारी आहे' शंकराचार्यासारख्या धर्मगुरूच्या पीठावर विद्वान्, सुशिक्षित, व उदार आणि व्यापक दृष्टीच्या पुरुषाची स्थापना झाल्यापासून धर्मविचारांना कसें चालन मिळतें त्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. करवीर पीठाप्रमाणेंच इतर पीठावर ही असेच प्रागतिक विचारांचे पुरुष अधिष्ठित होतील तर हिंदुस्थानच्या प्रगतीचा गाडा किती तरी अधिक वेगानें चालूं लागेल. जुन्या विचारांचे कीर्तनकार संमेलन भरवूं लागले, काशी विश्वेश्वराचे पंडे ही प्रागतिक विचाराच्या प्रवाहाला मदत करूं लागले आणि श्री शंकराचार्यासारखे धर्मगुरु अस्पृश्य वर्गाचा विटाळाच्या कल्पनेचा ही तिरस्कार करूं लागले हें पाहून प्रागतिक विचाराच्या लाटेचा जोर सध्या किती आहे याची कल्पना कोणाला ही करतां येईल. ही लाट मागें परतणें आतां शक्य दिसत नाहीं.

## थिआसफी आणि शिक्षणप्रसार.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या धर्मविषयक किंवा अध्यात्मिक मतामध्यें इतर धर्मीयांशीं न जुळण्यासारखें असें कांहीं नाहीं. सार्वत्रिक हिताला साधक अशींच तत्वें सदर सोसायटीनें ठरविलीं आहेत. तथापि त्यासंबंधानें कोणाचा कसा ही मतभेद असला तरी हिंदुस्थानचें शिक्षणविषयक हित ही सोसायटी अतिशय कळकळीनें व स्वार्थत्यागपूर्वक करीत आहे याविषयीं तिळमात्र मतभेद असण्याचें कारण नाहीं ही गोष्ट १९१७ सालाबद्दलचा थिऑसॉफिकल एज्युकेशन ट्रस्टचा रिपोर्ट पाहिला असतां कोणाला ही दिसून येईल. या ट्रस्टची स्थापना होऊन ४ वर्षं झालीं. पण या अल्पकाळांत ट्रस्टच्या व्यवस्थेखालच्या शिक्षणसंस्थांची संख्या ३९ झाली आहे. गतवर्षीं पेक्षां ही ११ नें वाढली आहे. शिक्षणसंस्थांची वृद्धि ही गोष्ट महत्त्वाची आहेच; पण या पेक्षां ही या संस्थांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची नवी पद्धति व तिचें उदार व व्यापक स्वरूप (निराळ्या शद्बांत ह्मणावयाचें ह्मणजे राष्ट्रीय स्वरूप) हीं ज्यास्त महत्त्वाचीं आहेत. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढण्याचे प्रयत्न यापूर्वीं कांहीं प्रांतांतून झाले, पण त्या प्रयत्नांच्या मागें जोरदार पाठिंबा नसल्यानें ते सिद्धीला गेले नाहींत. थि० ए० ट्रस्टनें ही उणीव भरून काढली आहे इतकेंच नाहीं तर राष्ट्रीय युनिव्हर्सिटी काढण्याची कल्पना शक्य कोटींतली आहे हें सिद्ध करून दाखविलें ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी त्यानें केली आहे. गेल्या वर्षांच्या कमाच्या या रिपोर्टांत आणखी कित्येक गोष्टी नमूद केल्या आहेत त्याही शिक्षणाची प्रगति दर्शविणाऱ्या आहेत. मदनपल्ली येथें राष्ट्रीय स्वरूपाचे प्रिपरेटरी वर्ग उघडणें व सिंध प्रांतांत राष्ट्रीय कॉलेज काढणें या गोष्टी एका दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या आहेत. हे प्रिपरेटरी वर्ग कॉलेजशिक्षणाचे असून त्यांचा अभ्यासक्रम चार वर्षांचा आहे. पैकीं पहिल्या वर्षीं सर्व सामान्य शिक्षण देण्यांत येते व दुसऱ्या तीन वर्षांत राष्ट्रीय युनिव्हर्सिटीची पदवी मिळविण्याची पात्रता विद्यार्थ्यांस यावी अशी योजना केली आहे. पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमांत जरूरीच्या विषयांत धर्म, शारीरिक शिक्षण, मातृभाषेचें शिक्षण, इंग्रजी भाषा, संपत्ति शास्त्राचीं सामान्य तत्वें व हिंदुस्थानचे नागरिकत्व इतके विषय आहेत इतर कॉलेजांतल्या अभ्यासक्रमाशीं हा क्रम ताडून पाहण्यासारखा आहे. सिंध नॅशनल कॉलेज गेल्या आक्टोबरांत स्थापन झालें, आणि इतक्या अल्प अवधींत त्याचा द्रव्यनिधी ९०००० रुपये झाला आहे. स्वतःच्या शिक्षण संस्थांना शिक्षण विषयक प्रश्नाच्या विचारांत सल्ला देण्याचें व मार्गदर्शकत्वाचें काम ट्रस्टनें केलें आहे. इतकी शिक्षणविषयक चळवळ इतक्या अल्प अवधींत करून दाखविणाऱ्या संस्था आपले देशांत फारच थोड्या आहेत ही गोष्ट लक्षांत घेतली ह्मणजे पवित्र देशकार्यास स्वतःस वाहून घेणाऱ्या या संस्थेच्या चालकांचें जेवढें अभिनंदन व कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटतें. पण अशा संस्था शुष्क अभिनंदनपर शद्बांच्या उत्तेजनानें चालत नसतात. त्यांना द्रव्यबळ व त्यापेक्षां ही कळकळीनें काम करणारांचें मनुष्यबळ लागतें. कृतज्ञ हिंदुस्थान या दोन्हींची वाण या संस्थांना पडूं देणार नाहीं अशी आह्मी उमेद बाळगतों.

## लॉर्ड मोर्ले साहेबांच्या आठवणी.

कांग्रेस संबंधानें हिंदुस्थानांतले कित्येक अधिकारी अद्याप ही तुच्छता प्रदर्शक उद्गार काढीत असतात; पण बारावर्षांपूर्वींच या सभेचें महत्व व योग्यता यांची जाणीव त्या काळचे युवराज व हल्लींचे सम्राट पंचम जॉर्ज यांना पूर्णपणें झाली होती असें लॉर्ड मोर्ले साहेबांनीं आपल्या आठवणीच्या पुस्तकांत दिलेल्या एका खाजगी पत्रावरून दिसतें. हें पत्र स्वतः मॉर्ले साहेबांनीं हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लॉर्ड मिंटो यांस लिहिलेलें आहे. त्यांत ते ह्मणतात— 'कांग्रेस ही एक जोरदार संस्था झपाट्यानें होऊं पाहत आहे. पुष्कळ वर्षांपूर्वीं या संस्थेसंबंधानें माझा स्वतःचा जो ग्रह झाला व आतां मी इंडिया आफिसचीं सूत्रें हातीं घेतल्यापासून तो दृढ झाला, तो असा आहे कीं कांग्रेस ही संस्था उपायकारक किंवा अपायकारक करणें हें सर्वस्वी आपले हातीं आहे. आपणाला ती संस्था आवडो किंवा न आवडो, ती राहणारच. तिच्यांत शंकास्पद वर्तनाचे कांहीं लोक कदाचित् असतील. अशा मोठ्या सगळ्याच संस्थांत असे लोक थोडे फार असतात; आणि ह्मणून तिच्या विषयीं कठोरपणाचें, ताठ्याचें किंवा तसेंच एखाद्या प्रकारचें वर्तन न ठेवण्याविषयीं आपण अधिकच जपलें पाहिजे.' लॉर्ड मॉर्ले यांचा हा प्रांजळ मनाचा उपदेश हिंदुस्थानांतल्या अधिकाऱ्यांनीं स्वीकारला नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट ह्मटली पाहिजे. बारा वर्षांपूर्वीं जी संस्था खुद्द बादशहांना येवढी महत्त्वाची वाटली, तिचें महत्त्व सध्याच्या काळीं दसपटीनें वाढलें आहे आणि तीस कोटी प्रजेचें मत दर्शविणारी सभा ती झाली आहे. तरी लॉर्ड मॉर्ले साहेबांच्या मागून त्यांच्या गादीवर विराजमान होणारे स्टेटसेक्रेटरी मि. मांटेग्यु साहेबांना कांग्रेसच्या अधिवेशनाचे वेळीं ते हिंदुस्थानांत असतां व कांग्रेसनें त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रण केलें असतां तिच्या निमंत्रणाचा स्वीकार करण्याची बुद्धि त्यांना झाली नाहीं. ही केवढी आश्चर्याची व खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे!

## राजकीय सुधारणा व औद्योगिक सुधारणा.

राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं हा प्रश्नावर वीस वर्षांपूर्वीं विद्वान् व वजनदार पुढाऱ्यांत जोराचा वाद चालला होता. गेल्या वीस पंचवीस वर्षांतल्या या दोन्ही सुधारणांच्या इतिहासानें या प्रश्नाचा निकाल लाविला आहे, आणि सामाजिक सुधारणेच्या पुरस्कर्त्यांना सामाजिक सुधारणा पुढें ढकलण्याच्या प्रयत्नांत अपेशास यावें तसें यश कां येत नाहीं तें चांगलें कळूं लागलें आहे. सामाजिक सुधारणेचे प्रयत्न चालू आहेत व ते तसेच नेटानें चालले पाहिजेत याविषयीं शंका नाहीं, पण आधीं पोटोबा आणि मग विठोबा हें तत्व सर्वव्यापी आहे. राष्ट्रीय हिताच्या चळवळी त्याला अपवाद नाहींत हें अनुभवानें सिद्ध झाल्यापासून सर नारायणराव चंदावरकर, सरशंकर नायर, ना. भूपेंद्रनाथ बसू, लाला लजपतराय, ना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ना. समर्थ प्रभृति सुधारक मंडळी सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणेकडे अधिक लक्ष घालूं लागली. हाच अनुभव राजकीय सुधारणा आधीं किंवा औद्योगिक सुधारणा आधीं या अलीकडे उद्भवलेल्या प्रश्नासंबंधानें ही येणार हें निश्चित आहे. राजकीय चळवळीला मागें ओढूं पाहणाऱ्या स्टेटसमन् सारख्या इंग्रजी पत्रकर्त्यांनीं हा प्रश्न उभा करून सुशिक्षितांना औद्योगिक सुधारणांकडे आधीं लक्ष द्या असा उपदेश केला आहे. हा मानभावीपणाचा उपदेश सुशिक्षित तरुणांना राजकीय उन्नति साधण्याच्या प्रयत्नापासून परावृत्त करील अशी भीती आह्मांला वाटत नाहीं. हातांत राजकीय सत्ता असल्याशिवाय औद्योगिक उन्नतीचे उपाय कसे लंगडे पडतात याचीं अनेक उदाहरणें औद्योगिक कमिशनापुढें झालेल्या साक्षींत आलीं आहेत. अगदीं ताजें उदाहरण द्यावयाचें ह्मणजे मि. करीमभाई आदमजी पीरभाई यांच्या देशी कारखान्यांना सरकारी कंत्राटे देण्याच्या संबंधाच्या तक्रारीकडे बोट दाखवावें लागेल. परकीय अमलाखालीं असलेल्या इतर लोकांचा ही हाच अनुभव आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेंतल्या नीग्रो लोकांचा इतिहास पहा. सुप्रसिद्ध महात्मा प. वा. बूकर टी. वॉशिंगटन यानें नीग्रो लोकांना शिक्षण देऊन त्यांची औद्योगिक उन्नति करण्याचा जसा प्रयत्न केला तसे प्रयत्न केल्याचें दुसरें एकही उदाहरण जगांत नसेल. त्यानें आपल्या कार्यक्रमांत औद्योगिक उन्नत्तीला अग्रस्थान व राजकीय उन्नतीला गौण स्थान दिलें होतें. पण अनुभव उलटा आला! नीग्रो लोकांना आपली चूक दिसून आली, आणि राजकीय सत्ता हातीं आल्याशिवाय औद्योगिक उन्नतीचें प्रयत्न व्हावे तसे सफळ होत नाहींत हें त्यांना आतां दिसून आल्यापासून ते राजकीय सुधारणेच्या मागें लागले आहेत. औद्योगिक उन्नतीचे प्रयत्न लोकांनीं जीव तोडून करावयाचे व त्या उन्नतीच्या मार्गांत येणारे अडथळे दूर करण्याचें सामर्थ्य मात्र त्यांच्या अंगीं नसावयाचें. ही स्थिति त्या उन्नतीच्या मागावरला रथ पुढें ढकलण्याला कधीं ही उत्तेजनकारक होणें शक्य नाहीं ही साधी गोष्ट स्टेट्समन सारख्या पत्रकर्त्याला जरी दिसली नाहीं, तरी हिंदुस्थानच्या लोकांला इतक्या दिवसांच्या अनुभवानें ती पूर्ण परिचयाची झाली आहे.

## महायुद्धाची प्रगति

गेल्या आठवड्यांत प्रत्यक्ष युद्धासंबंधाची अशी खबर फारच थोडी—बहुतेक नाहीं ह्मणण्यासारखीच—आली. रूटरचा बातमीदार

कळवितो कीं पश्चिम रणक्षेत्रांत पुनः बर्फाची वृष्टि सुरू झाल्यामुळें जर्मनीचा चढाई करून जाण्याचा बेत लांबणीवर पडला आहे. पुढे केव्हां ती होईल तें कांहीं सांगतां येत नाहीं. हवा अतिशय खराब झाली आहे तरी ब्रिटिश वैमानिकांनीं आपल्या उद्योगांत खंड पडूं दिला नाहीं. कार्ल्स्रुहे येथें शत्रूचा दारूगोळा तयार करण्याचे मोठाले कारखाने आहेत त्यावर बांब टाकून त्यांनीं युद्धसामुग्रीचा बराच नाश केला कांहीं ठिकाणीं रखवालदारांच्या टोळ्यामध्यें लहान लहान चकमकी उडाल्या, पण लढाई ह्मणतां येईल असा प्रसंग घडून आला नाहीं. ही फ्रान्सकडची गोष्ट झाली. इटलीकडे ही तोच प्रकार. नाहीं ह्मणायला इटालियन लोकांनीं ब्रेंटा नदीच्या पूर्वेकडील प्रदेशांत मौंट असोलोनच्या मुलुखांत कांहीं भाग परत मिळविला, व दुसऱ्या एका भागांत शत्रूचा एक हल्ला परतविला. पियाव्हेची रेषा फोडून पार जाण्याची आपली असमर्थता आतां बहुधा शत्रूला चांगली कळून चुकली असेल. रशियाच्या स्थितींत ही कांहीं विशेष फेरबदल झालेला नाहीं. रशियांत हल्लीं बोलशेव्हिक लोकांची सत्ता आहे असा लोकांचा समज आहे. पण देशांत शांतता स्थापित करण्यास ते अगदीं असमर्थ आहेत पेट्रोग्राड येथें कॉन्स्टिट्युएंट असेंब्ली नांवाच्या सभेची जी पहिलीच बैठक नुकती झाली त्यावेळीं जो प्रकार घडला त्यावरून बोलशेव्हिक लोकांची सत्ता लोकांना नकोशी झाली आहे असेंच ह्मणावें लागतें. त्याच्या विरुद्ध बहुमत झालेलें पाहून बोलशेव्हिक संतापले, आणि त्यांनीं तोफा आणून सभेच्या दाराशीं लाविल्या! तरी लोक जुमानीनात, तेव्हां जबरदस्तीनें सभेंत लष्करी खलाशांना पाठवून लोकांना हाकलून लाविलें. या बाबीपुरतें बोलशेव्हिक सेनापति ले० क्रिलेंको याचें इंग्लंडच्या क्रॉमवेलशीं साम्य दाखवितां येईल. ज्या लोकांना भाषण स्वातंत्र्य व लोकमत याविषयीं आदर वाटत नाहीं त्यांनीं लोक प्रियतेची हाव कां धरावी तें कळत नाहीं. त्यांना दंडुकेशाहीवरच दिवस काढावे लागतात. पूर्वी झारचा जुलूम होता आतां बोलशेव्हिकांचा आहे यापलीकडे रशियांत कांहीं पालट झालेला नाहीं. बोलशेव्हिकांचा व युक्रेनियन लोकांचा खटका उडालाच, आतां झारच्या पकडून ठेविलेल्या रशियाच्या माजी राजवराण्याला आमच्या स्वाधीन न कराल तर युद्ध प्रसंग येईल असा संदेश या लोकांनीं रुमानियाला पाठविला आहे. एकंदरींत रशियाची स्थिति अत्यंत शोचनीय आहे. राज्यक्रांति त्या लोकांना मानवली नाहीं.

## मि. लॉईड जॉर्ज याचें भाषण.

रशियांत चाललेल्या गडबडीचें खरें स्वरूप सगळ्याच लोकांना कळलें असें नाहीं. खुद्द इंग्लंडांत मजूर पक्षांतल्या पुष्कळांना तें अद्याप कळलेलें नाहीं; आणि ह्मणून तें स्वरूप व त्याचा मित्रराष्ट्रांच्या धोरणावर घडणारा परिणाम यांबद्दल मुख्य प्रधान मि० लॉइड जॉर्ज यांना एक मंगी भाषण करावें लागलें. लोकांचा गैरसमज तसाच राहूं दिल्यास मनुष्यबळ मिळविण्याच्या इंग्लंडच्या उद्योगांत व्यत्यय येतो, व लोक स्वार्थत्याग करण्यास पुढें येत नाहींत. मनुष्यबळासंबंधाचें बिल नुकतेंच पार्लमेंटापुढें आलें आहे ह्मणून लोकांना खरी स्थिति, युद्धाचे उद्देश, इ० मुद्यांसंबंधानें समजुतीच्या गोष्टी सांगणें भाग पडलें. मि० जॉर्ज यांनीं साफ सांगितलें कीं शांततावादी तह पाहिजे, तह पाहिजे अशी ओरड करतात खरे; पण आपण सुचविलेल्या अटींना जर्मनीनें सभ्यपणाचें तरी उत्तर दिलें काय? किंवा एक तरी अट कबूल केली काय? बर्लिनच्या कॉन्फरन्समध्यें बॅरन व्हॉन कुहेलमान यांना भाषण सुद्धां करूं दिलें नाहीं. यावरून लष्करी पक्षाची सत्ता जर्मनींत विशेष दिसते. शांततावाद्यांचें ह्मणणें ऐकून उद्या त्याप्रमाणें केलें तर इंग्लंडची रशियासारखी स्थिति होईल. रशियानें लढाई थांबविली, पण जर्मनांनीं रशिया खालीं केला नाहीं. उलट रिगा घेतलं. तात्पर्य काय तर इंग्लंडनें आपली सर्व शक्ति खर्च करून पाडाव केलाच पाहिजे. लढाई पुढें चालविली पाहिजे नाहीं तर खालीं घडघडत जावें लागेल. मि० जॉर्ज यांच्या या भाषणाचे शेवटीं जो टाळ्यांचा कडकडाट झाला त्यावरून लोकांच्या मनावर त्यांच्या शद्बांचा बराच परिणाम झालेला दिसला. विषारी सर्पाला नुसतें डंवचून उपयोग नाहीं, त्याचा चेंदामेंदा इतका केला पाहिजे कीं त्यानें पुनः आपली फणा वर करूं नये. प्रत्यक्ष प्राण हिंसा कराक्याची नसली तर स्वतःच्या प्राणरक्षणार्थ इतकें तरी करणें जरूर आहे ही साधी गोष्ट इंग्लंडांतल्या पुष्कळ लोकांच्या लक्षांत अद्याप आलेली नाहीं असें मि० लॉइड जॉर्ज यांच्या भाषणावरून दिसतें.

## प्राथमिक शिक्षण

ना. मि. पटेल यांचें बिल तर पास झालें, पण त्याची अंमलबजावणी कशी काय होते तें आतां पहाणें आहे. या कायद्यानें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करून सर्व खर्च आपणावर घेण्याची म्युनिसिपालिट्यावर कोणत्याही प्रकारें सक्ती केली नाहीं. हे लोकशिक्षणाचें काम महत्त्वाचें व अगत्याचें जाणून तें अंगावर घेण्याची ज्या म्युनिसिपालिट्यांची इच्छा असेल त्यांना तसें करण्यास स्वतंत्रता देणारा हा कायदा आहे. किती म्युनिसिपालिट्या या कायद्याचा फायदा घेण्यास पुढें येतात तें आतां दिसून येईल. अशा प्रकारचा हा प्रयोग हिंदुस्थानाला अगदीं नवा आहे. एखाद्या म्युनिसिपालिटीनें या कायद्याचा फायदा घेण्याचें मनांत आणून शिक्षणविषयक कर बसविला ह्मणजे अज्ञान लोकांकडून हा जुलूम आहे अशी ओरड व्हावयाचीच. त्याचप्रमाणें शिक्षणाच्या बाबतींत मुलांना शाळेंत पाठविण्याची सक्ती म्युनिसिपालिटीनें लोकांवर केली ह्मणजे अडाणी लोकांत असंतोष उत्पन्न होणारच. पण हें काम युक्ती युक्तीनें लोकांचीं मनें वळवून केल्यास त्या असंतोषाची तीव्रता कांहींशी कमी होईल. सध्याची महागाईची स्थिति ही एक या कायद्याच्या अंमलबजावणीला मोठी अडचण आहे. कारण, मुलांची थोडी बहुत कमाई गरीब लोकांच्या उत्पन्नांत जी भर घालीत असते ती अशा महागाईच्या वेळीं काढून घेतल्यास गरीब लोकांच्या पोटाला अधिकच चिमटा बसेल. अशा वेळीं मुलांच्या कमाई तें मुकतील इतकेंच नाहीं तर मुलाच्या शिक्षणासाठीं स्लेट, पेनसिली, कागद, शाई, पुस्तकें वगैरेंचा ही थोडा बहुत खर्च सोसण्यास त्यांना जड जाईल. अशावेळीं एक सार्वजनिक धर्मादाय फंड काढून प्रत्येक गांवच्या लोकांनीं त्या फंडांतून अशा लोकांच्या गरजा भागविण्याची कांहीं तजवीज करणें अत्यंत अगत्याचें आहे. लठ्ठभारती आळशी साधुबैराग्यांना तूप साखर चारण्यांत श्राद्धपक्षादिकांच्या निमित्तानें वेदाभ्यास जड ब्राह्मणांची चंगळ करण्यांत किंवा फ्याशनच्या नादीं लागून उंची कपडे, सुगंधि सेंट किंवा पेटंट लेदरचे बूट वापरण्यांत ज्यांना पुरुषार्थ वाटतो, त्यांनीं आपापल्या चुकीच्या समजुती सोडून तो पैसा अशा देशकार्याला लाविला तर असे फंड गांवोगांवीं काढणें मुष्कील नाहीं.

याच्यापुढचा प्रश्न ह्मणजे मुलांना कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें हा आहे. विलायतेंतले शिक्षणखात्याचे मंत्री आपला अनुभव असा सांगतात कीं सक्तीच्या कायद्यामुळें शाळेंत येणारीं मुलें कायद्यानें ठरलेल्या वयोमर्यादेच्या बाहेर जातांच शिक्षणक्रम अपुरा सोडून खुशाल चालतीं होतात, व त्यामुळें कायद्याचा हेतु व्हावा तसा सफळ होत नाहीं. सातव्या वर्षापासून अकराव्या वर्षाच्या अखेरीपर्यंत ह्मणजे पांचवर्षें प्राथमिक शिक्षणास कायद्यानें दिलीं आहेत. प्राथमिक शिक्षणाला ही मुदत कांहीं लहान नाहीं. या मुदतीचा शक्य तेवढा फायदा घेण्यासाठीं आपल्या देशाची स्थिति, आचारविचार व जरूरी यांचा नीट विचार करून शिक्षणक्रम ठरविल्यास पुष्कळ फायदा आपल्या देशाला करून घेतां येईल. येवढ्या मुदतींत मुलानां व मुलींना स्वभाषेंतलीं पुस्तकें स्वतः वाचून समजण्याइतकें ज्ञान आलें पाहिजे. इतकेंच नाहीं तर विचार शक्तीचा विकास होऊन त्यांची स्थिति त्याना थोडी बहुत कळूं लागली पाहिजे. त्याचप्रमाणें परंपरागत आलेल्या धंद्याचा त्यांना तिरस्कार न वाटतां त्या धंद्याविषयीं आवड व सुधारणा करण्याविषयींची इच्छा यांचा अंकुर त्यांच्या ठायीं उत्पन्न होणें अवश्य आहे. अशा प्रकारची शिक्षणपद्धति योजून ती व्यवहारांत आणण्याची मोठी जबाबदारी या कायद्यानें लोकप्रणींवर टाकिलेली आहे हें विसरतां कामा नये.

## श्रीमान् तालवृक्ष

श्रीमती बिझांट देवी ह्या कलकत्यास सर रवींद्रनाथ टागोर व सर ज्योतिषचंद्र बोस यांच्या संस्था पाहून इतक्या हर्षभरित झाल्या कीं असे थोर महात्मे ज्या स्वराज्याच्या राष्ट्रकार्याला लाभले आहेत तें कार्य दैवी यशानें संपन्न झाल्याशिवाय कालत्रयीं राहणार नाहीं असे आनंदोद्गार त्यांनीं काढले. ते किती सत्यमय आहेत याचा अनुभव या आठवड्यांत मुंबई नुकताच आला. सर जगदीशचंद्र बोस यांनी मुंबईस आपल्या नव्या शोधशाळेसंबंधा जेव्हां व्याख्यान दिलें, आणि फरीदपू येथील मंदीराच्या जवळचे तालवृक्ष देवाच्या आरतीच्या वेळीं नम्रभावानें लवत असतात हें जेव्हां चित्रपटावर त्यांनीं व्याख्यानां दाखविलें त्यावेळीं, त्यांनीं शास्त्रीय सरस्वतीचे मंदीर उभें केलें आहे त्यांतील आरतीच्या वेळीं सर्व राष्ट्रांतील श्रीमान तालवृक्ष कसे आल्हादानें नाचूं लागतील हें मुंबईस त्य एका रात्रींत ९० हजार रुपयांचीं टिकि घेणाऱ्या प्रेक्षक समूहानें सर जगदीशचं बोस यांच्या प्रत्ययास आणून दिलें असेल सरस्वती जेथें अत्यंत तेजोमय होते ते श्रीला आपलें सौंदर्य कायम राखण्यासाठीं चिरस्थायी राहावें लागतें.

# वऱ्हाडवृत्त.

**पुण्यदर्शन**—लोकमान्य टिळक हे तारीख फेब्रुवारीपासून वऱ्हाडांत आपल्या 'स्वराज्या'च्या प्रसृतीसाठीं येणार असून लोकसमूह ठिक ठिकाणीं त्यांच्या पुण्यदर्शनानें पावन होण्यासाठीं फार उत्कंठित झाला आहे. आणि ज्या त्या ग्रामाची श्री आपापल्या सुवर्ण मुद्रांनीं त्यांचें स्वागत करण्यास तटस्थ उभी आहे. कचा प्रोग्राम मागाऊन प्रसिद्ध होईल.

रा. रा. डिक्स शाळा इन्स्पेक्टर हे य सप्तकांत आकोल्यास आले होते. वार्षिक तपासण्या करून परत उमरावतीस गेले.

रा. रा. शामराव रामचंद्र दशोत्तर मुन्सफ स्मालकाज कोर्ट उमरावती यांस वाशिमास बदलण्यांत आलें.

रा. रा. चुनीलाल पोलीस सब इन्स्पेक्टर यांस बुलढाण्यास आफिशिएटिंग इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें.

**अमृताचा पेला**—येथील तुरुंगांतील कैद्यांना धार्मिक व नीतिपर व्याख्यानें देण्याच उपक्रम रा. रा. बापूसाहेब जठार यांनी डिपटि कमिशनर असतांना पुनः सुरू केला आहे आणि त्या अन्वयें जेल सुप रिंटेंडेंट डॉ. डी सिल्व्हा साहेब यांनीं येथील रावबहादुर महाजनी व राजश्री चिपळूणकर यांचीं व्याख्यानें दर हप्त्यास सुरू केलीं असून त्यांस मोठा भरंवसा ह वाटतो कीं हा अमृताचा पेला कैदी घे असतात तेव्हां त्यांच्या चर्येवरील नव्य सात्विक वृत्तीमध्यें उत्तरोत्तर जेलाची संस्कृत विशेष करुणामय व उपकारक होत जाऊ त्यांतील शिक्षेची दृष्टी आपोआप अस्ता जाईल.

**न्याय कोर्टाची सर्कसः**— नामदा ज्युडिशिअल कमिशनर साहेबांनं न्यायाधिशांची रोजनिशी ठेवण्या एक नवीन रजिष्टर चालू केलें आहे. बंधनें इतकीं कडक आहेत कीं न्यायाधी ह्मणजे सर्कसच्या गोलांत फिरणारा ए बुद्धिमान घोडाच होय.

१९१८ सालासाठीं वऱ्हाड व्हिक्टोरि टेक्निकल आणि इंडस्ट्रियल सोसायटीच बोर्डाच्या ९।१० सभासदांमध्यें शेगांव रायली ब्रदर्सचे कन्सल्टिंग एंजिनियर रा

स्टमोर कॅड हे आले आहेत, आणि हे कटेच त्या शाळेंतील विषयांतले तज्ज्ञ रसतात.

**शेतकी प्रदर्शनः—** ऋणमोचन येथील ात्रा दर आदितवारीं भरत असते. तेथें ा० १० व ११ फेब्रुवारीं रोजीं शेतीचें दर्शन भरून बक्षीसें वाटण्यांत येणार ाहेत. कृषिविद्येचा प्रसार करण्याला हा ांगला सुयोग आहे. आणि जमल्यास वराज्य संघाची मंडळी ही तेथें आपल्या व्या क्रांतीचे विचार लोकांत प्रसृत कर ार आहे.

उमरावतीच्या अबकारीचे हरास आजपा- न सुरू होतील. अबकारीच्या उत्पन्नाचा ाढवा व मद्यादिकांचा खप हीं पाहतां रकारची व्यवहार दृष्टी नैतिक दृष्टीपेक्षां धिक तीव्र व चाणाक्ष दिसते.

**गहूं—** या पेऱ्याखालीं वऱ्हाडांत ३८९- ४६ एकर क्षेत्र असून सुमारें २९ ार एकरांचें क्षेत्र यंदा अधिक आहे. व्या हीं पिकें सुस्थितींत आहेत.

**कापूस—** १९ जानेवारी अखेर पर्यंत ा सप्तकांत १४४७१ गाड्या बाजारांत ाल्या व आजपर्यंतच्या एकूणांत २२८- •• गाड्यांची आहे. १९१५-१६ च्या ाळाच्या मानानें हें ८ आणे सुद्धां पीक ाहीं आणि कांहीं कांहीं ठिकाणीं तर शेत- री सफाई बुडाले आहेत.

रा० रा० ज्योतिषचंद्र मित्र ॲडिशनल ुडिशियल कमिशनर यांच्या १। महि- ाच्या रजेंत रा० रा० पिस्तमजी सोह- श्री कोतवाल बॅरिस्टर यांस नेमल्या न्वयें ते त्या जागीं काम करूं लागले ाहेत. राजश्री अणासाहेब जोशी यांच्या भावा ही नेमणूक ठीक आहे.

रा० रा० आर. जे. बेक्री ए. अ मिशनर यवतमाळ यांस लष्करी महक- ाकडे तूर्त देण्यांत आलें आहे.

खानबहादुर सोहराबजी शापुरजी ए. . कमिशनर हुशंगाबाद यांस तेथेंच तूर्त ाटि कामिशनर नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. कुंजबिहारीलाल सबजज जबलपूर स पश्चिम वऱ्हाडचे आफिशिएटिंग डिस्ट्रिक्ट न्ड सेशन जज नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. योगेशचंद्र चटर्जी जज्य स्माल ाज कोर्ट आकोला यांस उमरावतीस ॲ. स्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्य नेमल्या अन्वयें तिकडे दाखल झाले.

रा. रा. विनायक सीताराम देव सब- ज्य आकोला यांस येथील स्माल कॉज र्टाचे जज्य नेमून रा. रा. शिवनारायण वेदी मुन्सफ यांस येथें सबजज नेमण्यांत ले.

**सदावर्त—** येथील श्रीराम मंदिराचा स्तुत्य ोदाय पाहून रा. रा. रामलाल हरिरामजी ारवाले रा. बनसेंद्रे तालुके चाळिसगांव नीं त्या संस्थेला आपल्या खर्चानें सदावर्त ू केला आहे. सदावर्ताला योग्य वळण ांना गरीब विद्यार्थ्यांच्यासाठीं अन्नछत्राचा भाग ठेवल्यास पुष्कळसा अनाठायीं जाणारा ोदाय योग्यसा होऊं लागेल. या कामीं हां कायमचा फंड शेट रामलाल हे देतील हां रा० रा० बचूलाल शेट यांस आम्ही ोष तपशीलवार सुचना करूं इच्छितों.

**ग्रामपंचायत—** या कमिशनापुढे साक्षीस जाणाऱ्या गृहस्थांनीं ग्रामपंचायत म्हणजे भावी स्वराज्याचा पहिला पाया आहे या दृष्टीनें ती पूर्णपणें लोकानुवर्ती असावी व त्यामध्यें सरकारी दडपशाहा काडीमात्र चालू देवू नये अशा धोरणाची साक्ष दिली पाहिजे आणि सरकारी बाजूनें फिरणाऱ्या उपदेशकांना भिवून बुद्धिभ्रंश होऊं देतां कामा नये. येथील जिल्हा कॅाँग्रेस कमिटीनें लोक जागृती करण्याचें फार चांगलें कार्य नेटानें चाल- विलें आहे.

नामदार श्रीमंत गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे मुंबईला गेले असून परभारे दिल्लीस कायदेकौंसिलाच्या बैठकी करितां जाणार आहेत. आणि त्यानंतर येत्या मार्च महिन्यांत विलायतेच्या डेप्युटेशच्या कामाला जाण्याचा त्यांचा कृतसंकल्प झाला आहे हें ऐकून आमच्या प्रांतातील मंडळीस मोठा अभिमान व आनंद वाटेल.

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र साहुकार यांस खालीं सही कर- णार गणेश नारायण शिवनारायण मारवाडी राहणार आकोला यांजकडून नोटिशीनें कळ- विण्यांत येते कीं मी दत्तक मुलगा घेतला आहे त्याचें नांव महादेव आहे. तो हल्लीं बदचालीचा निघाला आहे व तो माझे ऐकत नाहीं. व जुवा खेळतो व मी त्यास घरांतून काढून दिलें आहे. करितां कोणी त्यास माझे नांवावर पैसे अगर सामान उधार देऊं नये. व त्याजला माझे पैसे देऊन पावती त्याज जवळून घेऊं नये. घेतल्यास त्या पैश्याचा जबाबदार मी व माझी जिन्नगी होणार नाहीं. व शिवाय मी माहादेव गणेश नारायण या नांवच्या हुंड्या घेतल्या आहेत. त्या हुंड्याचे पैसे त्यास कोणी देऊं नये व हुंड्या त्याजजव- ळून बदलून घेऊं नये. घेतल्यास त्या पैशाचा जबाबदार हुंडीवाला होईल. व शिवाय घरांतून त्यानीं ३००० तीन हजाराचे सोने चांदीचे दागिने नेले आहेत. ते कोणी गहाण ठेवूं नये व खरीदी घेऊं नये. घेतल्यास दागिन्याचा जबाबदार विकत घेणार व गहाण ठेवणार होईल मी समक्ष असल्या शिवाय व मजला विचारल्याशिवाय त्याजबरोबर कोणी व्यवहार करूं नये. कळावें. ता० २६।१।१८

सही (मारवाडींत)
गणेश नारायण शिव नारायण मारवाडी
द० खुद

नो० नं० ९१

---

## मशीनरीचा लिलाव.

दि० मु० ९८ सन १९१७
विद्यमान सबजज्ज साहेब कोर्ट दर्यापूर

**वादी**

सदाशिव कृष्ण पर्वते व विठ्ल गोविंद रा० दर्यापूर

**प्रतीवादी**

देविदास विठ्ल ब्राह्मण रा० बाभळी

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं वरील मुकदम्यांतील वादी प्र० वादी यांची मौजे वानोसा ता० (दर्यापूर) येथें आठवडा बाजारा समोर असलेली फ्याक्टरी —ऑईल एंजिन—दळण्याची चक्की तेलाचा घाणा, कडबा कापण्याचें यंत्र पाण्याच्या टाक्या पुली वगैरे सर्व सामान व फ्याक्टरीचा इमला विटेबंदी टीन रूफचा येणें प्रमाणें सर्व सामान कोर्टाचे हुकुमावरून ता० ३१-१- १९१८ रोजीं गुरुवारीं दिवसा १२ वाजल्यानंतर हरास होणार आहे. तरी ज्याला सदर्हू फ्याक्टरी घेणें असेल त्यांनीं सदरर्हू तारखेस फ्याक्टरीचे जागीं हजर राहावें. सदर्हू फ्याक्टरी १२९० रुपयाचे वर जो घेईल त्यास देण्यांत येईल कारण ३२९० रुपयाचा सवाल रा. केशवराव नागोराव देशमुख दर्यापूर यांचा आहे. हरास घेणारांनें रकमे पैकी एक चतुर्थांश रकम हरासाचे वेळेस दिली पाहिजे व बाकीची एक त्रितियांश रकम पंधरा दिव साचे आंत कोर्टांत भरली पाहिजे. सदर्हू हरास कोर्टाचे हुकुमानें मंजुर होईल कळावें ता० २२-१-१८ इ.

एम्. बी. देशपांडे
रिसीव्हर.

नों. नं. ९२

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार कि. रु. १-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी १. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. साची २-३-४ अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-१॥. सरी ४

### केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के. आणि कंपनी
गिरगांव— मुंबई

नो० नं० १९

---

# सुदर्शन.

बदाम पिस्त्या सारख्या द्रव्यावर वंग प्रवाळ. मौक्तीक, कस्तुरी, सारख्या औष- धांची योजना, धातुक्षीणता, व तज्जन्य अगर कोणत्या ही अशक्ततेवर एकच दिव्य, स्वादिष्ट, उपाय. खुलासा सोबत. २० तो- ळ्यास १ रु. ख० शिवाय.

व्ही० आर० मुळे० नांदुरा G. I. P
नो० नं० ४२

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशाच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटली- वाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंसे वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तबडतोब दूर होतात किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला अॅ. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala**
**Sons & Co. Ltd.**

N. N. 16 Dadar Bombay

---

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असत मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ — Lyon Scott, एजंट

नो नं १४

---

शक्तिदायक; रामबाण युनानी इलाज.

### संजीवनी पाक.



यांत प्रवाळ, मौक्तिक शिलाजतु, कस्तुरी अंबर इत्यादि अमोल औषधें वापरलीं आहेत. प्रमेह, धातुक्षीणता, अग्निमांद्य इ० रोगांवर वस्ताद २० तोळ्यास १ रु. ट. ख. नि.

असंख्य सर्टिफिकिटें व पदकें प्राप्त!

संजीवनी दवाखाना नांदूरा-निमगांव (वऱ्हाड)

नो० नं० ३६

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.